**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५१०/०२**

**श्री. भुषण पांडूरंग माळगांवकर,**
**प्लॉट नं.१२२,फ्लॅट नं.३०२,**
**मुकेश अपार्टमेंट,नाडकर्णी मार्ग,**
**वडाळा(पूर्व), मुंबई-४०००३७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपाध्यक्ष,**
**बार कौन्सील महाराष्ट्र व गोवा,**
**२रा मजला, फोर्ट, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**बार कौन्सील महाराष्ट्र व गोवा,**
**२रा मजला, फोर्ट, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.भूषण पांडूरंग माळगांवकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.७.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १.८.०९ रोजी अर्ज करुन माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेले अर्ज, प्रथम अपील, तक्रारी आणि आदेश इत्यादी सर्व कागदपत्रांचे निरिक्षण करण्याची मागणी केली. सदर सर्व अर्ज, प्रथम अपील, तक्रारीच्या छायाप्रती इत्यादी विस्तृत स्वरुपाची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.४.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, माहितीच्या अधिकारात कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज, प्रथम अपील, तक्रारी त्यावर

पारित केलेले आदेश इत्यादीच्या सर्व छायाप्रती इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता अपीलकाराने फार मोठया प्रमाणातील माहिती मागीतली आहे. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविली आहे.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई<br>
दिनांक: ९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५०४/०२**

**श्री. संजय मरीबा कांबळे,**
**पितामह रामजी नगर,**
**होमसाई मंडळ,श्रद्धा चाळ,**
**भटवाडी.घाटकोपर(प.),**
**मुंबई-४०००८४.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त-एन विभाग,**
**बृहन्मुंबई महापालिका एन विभाग,**
**दुसरा मजला,जवाहर रोड,**
**घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी एन विभाग,**
**बृहन्मुंबई महापालिका एन विभाग,**
**चौथा मजला,जवाहर रोड,**
**घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७७.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. संजय मरीबा कांबळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ९.९.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती:-

पितामह रामजी नगर, ओमसाई मंडळ, श्रद्धा चाळ, भटवाडी,घाटकोपर(प.), मुंबई-४०००८४ या जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामाची तक्रार क्र.१७६९५, तसेच १५८३५ दिलेल्या तक्रारीवर काय कारवाई केली त्याची सविस्तर माहिती.

१)आपण सदर बांधकामाची किती स्क्वेअरफूट लांबी,रुंदी,उंची ची परवानगी दिली त्याची माहिती

२)ज्या अधिका-याने या बांधकामाचा सर्वे केला त्याची तारीख व अधिका-याचे नांव फिल्ड बूक व पंचकार्डची छायाप्रत

३)ज्या अधिका-याने वरील नमूद तक्रारीवर सर्वे केला त्याची आयकार्डची झेरॉक्स व डिटेक्शन डायरीची छायांकीत प्रत व सदर बांधकामावर काय कारवाई करण्यात आली त्याची सविस्तर माहिती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.१०.०९ रोजी माहिती दिली. यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरीता हजर नव्हते म्हणून प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अनधिकृत बांधकामाची लांबी,रुंदी व उंची तसेच बांधकामाची परवानगी दिली आहे काय? बांधकामाचा सर्वे, फिल्डबूक व पंचकार्डची छायाप्रत, डिटेक्शन डायरीची छायाप्रत तसेच अनधिकृत बांधकामावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील याबाबत विचारणा केली आहे. तक्रारदाराने ज्या अनधिकृत बांधकामाची माहिती विचारली आहे ते बांधकाम नव्याने नसून फार पूर्वीपासूनचे आहे. झोपडीधारक झोपडी उभारीत असतांना कोणत्याही प्रकारची मंजूरी घेत नसतो. महापालिकेच्या शासनाच्या जागेमध्ये झोपडयांचे वेळोवेळी सर्वेक्षण करुन पात्र झोपडीधारकांना ओळखपत्र देण्यात येते असे जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी आयोगास लेखी निवेदन सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अनधिकृत बांधकामाविरुध्द आवश्यक ती कारवाई करावी व अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः ९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५००/०२**

**श्री. निशांत सुभाष घाडगे,**
**२१, गोकूळ,डॉ.पेडणेकर इमारत,**
**स.मं.मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक(माहिती)**
**वृत्त व जनसंपर्क, माहिती व जनसंपर्क संचालनालय,**
**१७वा मजला,नवीन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी**
**माहिती व जनसंपर्क संचालनालय,**
**१७वा मजला,नवीन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. निशांत सुभाष घाडगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १७.८.०९ रोजी अर्ज करुन सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई जाहिरात क्र.४/२००८ व दि.१८.१२.०८ दैनिक महाराष्ट्र टाईम्स मध्ये दिलेल्या जाहिरात क्र.४ व ६ च्या पद भरतीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत आवश्यक ती माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१३.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळै व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन जनसंपर्क महासंचालनालयातील पद भरतीबाबत दिलेल्या अ.क्र.४ व ६ च्या जाहिरातीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने कार्यालयात येऊन सर्व संबंधीत कागदपत्रांची तपासणी करुन अपेक्षित असलेल्या नेमक्या कोणत्या कागदपत्राबाबत माहिती हवी आहे ते कार्यालयास कळविले नाही. अपीलकारास हवी असलेली माहिती संबंधीत कागदपत्रावर दिसून आली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने त्यांना हवी असलेली माहिती प्रथम निश्चीत करावी. कार्यालयात हजर राहून संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण करुन निवडक माहितीची मागणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

## <u>आदेश</u>

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः ५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४९९/०२**

**श्री. अजित काशिनाथ तावडे,**
**अे-४०४,रॉयल गॅलेक्सी,**
**आगरा रोड नवनीत मोटर्सच्या मागे,**
**गोकूळ नगर, ठाणे. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी ल-६,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अजित काशिनाथ तावडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ६.७.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती:-

१)मानपाडा(ता.जिल्हा ठाणे) येथील गट नं.५९/१,२ व १६ बाबत चुकीचा निर्णय दिल्याने फेरफार क्र.४२५ पुन्हा मंजूर होणेबाबत विचारलेला ता.प्र.क्र.५२६५१ च्या नस्तीमधील सर्व पत्रव्यवहाराच्या कागदपत्राच्या प्रती साक्षांकित करुन देण्यात यावी.

२) श्री.व्हिक्टर फ्रेटास, विधानसभा सदस्य यांनी तत्कालीन मा. महसूल मंत्री यांना दि.१८.१०.२००८ रोजी गट नं.५९ मौजे मानपाडाबाबतच्या दिलेल्या निवेदनाची प्रत व त्या अनुषंगाने केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती.

माहितीपोटी शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास कळविले. अपीलकाराने रु.२०/- इतकी रक्कम शुल्कापोटी भरणा केली. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१३.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.

माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलकार यांना माहितीपोटी र.२०/ इतके शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी कळविले होते. त्यानुसार अपीलकाराने शुल्क भरणा केला आहे. परंतु त्यांना अद्याप माहिती पुरविलेली नाही. अपीलकाराने पैसे भरुनही अपीलकारास माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत निःशुल्करित्या अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४९४/०२**

**श्री. दिपक लक्ष्मीचंद फुरीया,**
**लक्ष्मी स्टोअर्स, शॉप नंबर ३, देधिआ हाऊस,**
**बाभाई नाका, एल.टी. रोड,**
**बोरीवली(प.), मुंबई-४०००९१.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,**
**एम.एम.आर.डी.ए., पहिला माळा,**
**बांद्रा-कुर्ला संकूल, बांद्रा-(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक नगररचनाकार,**
**एम.एम.आर.डी.ए., पहिला माळा,**
**बांद्रा-कुर्ला संकूल, बांद्रा-(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. दिपक लक्ष्मीचंद फुरीया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २४.८.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती :-

अ)अर्जात नमूद केल्याप्रमाणे अभय योजना २००८ अंतर्गत मुद्रांक शुल्काची पूर्तता करण्याकरीता सादर केलेल्या दस्तांची सद्य:स्थिती

ब)वर नमूद केलेले दस्त ज्या अधिका-यांकडे आहेत त्या अधिका-याचे नाव व पदनाम व दस्तांची सद्य:स्थिती

क)नमूद केलेल्या दस्तांबाबत प्रलंबीत कार्यवाहीची संपूर्ण माहिती

ड) नमूद केलेल्या दस्तांची कार्यवाहीची पूर्तता करुन परत करण्याचे दिनांक

इ)नमूद केलेल्या दस्तांची कार्यवाही प्रलंबित असल्याची नोंदलेली कारणे

फ)नमूद केलेल्या दस्तांची कार्यवाही पूर्ण करुन पक्षकारास किंवा अर्जदारास दस्त परत करण्याकरीता नेमणूक झालेल्या अधिका-याचे नाव व पदनाम

जी) वेळेवर कार्यवाही पूर्ण करण्यास अपात्र झाल्यास अधिकारी विरुध्द कोणती कार्यवाही होऊ शकते त्याची माहिती देणे

एच) सदर बाबतीत अन्य कोणतीही माहिती उपलब्ध असल्यास

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१२.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलातील कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविलेली आहे. हव्या असलेल्या माहितीकरीता विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन माहितीच्या अधिकारात अपीलकाराने संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई | **(रामानंद तिवारी)**
दिनांकः५.४.२०१० | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४९५/०२**

**श्री. अरुण गणपत भोवर,**
**ए/६०३, साई अशिष,**
**जनकल्याण बँकेशेजारी, स्टेशन रोड,**
**विक्रोळी(पू.),मुंबई-४०००८३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सहकारी संस्था, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक**
**सहकारी संस्था, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अरुण गणपत भोवर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१०.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १२.६.०९ रोजी अर्ज करुन उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा, बांद्रा, मुंबई यांच्या कार्यालयात दि.२९.८.०८ चे आयोगाचे आदेश कोणत्या तारखेला मिळाले, त्यावर संबंधीतांनी कोणती कारवाई केली याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांनी अपीलकारास दि.३१.७.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.७.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, उपनिबंधक सहकारी संस्था म्हाडा, बांद्रा, मुंबई यांच्या कार्यालयात दि.२९.८.०८ चे आयोगाचे आदेश कोणत्या तारखेला मिळाले याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराची Executive Magistrate यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८० अनुसार पोलीसांना नोटीस पाठविली त्याबाबत संस्थेने घेतलेली दखल यासंबंधी संस्थेविरुध्द तक्रार आहे. अपीलकार आणि उत्तरवादी यांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर प्रकरणी पाठपुरावा करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः५.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४९६/०२**

**श्री. वसंत सखाराम नाईक,**
**खांडवाला एस.आर.ए.गृहनिर्माण संस्था(मर्या.),**
**इमारत क्र.४/सी/१०५, दत्त मंदिर रोड,**
**वाकोला, सांताक्रुझ(पू.),**
**मुंबई-४०००५५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन,**
**५वा मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन,**
**५वा मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. वसंत सखाराम नाईक यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ७.१०.२०१० रोजी अर्ज करुन सर्वश्री विक्रम राम पांडे, निलेश धर्माजी थवी, संतोष गोपाळ थवी, सुचिता तुकाराम घरत, अजय पेडणेकर यांनी परिशिष्ट -II मध्ये नाव समाविष्ट करण्याकरीता पात्रतेसाठी दिलेल्या कागदपत्राची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, परिशिष्ट-II मध्ये नावाचा समावेश करण्याकरिता विक्रम पांडे व इतर ४ यांनी पात्रतेसंबंधी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई — **(रामानंद तिवारी)**
दिनांक:९.४.२०१० — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४९८/०२**
**/४५१२/**

**श्री. गांधी अय्याकन्नू कौंडर,**
**अण्णानगर न्यु लिंक रोड,सी.टी.स.क्र.८२५/१ व ८२४/२,**
**शिवशक्ती,एस.आर.ए.को.ऑप.हौ.सो.लि.,**
**अंधेरी(प.),मुंबई-४०००५३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**तळ मजला, खोली क्र.६८,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**व समक्ष अधिकारी पश्चिम उपनगरे,**
**७वा मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. गांधी अय्याकन्नू कौंडर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २९.१२.०९ रोजी अर्ज करुन अण्णानगर, न्यु लिंक रोड, सीटीएस क्र.८२५/६ शिवशक्ती झोपडपट्टी सुधारणा प्राधिकरण, सहकारी गृहनिर्माण संस्था लि. अंधेरी(प.), मुंबई-५३ येथील झोपडपट्टी सुधारणा प्राधिकरण योजनेत तोडल्या गेलेल्या झोपडयांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या अण्णानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या निष्कासनाबाबतची कार्यवाही नायब तहसिलदार कार्यालयातून केली जात नाही. सदरील निष्कासनाची कार्यवाही उप जिल्हाधिकारी (अति./ निष्का),अंधेरी यांचे कार्यालयातून केली जात असल्याने अपीलकाराचा अर्ज त्या कार्यालयाकडे पुढील कारवाईकरीता पाठविण्यात येत असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.७.८.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दि.८.१०.०९ रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन तोडलेल्या झोपड्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या प्रकरणी उप जिल्हाधिकारी(अतिक्रमण/निष्कासन)अंधेरी यांनी अपीलकारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.)यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४९२/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,**
**सिध्दीविनायक प्रसाद,डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली(पूर्व),**
**पिन-४२१२०१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निबंधक,**
**उच्च न्यायालय,**
**मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**उच्च न्यायालय, मुंबई. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १.१०.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती -

१)सध्या मुंबई उच्च न्यायालयात कार्यरत असणारे किती न्यायमूर्ती नियुक्तीचे आधी मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून कार्यरत होते त्यांचा मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून एकूण कालावधी व त्यांची नावे याबाबत माहिती मिळावी

२)उपरोक्त मुद्दा क्र.१ मध्ये नमूद असलेल्या मा.न्यायमूर्ती महोदयांनी मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून कार्यरत असतांना ज्या दिवाणी/फौजदारी दाव्यांमध्ये वादी/प्रतिवादीसाठी कामकाज चालविले त्यातील एकूण किती खटले ते मा.न्यायमूर्ती म्हणून उच्च न्यायालयात नियुक्त झाल्यानंतर त्यांचे समोर निर्णयासाठी आले त्यांची मा.न्यायमूर्ती निहाय माहिती मिळावी.

३)जिल्हा सत्र न्यायाधीश म्हणून कार्यरत असतांना एका खटल्यात निकाल दिल्यानंतर सदर खटल्याचा अपील उच्च न्यायालयात करण्यात येतो. सदर अपील सदर जिल्हा सत्र न्यायाधीश पदोन्नतीने मा.उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून आल्यानंतर निर्णयासाठी त्यांचेसमोर येतोअसे किती दाव्यां/खटल्यांचेबाबत घडले याची खटल्यांचे क्रमांकासह माहिती मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती विहित वेळेत दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१०.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सध्या मुंबई उच्च न्यायालयात कार्यरत असणारे किती न्यायमूर्ती नियुक्तीचे आधी मुंबई उच्च न्यायालयात वकील म्हणून कार्यरत होते, त्यांचा मुंबई उच्च न्यायालयातील वकील म्हणून एकूण कालावधी व त्यांची नावे याबाबत माहिती मागीतली होती. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे वकीली करणा-या वकीलांची माहिती कार्यालयाच्या संकेत स्थळजवर उपलब्ध आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.४.१२.१० च्या पत्रान्वये कळविले आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी मुद्दा क्र.एक बाबत अपीलकारास माहिती दिली असल्याचे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२९.१.२०१० रोजी आदेश पारित करुन अपीलकाराचे अपील निकालात काढले असल्याचा जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी या प्रकरणी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्धअसलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

## <u>आदेश</u>

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः५.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४९१/०२**

**श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले,**
**सिध्दीविनायक प्रसाद,डॉ.शामा प्रसाद मुखर्जी रोड,**
**डोंबिवली(पूर्व),ता.कल्याण जि.ठाणं**
**पिन-४२१२०१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**नगर विकास विभाग(नवि-२८),**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**नगर विकास विभाग(नवि-१२),**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**नगर विकास विभाग(नवि-२८),**
**मंत्रालय, मुंबई-३२.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २३.११.०९ रोजी अर्ज करुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.१०/२००४ मध्ये दि.५.११.२००९ रोजी दिलेल्या आदेशात नमूद केल्यानुसार विभागाने केलेल्या कारवाईच्या धारिकेच्या सत्य प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे दि.३.१२.०९ च्या पत्रान्वये कळविले.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामाची चौकशी करणा-या मा.अग्यार समितीने शासनास सादर केलेला अहवाल या कार्यासनाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे प्रशासकीय कामकाज हाताळणा-या नवि-२८ कार्यासनाकडे पुढील आवश्यक

कार्यवाहीसाठी पाठविला आहे. ही बाब विचारात घेता आपला प्रस्तूतचा अर्ज नवि-२८ कार्यासनाकडे पाठविण्यात येत आहे.

यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नगर विकास विभाग, नवि-२८ श्री.के.आर.मरगज यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे कळविले.

जनहित याचिका क्र.१०/२००४ संदर्भातील सर्व कार्यवाही या विभागातील नवि-१२ कार्यासनाने केली आहे. यामुळे या जनहित याचिकेसंदर्भातील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नियुक्त केलेल्या मा.अग्यार समितीच्या अहवालाबाबत महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील तरतूदीनुसार करावयाची कार्यवाही नवि-१२ कडून होणे आवश्यक आहे. यासतव मा.अग्यार समितीचा अहवाल विभाग प्रमुखांच्या स्तरावर(सचिव,नगर विकास विभाग व प्रधान सचिव, नगर विकास विभाग)नवि-१२ कार्यासनास परत करण्यासाठी सादर केला आहे.

प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे व्यथील होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग नवी-१२ आणि नवि-२८ अनुक्रमे श्री.अशोक पाटील तसेच कौ.र.मरगज यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. कक्ष अधिकारी नवि-१२ व नवि-२८ हे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत असा अपीलकाराने द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नवि-१२ व नवि-२८ यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/२२९७/०२**

**श्री. एन.एस.मूलचंदानी,**
**डी-७,संगम भुवन,**
**स्ट्रँड सिनेमा समोर, कलाबा,**
**मुंबई-४०० ००५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**अ विभाग(शहर),**
**सहनिबंधक सहकारी संस्था मुंबई विभाग यांचे कार्यालय,**
**मल्होत्रा हाऊस,६वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,**
**अे विभाग(शहर),**
**सहनिबंधक सहकारी संस्था मुंबई विभाग यांचे कार्यालय,**
**मल्होत्रा हाऊस,६वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. एन.एस.मूलचंदानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १५.९.०८ रोजी अर्ज करुन व्यवस्थापक समितीने सादर केलेल्या एम-२० बंधपत्राच्या प्रतीची अपीलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.६.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. संस्थेवर प्रशासक कार्यरत असल्याने संस्थेच्या प्रशासकांना सदर बंधपत्र मुलचंदानी यांना देणेबाबत आदेश द्यावेत व अर्जातील मुद्यावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियमास अनुसरुन कार्यवाही करुन तक्रारदारास परस्पर कळवावे अशा प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना दि.३०.१.०९च्या पत्रान्वये सूचना दिलेल्या होत्या. तसेच अपीलकारास अवगत करण्यात आले होते. त्यानंतरही माहिती

मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, व्यवस्थापक समितीने सादर केलेल्या एम-२० बंधपत्राच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. सदर प्रकरणी अपीलकारास बंधपत्राच्या प्रती उपलब्ध करुन देणेबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी सूचना देऊनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास एम-२० बंधपत्राच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३३५४/०२**

**श्री. शम्भू शरण सक्सेना,**
**मुंबई साथी, हिंदी(सा.),समाचार पत्र,**
**पुष्पा सायकल मार्ट, संत सावता मार्ग,**
**रे रोड स्टेशन समोर ब्रिजवर, माझगांव,**
**मुंबई-४०००१०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**दहशतवाद विरोधी पथक,**
**नागपाडा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**दहशतवाद विरोधी पथक,**
**नागपाडा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. शम्भू शरण सक्सेना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.५.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २४.२.०९ रोजी अर्ज करुन मुंबई पोलीस अमली पदार्थ विरोधी कक्ष यांनी जप्त केलेले अमली पदार्थ किती वेळा नष्ट केले, किती प्रमाणात कोणत्या वर्षी नष्ट केले, कोणत्या अधिका-याच्या उपस्थितीत कोणत्या ठिकाणी अमली पदार्थ नष्ट केले इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कोणत्याही लोकहितार्थ असल्याचे आजपर्यंत स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम कलम ८(१)(३)अन्वये देणे शक्य होत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास २५.३.०९ च्या पत्रानवये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२३.४.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन नष्ट करण्यात आलेल्या अंमलीपदार्थाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीबाबत कोणतेही लोकहित आढळून येत नसल्याच्या कारणावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(३) अनुसार सदर प्रकरणी अपीलकारास माहिती नाकारता येणार नाही. तरी या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३५३७/०२**

**श्री. कमलाकर शेणॉय,**
**२/१३ आदिनाथ को.ऑप.हौ.सो.,**
**एली कादुरी स्कुल, माझगांव,**
**मुंबई-४०००१०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा व्हाईस चेअरमन,**
**बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा,**
**२रा मजला, उच्च न्यायालय(विस्तारीत),**
**फोर्ट, मुंबई-३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. कमलाकर शेणॉय यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.४.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १५.६.०९ रोजी अर्ज करुन श्री.परेश शहा यांच्या विरुध्द शिस्तभंगविषयक समिती क्र.१च्या डी.सी.केस ६९/१९९९ बाबत बार कौन्सील ऑफ इंडियाने शिस्तभंगविषयक समितीस सुनावणी घेण्याबाबत दिलेल्या सूचना संबंधी बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्याकडे अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने प्रकरण बंद करावे असे अपीलकाराने दूरध्वनीवरुन आयोगाच्या कार्यालयात कळविल्याची बाब आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः१२.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५९८/०२**

**श्री. दत्ता माने,**
**१८-ए/७०४, बिंबिसार नगर,**
**जयकोचच्या समोर, गोरेगाव(पूर्व),**
**मुंबई-४०००६५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**झोन - IX हील रोड, बांद्रा(प.),**
**मुंबई-५०**

**जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त पोलीस आयुक्त,**
**पश्चिम नियंत्रण कक्ष व माहिती अधिकारी यांचे कार्यालय,**
**कार्टर रोड,बांद्रा(प.), मुंबई-५०** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.दत्ता माने यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २१.११.०९ रोजी अर्ज करुन ओशिवरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत श्री.इकबाल इम्तियाझ शेख उर्फ इक्बाल चारसी जीवन ज्योती सहकारी गृहनिर्माण सस्था लि. येथे राहतो त्याच्या विरुध्द किती पोलीस केसेसची/तक्रारीची नोंद करण्यात आली आहे याबाबत एकूण ५ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.१२.०९ च्या पत्रानुसार मुद्देनिहाय माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१४.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री. इकबाल इम्तियाझ शेख यांच्याविरुध्द ओशीवरा पोलीस स्टेशनमध्ये किती केसेस/तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत याबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी पुरविलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झाले नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपीलकारास अद्यावत माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५११/०२**

**श्री. गांधी अय्याकन्नू कौंडर,**
**अण्णानगर, न्यु लिंक रोड,**
**सी.टी.एस.क्र.८२५/१ व ८२४/२,**
**शिवशक्ती एस.आर.ए.को.ऑप.हौ.सा.लि.,**
**अंधेरी(प.),मुंबई-४०००५३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी ,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला,गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पू.),मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला,गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पू.),मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.गांधी अय्याकन्नू कौंडर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १.६.०९ रोजी अर्ज करुन नोंदणी क्र.एमयुएम/एसआरए/एचएसजी/(टी.सी.)/१०९८०/२००५ अंधेरी अण्णानगर शिवशक्ती एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था म., सी.टी.एस.नं.८२५/१ व ८२५/२ ऑफ व्हीलेज आंबिवली, अंधेरी(प.), मुंबई-४०००५३ बाबत खाली नमूद केलली माहिती मागीतली होती.

१)उक्त क्षेत्रातील संस्थेचे नोंदणी झाल्यानंतर संस्थेच्या मंजूर उपविधीतील क्रमांक ८८ व महाराष्ट्र सहकारी संस्थेचे नियम १९६१ मधील नियम ५९ नुसार संस्था नोंदणी पासून ३ महिन्याच्या आत संस्थेने पहिली घटनात्मक सर्वसाधारण सभा बोलवून त्याचे रितसर ईतिवृत्त वहीत नोंद घेउन त्यामध्ये हंगामी समिती रितसर निवडल्याबद्दलचा ठराव व सदरची हंगामी समिती निवडल्यानंतर विहित मुदतीत नवीन व्यवस्थापक समिती निवड होण्यासाठी संस्थेने रितसर निवडणूक घेण्यासाठी

रितसर ईतिवृत्त वहीत नोंद घेऊन त्यामध्ये निवडणूकीद्वारे निवडून आलेले व्यवस्थापक समितीची नोंद असलेल्या सभासदांची पदे व नावे यांची छायांकित प्रत व नस्तीचे निरीक्षण,

२)उक्त क्षेत्रातील संस्थेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ६२,६३,६४,६५ नुसार ठेवावयाच्या वैधानिक नोंदवहया(१) आय नोंदवही, जे-नोंदवही, शेअर सर्टिफिकेट, शेअर सर्टिफिकेट रजिस्टर, कॅशबूक, जनरल लेजर व हिशोबाच्या वहयांची माहिती व ते व्यवस्थीत ठेवले असल्यास त्याचे नस्तीचे निरीक्षण देण्यात यावे.

३)महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम ५८-अ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार निवडून आलेले प्रत्येक समिती सदस्य पदग्रहण केल्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत नमुना एम-२० मध्ये दिलेले बंधपत्र(स्टँपपेपरवर)

४)संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ६१ मधील तरतुदीस अनुसरुन केलेले संस्थेचे लेखापरीक्षण व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५ मधील तरतुदीनुसार संस्थेचे वार्षिक सर्वसाधासरण सभा घेऊन त्यांचे इतिवृत्त वहीमध्ये नोंद घेतल्याची माहिती व नस्तीचे निरिक्षण

संस्थेच्या सर्वसाधारण सभा, संस्थेचे व्यवस्थापक समिती, संस्थेची आय नोंदवही, शेअर सर्टीफिकेट रजिस्टर, कॅश बूक, जनरल लेजर बूक, हिशोबाच्या वहया, व्यवस्थापक समितीने दिलेली बंधपत्रे, संस्थेचे लेखापरिक्षण अहवाल इत्यादी मागणी केलेली माहिती ही संस्थापातळीवरील असल्याने सदरची माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.११.६.०९ च्या पत्रान्वये कळविले. त्यानुसार अपीलकाराने दि.३१.७.०९ च्या पत्रान्वये संस्थेकडे आवश्यक माहितीची मागणी केली. परंतु माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.४.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकार यांनी मागणी केलेली माहिती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलमांतर्गत संस्थेस सवतंत्र निर्देश देऊन जन माहिती अधिका-यांनी ती अपीलकारास उपलब्ध करुन देणेबाबत संस्थेस सूचना द्याव्यात असे दि.२७.११.०९ रोजी आदेश पारित केले. यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अंधेरी येथील अण्णानगर शिवशक्ती, एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरची असल्याच्या कारणावरुन उत्तरवादीने आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता संस्थेकडे संपर्क करण्याबाबत अपीलकारास कळविले. संपर्क करुनही संस्थेने माहिती अपीलकारास पुरविली नाही म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. या परिस्थितीत मी असे

आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास व्यवस्थापक समितीने दिलेल्या एम-२० बंधपत्राच्या प्रती आणि संस्थेच्या लेखा अहवालाची(Audit Report) प्रत अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५२०/०२**

**श्री. अंकुश भिकाजी ओवल,**
**३, सरीन हाऊस,तिसरा मजला,**
**माझगांव डॉक कर्मचारी वसाहत,**
**डॉकयार्ड, माझगांव,मुंबई-४०००१०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक(मार्केटींग),**
**म्हाडा,रुम नं.१९, तिसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप संचालक(मार्केटींग),**
**म्हाडा, रुम नं.१९, तिसरा मजला,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा,मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.अंकुश भिकाजी ओवल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ९.१२.०८ रोजी अर्ज करुन सन २००५-२००८ या कालावधीत म्हाडाने प्रतिक्षानगर सायन,मुंबई येथे उच्च उत्पन्न गट क्र.१९४ अंतर्गत अनुसुचित जाती प्रवर्गातील लोकांना आरक्षणानुसार १६८ गाळयांपैकी १८ गाळे अनुसूचित जाती प्रवर्गाकरीता आरक्षित होते याबाबत एकूण १२ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने माहिती जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे. माहिती जमा झाल्यानंतर अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.७.२.०९ च्या पत्रान्वये कळविले होते. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२४.७.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन प्रतिक्षानगर, सायन, मुंबई येथील म्हाडाच्या उच्च उत्पन्न गटाच्याअनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या सदनिका वाटपाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती जमा केल्यानंतर अवलोकनार्थ अपीलकारास उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते. अद्याप अपीलकारास माहिती मिळाली नाही असे अपीलकाराने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादनकेले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. Earnest Money Deposit ची रक्कम अपलकारास परत करावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५१८/०२**

**श्री. निलेश शंकरलाल गुप्ता,**
**फ्लॅट नं.२३, ए विंग,**
**नालंदा को.ऑप.हौ.सो.लि.,**
**६२ गोपाळराव देशमुख मार्ग,**
**मुंबई-४०००२६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**मुंबई-१ शहर, सहकारी संस्था, डी विभाग, मल्होत्रा हाऊस,**
**६वा मजला, जी.पी.ओ.समोर,फोर्ट,**
**मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा निबंधक,**
**सहकारी संस्था,डी विभाग, मल्होत्रा हाऊस,**
**६वा मजला, जी.पी.ओ.समोर,फोर्ट,**
**मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.निलेश शंकर गुप्ता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ७.९.०९ रोजी अर्ज करुन नालंदा सहकारी गृहनिर्माण संस्था,६२ पेडररोड, मुंबई-२६ या संस्थेच्या व्यवस्थापक समितीविरुध्द केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती व इतर एकूण ८ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२९.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने दि.५.५.२००९ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती अपीलकारास देणे अपेक्षित आहे. अर्जदार यांचे तक्रार अर्जावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व नोंदणीकृत उपविधीनुसार कारवाई करण्यात यावी असे प्रथम अपीलावर दि.२.१२.०९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती

अधिका-यांनी सदर आदेशाचे पालन केले नसल्याच्या कारणावरुन आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, नालंदा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समितीविरुध्द केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. व्यवस्थापकीय समितीचे सदस्य तसेच सहाय्यक सदस्य आणि त्यांनी दिलेल्या एम-२ बंधपत्रासंबंधी केलेल्या तक्रारीसंबंधी केलेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५१७/०२**

**श्री. हेमंत काशिनाथ मिठबांवकर,**
**फ्लॅट क्र.ए-१, तळमजला, लक्ष्मी अपार्टमेंट,**
**लक्ष्मी नगर को.ऑप.हौ.सो.,**
**कस्तुरबा क्रॉस रोड नं.३,**
**बोरीवली(पू.), मुंबई-४०००६६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय कार्यकारी अभियंता,**
**आर/मध्य विभाग, २रा मजला, महापालिका मंडई इमारत,**
**स्वामी विवेकानंद मार्ग, बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ व का),**
**आर/मध्य विभाग, २रा मजला, महापालिका मंडई इमारत,**
**स्वामी विवेकानंद मार्ग, बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हेमंत काशिनाथ मिठबावकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १७.७.०९ रोजी अर्ज करुन रस्त्याचा दुरुपयोग, रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची मागणी केली होती. मागणी केलेली माहिती अभिलेखावर उपलब्ध नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२३.१०.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. योग्य ती कारवाई त्वरित करुन केलेल्या कारवाईचा तपशील अपीलकारास त्वरित द्यावा असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२४.१०.०९ रोजी आदेश पारित केले. कारवाई करुनही काही फरक नाही असे नमूद करुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याबाबत मागणी केली होती. लक्ष्मीनगर सहकारी गृहनिर्माण संस्था, कस्तूरबा क्रॉस रोड क्र.३३, बोरीवली(पूर्व) या संस्थेसमोरील वस्तीतील नंदाबाई पोळे व त्यांचे कुटुंबिय महानगरपालिकेच्या राखीव उद्यानाकडे जाणा-या रस्त्याचा दुरुपयोग (शौचास व लघुशंका करणे इ.)करतात. नगरपालिकेच्या नळास पाणी आल्यावर रस्त्यावर कपडे व भांडी धुतात. यामुळे माशा व डासांचा प्रादुर्भाव/उपद्रव वाढतो आहे अशी तक्रार अपीलकाराने केली होती. अपीलकाराचे गा-हाणे दूर कले असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी गा-हाणे दूर करण्यात आले असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई — **(रामानंद तिवारी)**
दिनांकः१२.४.२०१० — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५१६/०२**

**श्री. नितीन गवाणकर,**
**रुम नं.५, गवाणकर निवास,साईकृपा बिल्डिंग जवळ,**
**शिव वल्लभ रोड, दहिसर(पू.),**
**मुंबई-४०००६८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरिक्षक,**
**पश्चिम विभाग, बृहन्मुंबई,**
**जोगेश्वरी(पू.), मुंबई-४०००६०**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई, जोगेश्वरी(पू.),**
**मुंबई५४०००६०** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. नितीन गवाणकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ६.१०.०९ रोजी अर्ज करुन नॅशनल एज्युकेशन संस्था,दहिसर(पूर्व), मुंबई या संस्थेस बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणकोणत्या शर्ती व अटींवर प्लॉट शाळेकरिता वाटप केला होता त्या आदेशाच्या प्रती, तसेच सदर प्लॉटचा व्यापारी तत्वावर वापर करण्यास (जसे बँक)दिलेल्या परवानगी पत्राच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन शाळेकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्या शर्ती अटींवर प्लॉटचे वाटप केले होते, सदर प्लॉटचा वापर व्यापारी तत्वावर करण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या परवानगी पत्राची प्रत मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संस्थेकडे उपलब्ध नाही. संस्थेस बृहन्मंबई महानरगपालिकेने प्लॉटचे वाटप केले आहे. आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता अपीलकाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सक्षम प्राधिका-यांकडे संपर्क साधून माहिती मिळवावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३४६०/०२**

**श्री. निशांत सुभाष घाडगे,**
**२१, गोकुळ, डॉ.पेडणेकर बिल्डिंग,**
**स.म. मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(रस्ते),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**६वा माळा,पालिराम पथ,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. निशांत घाडगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ८.९.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन मालाड(प.)स्थानकालगत असलेल्या आनंद शेड, कस्तुरबा रोड, ईश्वरलाल रोड या रोडच्या पावसाळी पाण्याच्या गटारेसहीत सुधारणा करण्याच्या कामाबाबत सर्व कागदपत्रांच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.७.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मालाड(प.)स्थानकालगत असलेल्या आनंदशेड, कस्तुरबा रोड,ईश्वरलाल रोड या रोडच्या पावसाळी पाण्याच्या गटारेसहित सुधारणा करण्याच्या कामाबाबत माहिती मागीतली होती.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती तयारअसल्याचे उत्तरवादीने आयोगास द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. उत्तरवादीने अपीलकारास पाठविलेले परंतू टपालातून परत आलेले पत्र आयोगाच्या नजरेस आणून दिले. अपीलकार सनावणीकरीता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७२/०२**

**श्री. सूर्यकांत जे. शेळके,**
**बी/१८ त्रिमुर्ती को.ऑप.हौ.सो.,**
**९० फिट रोड,उमा हॉस्पीटलच्या समोर,**
**९० फिट पोलीस चौकीजवळ, साकीनाका कुर्ला,**
**मुबई-४०००७२. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी,**
**ग्रुप ग्राम पंचायत, बेलोशी,पा.मालयन,**
**ता.अलीबाग,जि.रायगड ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. सूर्यकांत शेळके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकड१६.८.०९ रोजी अर्ज करुन दि.१.१.२००५ पासून आजतागायत ग्रुपग्राम पंचायत,बेलोसी, ता.अलीबाग यांनी शासकीय, ग्रामपंचायत फंडातून कोणकोणती विकासाची कामे केली याबाबत एकूण २४ मुद्यांवर माहिती मागीतली आहे. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठे आहे. विस्तृत स्वरुपात माहिती मागीतली आहे. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही तर आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याच्यादृष्टीने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याची माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१)मध्ये तरतूद आहे. परंतु सदर प्रकरणी अपीलकाराने द्वितीय अपीलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपीलाची प्रत जोडलेली नाही. थेट राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

सदर अपीलावर दि.२३.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन बेलोसी, जि.अलीबाग ग्रुपग्राम पंचायतीने दि.१.१.२००५ पासून शासनाच्या, ग्रामपंचायतीच्या फंडातून केलेल्या विकासात्मक कामाची एकूण २४ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:१२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३६२७/०२**

**श्री. ईश्वरराव दत्तात्रय हंकारे,**
**कुवारी बिल्डिंग, शंकरराव चौक,**
**कल्याण(प.),जि.ठाणे .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महासंचालक,**
**महाराष्ट्र पोलीस मुख्यालय, मुंबई ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. ईश्वरराव हंकारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.१.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ७.१०.२००८ रोजी अर्ज करुन श्री.नथू काळू अंकूश यांनी दिलेल्या लेखी तक्रार अर्जावर तपासादरम्यान झालेल्या दैनिक कारवाईचा तपशील/माहिती लेखी स्वरुपात द्यावी. तक्रार अर्जाचे चौकशी तपास कारवाई दरम्यान संबंधीत घटकांना काढलेल्या नोटीसा, जात पिडीतास दिलेला न्याय निर्णय व दोषींवर दंडात्मक कारवाई व इतर कागदपत्रांच्या छायाप्रती मिळण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणी केलेली माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१२.११.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री.नथू काळू अंकूश यांनी दिलेल्या तक्रार अर्जावरील तपासकारवाई दरम्यानचा दैनिक कारवाईचा तपशील मागीतला होता. जन माहिती अधिका-यांनी दि.२४.११.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती

अधिका-यांनी प्रतिपादन केले. अपीलकार द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता हजर नव्हते. यापूर्वीच्या सुनावणीकरीताही अपीलकार अनुपस्थित होते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः९.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४६८/०२**

**श्री. ज्ञानेश बा.पाटमासे,**
**लिपिक-टंकलेखक,वित्त विभाग,**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, ३रा मजला,**
**फोर्ट, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत, ३रा मजला,**
**फोर्ट, मुंबई.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. ज्ञानेश बाळकृष्ण पाटमासे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २८.८.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागितली होती.

१)मंत्रालयीन सहाय्यक पदासाठी लिपीक वर्गीयांची स्पर्धा परिक्षांमध्ये वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड) मधील आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असल्याने सन १९९७ पासून आजवर किती पदे अंतर्गत परिवर्तनाने भरण्यात आली.

२) उक्त अंतर्गत परिवर्तनाने पद भरावयाच्या प्रकरणांमध्ये वि.जा.(अ)ची जागा भ.ज.(ब)मधून भ.ज.(ब) नसल्याने भ.ज.(क) मधून, भ.ज.(क) नसल्याने भ.ज.(ड) मधून अशाप्रकारे (बिंदू नामावलीचा पुढील बिंदू म्हणून अ नंतर ब, ब नंतर क, क नंतर ड या क्रमाने) किती प्रकरणात निर्णय घेण्यात आलेला आहे. उक्त माहितीचा सन १९९७ पासूनचा तपशिल, कागदपत्रांच्या प्रती इ. उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

३) मर्यादित विभागीय स्पर्धा परिक्षा १९९८चा निकाल दि.१६ मार्च,१९९९ रोजी जाहीर झाला होता, सदरहू परिक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांच्या निकालपत्राची प्रत कृपया उपलब्ध करुन देण्यात यावी.

पदांचे अंतर्गत परिवर्तन ही बाब शासनाच्या अखत्यारितील असून शासनाच्या प्रस्तावानुसारच त्याबाबत कार्यवाही करण्यात येते. आयोगास याबाबत कोणतेही अधिकार नाहीत. मागितलेली माहिती संकलीत करण्यास वेळ लागेल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.९.०९ च्या पत्रानवये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. विहित कालावधीत आदेश पारित केले नाहीत. माहिती मिळाली नाही यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पदांचे अंतर्गत परिवर्तनाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. मंत्रालयीन सहाय्यक पदासाठी लिपीकवर्गीयांची स्पर्धा परीक्षामध्ये वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड) मधील आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असल्यास आजवर किती प्रकरणांमध्ये परिवर्तनाने गुणवत्ता क्रमानुसार गुणवत्तेचा निकष लावून पदे भरली आहेत याबाबत अपीलकारास माहिती हवी आहे. पदाचे अंतर्गत परिवर्तनाबाबत शासनाचे सन १९९७चे आदेश आहेत. भ.ज.(अ), भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड) पदाच्या अंतर्गत परिवर्तन अनुज्ञेय आहे. तरी सदर प्रकरणी शासनाचे आदेश लक्षात घेऊन पदाचे अंतर्गत परिवर्तनाबाबत अपीलकाराने मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५२६/०२**

**सचिव/चेअरमन,**
**दिपांजली को.ऑप.हौ.सो.,**
**बफ हिरा नगर, इमारत क्र.३,**
**लोअर खारोडी,मालाड(प.),**
**मुंबई-४०००९५.** .... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन समोर,मुंबई-४०००९५.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन समोर,मुंबई-४०००९५.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार सचिव/चेअरमन,दिपांजली को.ऑप.हौ.सो.यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ७.८.०९ रोजी अर्ज करुन दुकान क्र.१८/१९ राधाकृष्ण हॉटेल यांनी सोसायटीच्या आवारात बेकायदेशिरपणे पाण्याची टाकी बसविल्याबाबत तक्रार केली होती याबाबत केलेल्या कारवाई संबंधी एकूण ६ मुद्यांवर माहिती मागीतली होती. अशी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.३०.९.०९ च्या पत्रानवये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२०.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सदर प्रकरणी जलकामे विभागाकडे चौकशी करुन व माहिती उपलब्ध करुन १५ दिवसाचे आत अपीलार्थी यांना देण्यात यावी असे जन माहिती अधिका-यांना दि.४.११.०९ रोजी आदेश दिले. यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते,जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन राधाकृष्ण हॉटेल मालकांनी संस्थेच्या आवारात बेकायदेशीरपणे पाण्याच्या टाकी बसविण्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७चा भंग झाला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

सदर प्रकरणी अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.११.०९ रोजी आदेश पारित करुन जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या होत्या. जन माहिती अधिका-यांनी सदर आदेशाचे पालन केले नाही. अपीलकारास माहिती पुरविली नाही. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरण्यात यावे. या प्रमादाबद्दल जन माहिती अधिका-याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत ३० दिवसाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४६५/०२**

**श्री. सुभाष पांडुरंग मांडले,**
**क्षितीज, इ-३०२, वेदवेदाय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**बारावे रोड, खडकपाडा(हायवे),**
**कल्याण(प.)-४२१३०१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त(सा.प्र.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्य कार्यालय,**
**६वा मजला, महानगरपालिका मार्ग,**
**मुंबई-१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख लेखापाल(आस्था-२),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्य कार्यालय,**
**६वा मजला, महानगरपालिका मार्ग,**
**मुंबई-१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. सुभाष पांडुरंग मांडले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ८.२.१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २१.१०.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

खालच्या पदावरुन वरच्या पदावर पदोन्नती मिळाल्यावर त्या कर्मचा-याचे वेतन मुंबई महानगर पालिका सेवा नियम (एम.एस.आर)च्या नियम क्र.३२(९) प्रमाणे निश्चित केले जाते. आर.जी.सेल/२७३ दि.२.७.०९ आपल्या माहितीच्या आधारे

अनुरेखकास- आरेखकांची पदोन्नती मिळाली अशा
आरेखकांची वेतनश्रेणी निश्चित झाली नाही
ती वेतनश्रेणी निश्चित केव्हा होणार
पदोन्नती मिळालेल्या आरेखकांस जुलै २००५ ते ऑक्टोबर-२००८ पर्यंतची आर्थिक तूट (वेतनश्रेणीमधील) म.न.पा.सेवा नियम(एम.एस.आर.) नियम क्र.३२(९) प्रमाणे मिळेल अथवा नाही याची माहिती देण्यात यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१४.१२.०९च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली-

मुंबई महानगरपालिका सेवा नियम(एमएसआर)च्या नियम क्र.३२(ए) प्रमाणे पदोन्नतीच्या प्रकरणी कर्मचा-याचे वेतन निश्चित केले जाते.

दि.१.४.२००० च्या वेतनश्रेणी सुधारणेच्या वेळी वेतन सुधारणा समितीने अनुरेखक, या पदास उच्च वेतनश्रेणी(Upgradation) देऊन ग्रेड कोड C-३५ रु.३९९०-५५९० वरुन ग्रेड कोड C-२७ रु.४४९५-७६५० या वेतनश्रेणीत अंतर्भाव केलेला आहे. सदर वेतनश्रेणीमध्ये (C-२७) आरेखक या पदोन्नतीच्या पदाचादेखील अंतर्भाव आहे. सदर विसंगती आरेखक या पदास रु.५०/- प्र.मा.विशेष भत्ता देऊन निराकरण केलेले आहे.

दि.१.४.०५ च्या वेतनश्रेणी सुधारणेच्या वेळी ग्रेड कोड C-२७ रु.४४९५-७६५० या वेतनश्रेणीची दि.१.४.०५ पासून सहाव्या वेतन आयोगाच्या धर्तीवर सुधारणा करण्यात आली असून पे बँड पीबी-१(एस-५) मध्ये रु.६०००+ग्रेड पे १९०० अशी सुधारीत वेतनश्रेणी निश्चित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त माहिती संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित प्रती प्रति पृष्ठ रु.२/- इतके शुल्क अधिक टपाल खर्चाची रक्कम महापालिकेच्या रोख खिडकीवर भरल्यास उपलब्ध करुन देता येतील.

दरम्यानच्या कालावधीत दि.३.१२.०९ रोजी अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. उत्तरवादीने अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने आरेखक/अनुरेखक पदाच्या वेतनश्रेणीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१४.१२.०९च्या पत्रान्वये माहिती पुरविलेली आहे. अपीलकार आरेखक(Draftsman) पदावर कार्यरत आहे. अपीलकारास अनुरेखक(Tracer) संवर्गातून आरेखक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. अनुरेखक व आरेखक या दोन्ही पदाची वेतनश्रेणी सारखी आहे. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. यामध्ये राज्य माहिती आयोगाने मध्यस्थी करावी अशी

अपीलकाराची अपेक्षा आहे. सदर बाब राज्य माहिती आयोगाच्या कार्यकक्षेत बसत नसल्याने आयोगास मध्यस्थी करता येणार नाही. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविलेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५२७/०२**

**सचिव/चेअरमन,**
**दिपांजली को.ऑप.हौ.सो.,**
**बफ हिरा नगर, इमारत क्र.३,**
**लोअर खारोडी,मालाड(प.),**
**मुंबई-४०००९५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन समोर,मुंबई-४०००९५.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**लिबर्टी गार्डन समोर,मुंबई-४०००९५.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार सचिव/चेअरमन,दिपांजली को.ऑप.हौ.सो.यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ७.८.२००९ रोजी अर्ज करुन दुकान क्र.२७ अपना बाजार तळमजला येथे अवैधरित्या प्लींथ लेव्हल पर्यंत खोदकाम चालू असल्याबाबत एकूण ७ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराचा अर्ज सहाय्यक आयुक्त,पी/उत्तर विभाग कार्यालयास दि.१८.७.०९ रोजी योग्य त्या कारवाईकरिता अग्रेषित केला आहे. त्याबाबत माहिती सहाय्यक आयुक्त,पी/उत्तर कार्यालयाकडून प्राप्त करावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.८.०९ च्या पत्रान्वये कळविले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इमारत/कारखाने)पी/नॉर्थ विभाग यांनी दि.३०.९.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकाडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी संदर्भीत माहिती व केलेल्या

कारवाईची प्रत उचित शुल्क आकारुन अपीलार्थी यांना देण्यात यावी असे दि.८.११.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अवैधरित्या क्र.२७च्या दुकानाच्या जोत्यापर्यंत केलेल्या खोदकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती योग्य नाही.या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपीलकारास सदर प्रकरणी माहिती उपलब्ध करुन देणेबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.११.०९ रोजी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. जन माहिती अधिका-यांनी सदरआदेशाचे पालन केले नाही. अपीलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरण्यात यावे. या प्रमादाबद्दल जन माहिती अधिका-यांविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करण्यात येऊ नये याबाबत आयोगाकडे ३० दिवसाचे आत लेखी खुलासा प्रत्यक्ष भेटून सादर करावा.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५५५/०२**

**श्री.देवाप्पा आण्णाप्पा गावडे,**
**अवर सचिव,वित्त विभाग,**
**अल्प बचत संचालनालय,नवीन प्रशारसकीय भवन,**
**८वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.देवाप्पा अण्णाप्पा गावडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे ३.१२.२००९ रोजी अर्ज करुन उप सचिवांच्या तात्पुरत्या जेष्ठतासूची संदर्भातील संबंधीत फाईलच्या छायाप्रती व इतर अनुषंगिक एकूण ३ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२९.१२.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

आपण आपल्या अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती समक्रमांकाच्या नस्तीवर उपलब्ध होईल. या नस्तीवरील तसेच अन्य नस्तीवरील आपणास उपलब्ध करुन द्यावयाच्या कागदपत्रांच्या प्रतींची संख्या २५३ असून त्याचे शुल्क रु.५०६/- इतके आहे. ही रक्कम आपण रोख/धनादेश/डी.डी.द्वारे Under Secretary,G.A.D.,Mantralaya,Mumbai यांच्या नावाने वरील पत्त्यावर द्यावी ही विनंती. रक्कम भरतांना या पत्राचा क्रमांक व दिनांक नमूद करावा व पावती या कार्यासनास सादर करावी. वरील शुल्क आपण भरल्यानंतर आपल्याला कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

माहितीपोटी रु.५०६/- इतके शुल्क भरुनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अर्जातील मुद्दा क्र.३ बाबत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दि.१३.१.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात दि.२०.२.२०१० पर्यंत अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१६.२.२०१० रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन उप सचिव पदाच्या तात्पुरत्या जेष्ठतासूची संदर्भात एकूण ३ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री.आ.अ. लोपीस यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली आहे. काही माहिती विलंबाने पुरविली असल्याची बाब अपीलकाराने आयोगाच्या निदर्शनास आणली. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारात मागणी केलेली माहिती विहित कालावधीत पुरविण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५२९/०२**

**श्री. अर्जूनलाल छाब्रिया,**
**ॲडव्होकेट हायकोर्ट,बेलाव्हीस्टा,**
**फ्लॅट नं.१५, ३रा मजला,**
**लेक आणि एलआयसी ऑफीसच्या समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा, मुंबई-४०००५०** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**के/पश्चिम,**
**म्युनिसिपल वार्ड ऑफीस, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(बि.अँड एफ.),**
**के/पश्चिम,**
**म्युनिसिपल वार्ड ऑफीस, अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००५८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अर्जूनलाल छाब्रीया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १८.१२.२००९ रोजी अर्ज करुन एस.व्ही.रोड, जोगेश्वरी(प.), मुंबई येथील एम.टी.एन.एल.कार्यालयाच्या जवळील मेसर्स आयेशा टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्था लि.बाबत अपीलकाराच्या अशीलाने (Client) तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२०.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन व्यथभ्त होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराचे अशील श्री.खान इनामुल हक यांनी तक्रारीत आयेशा टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील फ्लॅट क्र.२३०१ व २३०२ या ठिकाणी केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत काय कारवाई केली याबाबत केलेल्या कारवाईच्या कागदपत्राची माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या वतीने श्री. अफाक मांडवीया यांना आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिका-यांनी दि.२६.२.२०१० रोजी उपलब्ध करुन दिल्या असल्याचा लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की. अनधिकृत बांधकामाबाबत कार्यालयाने महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५१ अन्वये दि.५.१.२०१० रोजी नोटीस दिली असल्याचेही जन माहिती अधिका-यांनी अहवालात नमूद केले आह. याबाबत अपीलकारास नोटीसची प्रत देऊन अनुषंगिक माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५३०/०२**

**श्री. अर्जूनलाल छाब्रिया,**
**ॲडव्होकेट हायकोर्ट,बेलाव्हीस्टा,**
**फ्लॅट नं.१५, ३रा मजला,**
**लेक आणि एलआयसी ऑफीसच्या समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा, मुंबई-४०००५० .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निबंधक,**
**को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**मल्होत्रा हाऊस,**
**छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या समोर,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,**
**को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**गृहनिर्माण भवन, म्हाडा,**
**बांद्रा(पूर्व), मंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. अर्जूनलाल छाब्रीया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १४.१२.२००९ रोजी अर्ज करुन आयेशा टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थेच्या व्यवस्थापक समितीचे कामकाजाबाबत दि.१२.११.०९ च्या पत्रान्वये तक्रार केली होती. श्री.आरीफ खान हे आयशा ऑवर को.ऑप.हौ.सो.लि.मधील सदनिकेचे ते मालक नाहीत. त्यामुळे त्यांना बोनाफाईड मेंबर म्हणून घेता येत नाही. त्यामुळे ते सचिव पदी नॉमिनेट सिलेक्टेड किंवा इलेक्टेड होऊ शकत नाही. ते संस्थेच्या व्यवस्थापक समिती किंवा मॅनेजमेंट म्हणून ऑथराईज्ड सिग्नेटरी कसे होऊ शकतात. व्यवस्थापक समिती सदस्य थकबाकीदार आहेत. व्यवस्थापक समिती सदस्यांनी सादर केलेल्या एम-२०

बंधपत्राबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले होते. संस्थेकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर केलेल्या कारवाईबाबत अपीलकारास कळवावे असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आयेशा टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समितीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५३२/०२**

**श्री. अर्जूनलाल छाब्रिया,**
**ॲडव्होकेट हायकोर्ट,बेलाव्हीस्टा,**
**फ्लॅट नं.१५, ३रा मजला,**
**लेक आणि एलआयसी ऑफीसच्या समोर,**
**एस.व्ही.रोड, बांद्रा, मुंबई-४०००५० .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**के/पश्चिम विभाग कार्यालय इमारत, अनुज्ञापन खाते,**
**पहिला मजला, पालिराम पथ,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५८.**

**जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ अनुज्ञापन निरिक्षक,**
**के/पश्चिम विभाग कार्यालय इमारत, अनुज्ञापन खाते,**
**पहिला मजला, पालिराम पथ,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अर्जूनलाल छाब्रीया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २९.६.२००९ रोजी अर्ज करुन अपीलकाराचे अशील श्रीम.मेरी डीमेलो यांच्या ओशीवरा गाव, जोगेश्वरी(प.), मुंबई येथील सी.टी.सर्व्हे क्र.२४६ हिस्सा क्र.२० सर्व्हे क्र.४९ येथील प्लॉटवर मेसर्स दीपलक्ष्मी जाहिरात एजन्सीने ४०X२० आकाराचे होर्डींग विना परवानगी लावले आहेत याबाबत तक्रार केली होती. तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.७.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय

अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या अशिलाच्या प्लॉटवर विनापरवानगी होर्डींग लावल्याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास क्र.सआअेप/५४६२७/अनु./जाहि.दि.३०.३.२०१० रोजी पाठविण्यात आली असा उत्तरवादीने लेखी अहवाल सादर केला. यावरुन सदर प्रकरणी माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५४३/०२**

**श्री. सुरेश बलदेवदास रहेजा,**
**१६बी, शाहीमार इमारत,**
**९१ मरीन लाईन, मरीन ड्राइव्ह,**
**मुंबई-४००००२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मल्होत्रा हाऊस, ६वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. सुरेश बलदेवदास रहेजा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.१२.०९ रोजी अर्ज करुन दि.८.१२.०९ च्या अपीलकाराच्या पत्रास अनुसरुन अनुषंगिक माहिती मागीतली होती. श्री.के.सी. जोशी यांची सदनिका क्र.१३ब नामनिर्देशित श्री.क्षितीज के. जोशी यांचे नावे भाग हस्तांतरित केल्यासंबंधी झालेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यानच्या कालावधीत जन माहिती अधिका-यांनी दि.८.१.२०१० च्या पत्रानुसार अपीलकारास मागणी केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायाप्रती पुरविल्या. प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपीलावर दि.९.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले

नाहीत. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन नामनिर्देशित श्री.क्षितीज जोशी यांचे नावे क्र.१३ब सदनिका भाग हस्तांतरित करण्यात आले त्यासंबंधीच्या पत्रव्यवहाराच्या प्रतीची मागणी केली होती. सदनिका क्र.१३ब चे भाग(Share) हस्तांतरणाबाबतच्या माहितीसाठीअपीलकाराने उपनिबंधक यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे असा अपीलकारासउ आयोगाचा सल्ला आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई — **(रामानंद तिवारी)**
दिनांकः१५.४.२०१० — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५४४/०२**

**श्री. सुरेश बलदेवदास रहेजा,**
**१६बी, शाहीमार इमारत,**
**९१ मरीन लाईन, मरीन ड्राइव्ह,**
**मुंबई-४००००२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, धर्मादाय आयुक्त मुंबई यांचे कार्यालय,**
**३रा मजला, डॉ.बेझंट मार्ग, वरळी,**
**मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, धर्मादाय आयुक्त मुंबई यांचे कार्यालय,**
**३रा मजला, डॉ.बेझंट मार्ग, वरळी,**
**मुंबई-४०००१८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. सुरेश बलदेवदास रहेजा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.११.०९ रोजी अर्ज करुन, अखील भारत सहकारी गृहनिर्माण संस्था लि. यांच्या दि.१८.१.२००९ च्या परिपत्रकाबाबत एकूण ३ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदर माहिती पुरविण्याची मागणी केली होती. माहिती विहित कालावधीत मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२२.१२.०९ रोजी अप्रंथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अखील भारत सहकारी गृहनिर्माण संस्था सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे नोंदणीकृत झालेली नाही. सदर संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत झालेली आहे. यामुळे सदर संस्थेबाबतची माहिती पुरविता येत नाही असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेशात नमूद करुन दि.२१.१.२०१० रोजी आदेश

पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अखील भारत सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत एकूण ३ मुद्यांवर माहिती मागीतली होती. सदर संस्था सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे नोंदणीकृत संस्था नसल्याने माहिती अपीलकारास पुरविता येत नसल्याबाबत माहिती देण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३६८/०२**

**श्री. अशोक गोयल,**
**४०८,प्रगती शॉपींग सेंटर,दफ्तरी रोड,**
**मालाड(पूर्व),**
**मुंबई-४०००९७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख,**
**मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, १०वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,**
**तहसिलदार व नगर भूमापन कार्यालय इमारत, ४था माळा,**
**डॉ.न.र.करोडे नाटकवाला लेन,एस.व्ही.रोड,**
**बोरीवली(प.),मुंबई-४०००९२.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. अशोक गोयल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.७.०९ रोजी अर्ज करुन,नगर भूमापन दहिसर न.भू.क्र.१४२४/ए/१ व ए/२, जूना न.भू.क्र.१४२०डी, १४२४/(ई) चे मिळकतीचे दि.१७.७.२००७ चे यु.एल.सी ऑर्डर प्रमाणे माहिती व नोटीफीकेशनची प्रत,पंचनामा व प्लॅनची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी श्रीम.सी.पी.चव्हाण यांनी अपीलकारास दि.३१.८.०९ च्या पत्रान्वये कळविले की, स्वयंसूची धारीका उपलब्ध असून सदर धारीकेचे अवलोकन करुन जरुर ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१४.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी खालीलप्रमाणे दि.३०.११.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले.

अपील अर्ज पहाता अपीलदार यांनी मागणी केलेली माहिती ही विश्लेषणात्मक असलेचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च)(झ) (त्र)१ ते ४ अनुसार जी माहिती अभिलेख स्वरुपात उपलब्ध आहे त्याच अभिलेखाच्या प्रती उपलब्ध करता येतील. काही वरीष्ठ मुद्दे उपस्थित करुन त्यावर भाष्य करणे किंवा स्पष्टीकरण करुन शंकासमाधान करणे अभिप्रेत नसल्याने अपीलदार यांना विश्लेषणात्मक स्वरुपात माहिती पुरविता येत नाही. अपीलदार यांना जन माहिती अधिकारी बोरीवली यांनी दि.३१.८.२००९ चे पत्राने उपलब्ध करुन घेणेस कळविलेले आहे. ती त्यांनी प्राप्त करुन घ्यावी.

काही माहिती मिळली काही माहिती नाकारण्यात आल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.३.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

प्रथम अपीलीय अधिका-याच्या आदेशानुसार अपीलकारास कार्यालयात उपलबध असलेली माहिती पुरविण्यात आली आहे. कार्यालयात उपलब्ध नसलेल्या कागदपत्रांची अपीलकाराने माहिती मागीतली आहे. जी कागदपत्र कार्यालयात उपलब्ध नाहीत त्यासंबंधीची माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः१५.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५३८/०२**

**श्री. मुकेश विरजी छेडा,**
**विरसन व्हीला, फ्लॅट नं.१७,५वा मजला,**
**रानडे रोड, शिवाजी पार्क,**
**दादर(प.),मुंबई-४०००२८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. मुकेश विरजी छेडा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.११.२०१० रोजी अर्ज करुन माहितीच्या अधिकाराखालील प्राप्त नस्तीतील टिप्पणी कोणी लिहिली आहे, जुलै-२००९ मध्ये सदर टिप्पणीवर अभिप्राय नोंदविले आहेत सदर अभिप्राय लिहिणा-या अधिका-याचे नाव इत्यादी माहिती मागीतली होती. अपीलकाराने अपेक्षीलेली माहिती उक्त अधिनियमात कलम २(च)च्या तरतुदीमध्ये दिलेल्या माहितीच्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे सदर माहिती पुरविता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.५.१२.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१९.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१९.१.२०१० रोजी आदेश पारित केले. प्रथम अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेताअसे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन माहितीच्या अधिकाराखालील प्राप्त नस्तीतील टिप्पणीची प्रत जोडून सदर टिप्पणी कोणी लिहिली आहे याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकारास टिप्पणीची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः१६.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५३९/०२**

**श्री. मेहमुद मेहबुब शेख,**
**रुम नं.७, दोस्त मोहम्मद चाळ,**
**गौसिया मस्जिद मागे, नित्यानंद नगर,**
**घाटकोपर(प.), मुंबई५४०००८६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**एन.एम.जोशी मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(मेंटेनन्स),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**एन.एम.जोशी मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. मेहमुद मेहबुब शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.११.२००९ रोजी अर्ज करुन नकाशे,आराखडे,बील, वर्क ऑर्डर, मेजरमेंट वहीच्या छायाप्रती, दक्षतापथकाची ऑब्झरवेशन नोट व खुलासा, वर्क ऑर्डर रजिस्टरची प्रत, एकूण विकासक, त्यांची नावे,पत्ते, दक्षता पथकाचे ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन कामाची वर्क ऑर्डर, दक्षता पथकाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत, विकासकांची नावे,पत्ते इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याची पोच पावती द्वितीय अपिलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेशदेत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५४०/०२**

**श्री. मेहमुद मेहबुब शेख,**
**रुम नं.७, दोस्त मोहम्मद चाळ,**
**गौसिया मस्जिद मागे, नित्यानंद नगर,**
**घाटकोपर(प.), मुंबई५४०००८६.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**एन.एम.जोशी मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(मेंटेनन्स),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/दक्षिण विभाग,**
**एन.एम.जोशी मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. मेहमुद मेहबुब शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)दि.१.४.२००८ ते ३१.७.२००९ पर्यंत विभागाची एकूण वर्क ऑर्डरची संख्या महिनावार प्रमाणे

२)दिनांक १.४.२००८ ते ३१.७.२००९ कालावधीमध्ये नगरसेवकाच्या नावासहीत किती निधीची रक्कम वापरली त्याचा तपशील (वर्कऑर्डरचे नांव/नंबर/रक्कम व कामाच्या पत्त्याची यादी)

३) चालू वर्षातील विभागाचे बजेट प्रोव्हीजन.

जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथमअपीलीय अधिका-याकडे दि.११०.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दि.१.४.०८ ते दि.३१.७.०९ या कालावधीतील विभागाची एकूण वर्क ऑर्डरची संख्या, नगरसेवकाच्या नावासहीत किती निधी रक्कम वापरली त्याचा तपशील, सन २००९-१० या वर्षातील विभागाचे बजेट तरतूद इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याची पोच द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. यावरुन उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून आले. अपीलकार सुनावणीकरीता हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५५०/०२**

**श्री. डेब.शंकर एस.दास,**
**सेंट झेविअर्स कॉलेज,**
**फोर्ट, मुंबई-४००००१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता,**
**बृहन्मुबई विद्युत पुरवठा व परिवहन बोर्ड,**
**सी विभाग, पाठकवाडी,३रा मजला, विद्युत इमारत,**
**जी.टी.हॉस्पीटल समोर, मुंबई-४००००२.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता,**
**बृहन्मुबई विद्युत पुरवठा व परिवहन बोर्ड,**
**सी विभाग, पाठकवाडी,३रा मजला, विद्युत इमारत,**
**जी.टी.हॉस्पीटल समोर, मुंबई-४००००२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. मेहमुद मेहबुब शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.८.२००९ रोजी अर्ज करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय ग्राहर श्री.सुधीर अे.करमरकर ए/सी क्र.३४७-१८३-०२५ मीटर क्र.अे-०८८४८ चा वापर अवैधरित्या विद्युत पुरवठा करण्याकरिता करत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. याबाबत निरिक्षण करुन विद्युत ग्राहकास विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १२६ अनुसार नोटीस देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.५.२.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२३.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलली माहिती दि.२७.११.०९ पर्यंत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१८.११.०९

रोजी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल कले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विहिरीच्या विद्युत पंपास अवैधरित्या विद्युतपुरवठा श्री.सुधीर करमरकर करत असल्याबाबत अपीलकाराने तक्रार करुन केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५४६/०२**

**श्री. र.भा.भागवत,**
**१७/अ-१६, शासकीय अधिकारी वसाहत,**
**हाजी अली, मुंबई-४०००३४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. र.भा.भागवत, सचिव,राज्य माहिती आयोग, मुंबई यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.११.२०१० रोजी अर्ज करुन अ)श्री.मो.कृ.पुराडउपाध्ये, उप सचिव, सा.प्र.वि. ब)श्रीमती नि.र.चाचड,उप सचिव,सा.प्र.वि. आणि क)श्री.नं.ना. आंबुर्ले, कक्ष अधिकारी, सा.प्र.वि. या सेवानिवृत्त शासकीय अधिका-यांचा सेवानिवृत्तीनंतरचा कार्यालयाकडील नोंदीनुसार उपलब्ध असलेला पत्ता पुरविण्याची विनंती केली होती. संबंधीत सेवानिवृत्त अधिका-यांनी त्यांचे निवासी पत्ते उपलब्ध करुन देण्याबाबत सहमती दर्शविली नसल्याने मागणी केलेली माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१९.१२.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपलकार श्री.रा.भा.भागवत यांनी दि.३०.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव श्री. त्रि.वा.गेडाम यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची व वैयक्तिक स्वरुपाची असल्याने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्रीम.अनुराधा र.पाटील यांनी अपीलकारास दि.१९.१२.०९ रोजी दिलेल्या उत्तराचे समर्थन

करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल कले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सेवानिवृत्त अधिका-यांचे निवासी पत्ते उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी नाकारल्यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती नाकारता येणार नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५४२/०२**

**श्री. प्रकाश वसंतराव देशमुख,**
**इ/९-३, स.गो.बर्वे नगर को.ऑप.हौ.सो.लि.,**
**घाटकोपर(प.), मुंबई-४०००८०** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग,मल्होत्रा हाऊस,**
**६वा मजला, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग,मल्होत्रा हाऊस,**
**६वा मजला, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. प्रकाश वसंतराव देशमुख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.७.२००९ रोजी अर्ज करुन मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ सदस्यांनी केलेला गैरव्यवहार व फसवणूक संबंधी केलेली चौकशी,चौकशीचा अहवाल, अभिप्राय व केलेल्या कारवाईबाबतची लेखी माहिती व दस्तऐवजांच्या प्रतींची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणी केलेली माहिती विहित कालावधीत पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.१७.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावर खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१)अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मी महेंद्र कल्याणकर, प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई असे आदेश निर्गमित करतो की, श्री.प्रकाश

वसंतराव देशमुख यांनी दि.२२.७.२००९ रोजी केलेले अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिका-यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था(१) शहर, यांचे कार्यालयाकडे पाठपुरावा करुन श्री.देशमुख यांच्या दि.२९.१२.०८च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल घेऊन श्री. देशमुख यांना १५ दिवसाचे आत द्यावा.

त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन चौकशी अहवालाची प्रत मागीतली होती. अपीलकाराच्या तक्रार अर्जावर मुद्देनिहाय चौकशी करुन चौकशी अहवाल कार्यालयास सादर करण्यासाठी जन माहिती अधिका-यांनी दि.२७.१.०९च्या पत्रान्वये अपीलकाराचा तक्रार अर्ज उपनिबंधक, सहकारी संस्था,ए विभाग यांचेकडे पाठविण्यात आला आहे असे कळविले. सदर कार्यालयाकडून अद्यापपर्यंत अहवाल प्राप्त झाला नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी चौकशी अधिका-याकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५३३/०२**

**श्री. अजित कुमार पंजाबी,**
**द्वारा- रमजान भटार, चाळ नं.२६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई महानगरपालिका,पी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**मिठानगर महानगरपालिका,**
**गोरेगाव, मुंबई-४०००६२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण खाते),**
**मुंबई महानगरपालिका,पी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**मिठानगर महानगरपालिका,**
**गोरेगाव, मुंबई-४०००६२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अजित कुमार पंजाबी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.८.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

संबंधीत कामकाजाची प्रशासकीय माहिती अभिलेखावर तसेच सॅप प्रणालीवर माहिती आपल्या विभाग हद्दीमध्ये परिरक्षण खात्याअंतर्गत होणारी कामे जनहिताची जनतेच्या पैशातून १)पाणी पाईपलाईन टाकणे २)ड्रेनेज लाईन टाकणे किंवा दुरुस्त करणे ३)पावसाळी गटार बनविणे किंवा दुरुस्त करणे ४)वस्तीमधील लादी व पॅसेज कॉंक्रीट कोबा पॅसेज ५)संडास दुरुस्ती करणे ६)रस्ते दुरुस्त किंवा नवीन बनविणे ७) गार्डनची सिव्हील कामे ८) डिस्लजींग-शौच टाकी साफ करणे ९)डिसल्टींग -पावसाळी गटारातील गाळ काढणे याची अदा करण्यात आलेल्या देयकांची प्रत १०)पॉटल्स व बॅड पॅचेस,ट्रंचेस चर काढणे, बुझविणे ११)वॉशिंग पॅलेस दुरुस्ती, प्रत्येक टेंडरच्या एका कामाच्या सर्व प्रती मिळाव्यात. चौकी कशी असावी? चौकीचे भाडे,डिपॉझीट कशा प्रकारे मासिक, सहामाही तसेच टेंडर भरते वेळी सोबत जोडलेली पत्र सिव्हील इंजिनिअर,

सुपरवायझर नेमणुक यांच्या फोटो प्रमाणपत्रासह छायांकित प्रती मिळाव्यात. हे सिव्हील इंजिनिअर नेमलेले प्रत्येक चौकीत कोणत्या वेळेत असतात ही माहिती मिळावी. मी याबाबत आपला महसूल भरण्यास तयार आहे. मी वयोवृध्द असल्या कारणाने मला येण्या-जाण्याचा त्रास देऊ नये. आवश्यकता पडल्यास माझा प्रतिनिधी येऊ शकेल. आपण त्यांना मदत करावी ही विनंती.

माहितीपोटी विहित शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२५.८.०९ व दि.६.११.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे निरिक्षणाखाली ठेवल्याचे प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी सांगितले. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरीता अनुपस्थित होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.६.२.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सिव्हील कामाच्या टेंडरची माहिती मागीतली होती. सहा. अभियंता(परिरक्षण) खात्याकडून होणारी आणि ठेकेदारांकडून करुन घेतली जाणारी पाण्याची पाईपलाईन,ड्रेनेज पाईप लाईन,पावसाळी गटारे, कॉंक्रीट दुरुस्ती, चर दुरुस्ती इत्यादी बद्दलची माहिती मागीतली होती. सदर माहिती उपलब्ध असून निरीक्षणासाठी उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.७.११.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले होते. जन माहिती अधिका-यांनी सदर माहिती शुल्क भरुन घेऊन जाण्यास अपीलार्थीस कळविले होते. यामुळे अपीलार्थीचे समाधान झाले नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कामाची सी.डी.निःशुल्करित्या हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई<br>
दिनांक:१६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५४१/०२**

**श्री. गोविंद गोपाळ साळुंके,**
**१/३, दहिसर श्रमिक स.गृ.नि.संस्था,**
**म्हाडा कॉलनी, चुनाभट्टी,**
**शा.ना.दुबे मार्ग, दहिसर(पू.),**
**मुंबई-४०००६८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पू.),**
**मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१,**
**उपनिबंधक सहकारी संस्था,गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पू.),**
**मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. गोविंद गोपाळ साळुंके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ८.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.११.२००९ रोजी अर्ज करुन संस्थेची सभा दि.४.१०.०९ रोजी झाली. सभेचे इतिवृत्त सभा झाल्यापासून १० दिवसाचे आत सभासदांना देणे आवश्यक असतांना इतिवृत्त का देण्यात आले नाही, श्रमिक संस्थेच्या चेअरमनकडून उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी लेखी खुलासा मागीतला होता याबाबतची माहिती सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी लेखी खुलासा मागीतला होता याबाबतची माहिती सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाबाबतची माहिती केलेल्या लेखी कराराची माहिती इत्यादी एकूण १३ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे दि.१६.१२.०९ च्या पत्रान्वये माहिती दिली.

मुद्दा क्र. १,७ : सदरची माहिती संस्था पातळीवर असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२(२) नुसार संबंधीत संस्थेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन घेऊ शकता

मद्दा क्र.२,३,४,५,६,८,९,१०,११,१२,१३,१४ : सदरची माहिती प्रश्नार्थक/तक्रार स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(च) नुसार माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने मागीतलेली माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.८.२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्रमिक संस्थेसंबंधी एकूण १३ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे सहाय्यक माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी-२ यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई<br>दिनांक:१५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४६७/०२**

**श्री. अजित कुमार पंजाबी,**
**द्वारा- रमजान भटार चाळ नं.२६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग कार्यालय,**
**अंधेरी, मुंबई-४०००६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण खाते),**
**मुंबई महानगरपालिका, के/पूर्व विभाग कार्यालय,**
**अंधेरी, मुंबई-४०००६९. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अजित कुमार पंजाबी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.२.२००९ रोजी अर्ज करुन जन माहिती अधिका-यांच्या कामाच्या हद्दीमध्ये खात्या अंतर्गत होणारी कामे किती, ठेकेदार कोणकोणत्या कंपनी नामे नेमलेले आहेत, तसेच त्यांच्या चौक्या कोणत्या ठिकाणी आहेत त्या चौकीचे भाडे डिपॉझीट किती आहे, चौकी कशा प्रकारे आहे, चौकीवर सिव्हील इंजिनिअर, सुपरवायझर वर्क ऑर्डरप्रमाणे नेमलेले आहेत काय? इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने सदर अर्जान्वये बरेच प्रश्न विचारले आहेत. ही बाब माहिती अधिकार अधिनियमामध्ये बसत नाही. मागीतलेली माहिती व दस्तऐवज यांची लेखी माहिती उपलब्ध असलेल्या नमुन्यामध्ये पुरविण्यात येईल. अपीलकारास कोणते दस्तऐवज हवे आहेत याचा बोध होत नाही. हव्या असलेल्या माहितीकरीता सुस्पष्ट अर्ज करावा. त्याप्रमाणे माहिती देण्यात येईल. असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.७.०९ च्या पत्रान्वये कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.३१.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.३०.१.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सिव्हील कामाच्या टेंडरची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीकरीता शुल्कापोटी रु.६०/- इतकी रक्कम कार्यालयात भरण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी कळविले होते. परंतु जन माहिती अधिकारी कार्यालयाकडे पुन्हा फिरकले नाहीत. शुल्क भरले नाही असे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:१६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५३४/०२**

**श्री. अजित कुमार पंजाबी,**
**द्वारा- रमजान भटार चाळ नं.२६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग कार्यालय,**
**एम.जी.मार्ग न२, कांदिवली(प.),**
**मंबई-४०००६७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण खाते),**
**मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग कार्यालय,**
**एम.जी.मार्ग न२, कांदिवली(प.),**
**मंबई-४०००६७. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. अजित कुमार पंजाबी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.१०.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

संबंधीत कामकाजाची प्रशासकीय माहिती अभिलेखावर तसेच सॅप प्रणालीवर माहिती आपल्या विभाग हद्दीमध्ये परिरक्षण खात्याअंतर्गत होणारी कामे जनहिताची जनतेच्या पैशातून १)पाणी पाईपलाईन टाकणे २)ड्रेनेज लाईन टाकणे किंवा दुरुस्त करणे ३)पावसाळी गटार बनविणे किंवा दुरुस्त करणे ४)वस्तीमधील लादी व पॅसेज कॉंक्रीट कोबा पॅसेज ५)संडास दुरुस्ती करणे ६)रस्ते दुरुस्त किंवा नवीन बनविणे ७) गार्डनची सिव्हील कामे ८) डिस्लजींग-शौच टाकी साफ करणे ९)डिसल्टींग -पावसाळी गटारातील गाळ काढणे याची अदा करण्यात आलेल्या देयकांची प्रत १०)पॉटल्स व बॅड पॅचेस,ट्रंचेस चर काढणे, बुझविणे ११)वॉशिंग पॅलेस दुरुस्ती, प्रत्येक टेंडरच्या एका कामाच्या सर्व प्रती मिळाव्यात. चौकी कशी असावी? चौकीचे भाडे,डिपॉझीट कशा प्रकारे मासिक, सहामाही तसेच टेंडर भरते वेळी सोबत जोडलेली पत्र सिव्हील इंजिनिअर,

सुपरवायझर नेमणुक यांच्या फोटो प्रमाणपत्रासह छायांकित प्रती मिळाव्यात. हे सिव्हील इंजिनिअर नेमलेले प्रत्येक चौकीत कोणत्या वेळेत असतात ही माहिती मिळावी. मी याबाबत आपला महसूल भरण्यास तयार आहे. मी वयोवृध्द असल्या कारणाने मला येण्या-जाण्याचा त्रास देऊ नये. आवश्यकता पडल्यास माझा प्रतिनिधी येऊ शकेल. आपण त्यांना मदत करावी ही विनंती.

कार्यालयाशी संपर्क साधून सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत कार्यालयीन सुट्टी व्यतिरिक्त कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राच्या नस्तीची पहाणी करावी हवी असलेली कागदपत्र निदर्शनास आणून द्यावीत. त्यानंतर विहित शुल्क कार्यालयात भरल्यास हवी असलेली माहिती मिळेल असे दि.२६.१०.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.८.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सीव्हील कामाच्या टेंडरची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री.के.के.पिसाळ यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५३६/०२**

**श्री. सुमीर मोहनलाल डेम्ला,**
**ए-२०२,गोदावरी, शांतीवन,**
**बोरीवली(पू.), मुंबई-४०००६६. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई,**
**डेंटल कॉलेज व हॉस्पीटल इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल आवार, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई,**
**डेंटल कॉलेज व हॉस्पीटल इमारत,**
**सेंट जॉर्ज हॉस्पीटल आवार, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

## <u>विवेचन</u>

अपीलकार श्री. सुमीर मोहनलाल डेम्ला यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१०.२००९ रोजी अर्ज करुन चौकशी अहवालाची प्रत,चौकशी केव्हा सुरु झाली आणि केव्हा संपली, चौकशीकरीता कोणास बोलावले कोणाची चौकशी केली इत्यादी सविस्तर माहिती मागीतली होती. डॉ.प्र.ह. शिनगारे, सह संचालक(वै)यांच्या बाबातचा अहवाल अप्पर पोलीस आयुक्त, अँटी करप्शन ब्यूरो, वरळी, मुंबई-१३ यांना सादर केलेल्या अहवालाची प्रत एकूण ३ छायाप्रती रु.६/- संचालनालयातील रोख शाखेत भरुन अहवाल घेण्यास हजर रहावे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३०११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते.अपीलकार

उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन चौकशी अहवालाची प्रत मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२१.११.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार अनुपस्थित होते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई — **(रामानंद तिवारी)**
दिनांकः१६.४.२०१० — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५३७/०२**

**सचिव,दानी सदन को.ऑप.हौ.सो.लि.,**
**११३,वाळकेश्वर रोड,**
**मुंबई-४००००६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता,**
**(इमारत प्रस्ताव)शहर,इमारत प्रस्ताव विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**(इमारत प्रस्ताव)शहर,इमारत प्रस्ताव विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा,**
**मुंबई. ..... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार सचिव,दानी सदन सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन वाळकेश्वर येथील सर्व्हे क्र.२८० येथील मालमत्ता अर्थ विकासकाने विकसीत केली याबाबतचे प्लॅन बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केले होते. याबाबत अपीलकाराने एकूण ८ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२९.१०.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१२.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२५.११.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन वाळकेश्वर येथील सर्व्हे क्र.२८० येथील मालमत्तेच्या विकासाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. वादग्रस्त परिसरात बांधकाम करण्यास परवानगी दिली जात नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने लेखी कळविले आहे. सदर प्रकरणी मंजूर प्लॅनमध्ये वादग्रस्त परिसराच्या(F.S.I.)चटईक्षेत्राचा समावेश केलेला नाही असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.वसंत एम.बारब्दे यांनी द्वितीय अपीलावरल सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**

दिनांकः१६.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६०६/०२**

**श्री.भालचंद्र नारायण भोईर,**
**१/बी-१३,केसले,रामनगर,**
**एस.व्ही.रोड,बोरीवली(प.),**
**मुंबई-४०००९२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा**
**धर्मादाय सह आयुक्त कार्यालय,**
**वरळी, मुंबई-४०००१८** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.भालचंद्र नारायण भोईर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.७.०९ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र ज्ञानप्रसारक मंडळ,कांदीवली रजि.क्र.११८४/१९६४ मुंबई या संस्थेच्या कामकाजाची माहिती व त्या संदर्भात दस्तऐवजाच्या प्रती मिळण्याबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२३.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही असे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२४.११.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र ज्ञानप्रसारक मंडळ, कांदिवली या संस्थेच्या कामकाजाची अनुषंगिक एकूण ४ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराच्या

अर्जातील मुद्दा क्र.१ ते ३ या मुद्याची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५९३/०२**

**श्री.हरिष चंदू बडेकर,**
**३०४/७, तेजोमय को.ऑप.हौ.सो.,**
**सेक्टर क्र.३, चारकोप,**
**कांदीवली(प.), मुंबई-४०००६७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,**
**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा रचना व कार्यपध्दती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,**
**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हरिष चंदू बडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.१०.०९ रोजी अर्ज करुन कार्यालयात उशिरा येणा-या कर्मचा-यांच्या नैमित्तिक रजा कापण्याचे आदेश आहेत. कार्यालयात उशीरा येणा-या कर्मचा-यांच्या अर्जित रजा कापण्याबाबत आदेश नाहीत. तरी अपीलकाराच्या २५ दिवस अर्जीत रजा वजा केल्या आहेत त्या कोणत्या शासकीय नियमानुसार वजा केल्या आहेत, त्या शासकीय नियमाच्या छायाप्रती इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.८.१२.०८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.९.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कार्यालयात उशीरा आल्याबाबत अर्जित रजा कापण्यात आल्या त्या पुन्हा खात्यावर जमा करण्याबाबत माहिती मागीतली होती. कार्यालयात तिस-यांदा उशीरा आल्यास एक दिवसाची नैमित्तिक रजा कापण्यात यावी असे सा.प्र.वि.चे दि.३१.१०.१९९२ चे परिपत्रक आहे. सदर प्रकरणी अपीलकाराची कार्यालयात वारंवार उशिरा आल्याने २५ दिवस अर्जीत रजा वळती करण्यात आली आहे. सदर कारवाई कोणत्या शासन निर्णय/परिपत्रकानुसार करण्यात आली त्या परिपत्रकाची प्रत पुरवावी अशी अपीलकाराची मागणी आहे. तरी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयात उशिरा आल्याबाबत अर्जित रजा कापण्यासंबंधीच्या शासन परिपत्रकाची प्रत पुरवावी. परिपत्रक उपलब्ध नसल्यास कोणत्या नियमानुसार कारवाई करण्यात आली याबाबत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई<br>दिनांकः१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६०३/०२**

**श्री.अब्दुल हमीद मिस्त्री,**
**अब्दुल हमीद मिस्त्री चाळ,**
**कुरारगांव, मालाड(पू.),**
**मुंबई-४०००९७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा,**
**प्रशासकीय इमारत, १०वा माळा,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक,**
**भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा,**
**प्रशासकीय इमारत, १०वा माळा,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अब्दुल मिस्त्री यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.९.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.११.०९ रोजी अर्ज करुन मौजे कुरारगांव मालाड येथील सर्व्हे क्र.२३/१च्या मिळकती संदर्भात श्री.दिना प्रमोद बलदोटा यांचे नाव कसे दाखल झाले, त्यांनी सदर मिळकतीचा एन.ए.तयार करुन घेतला होता का? त्याची प्रत जमिनीचा शेतसारा भरल्याबाबतचा पुरावा इत्यादी एकूण ४ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास काय माहिती पुरविली याबाबत आयोगास उत्तरवादीने अहवाल सादर केला नव्हता. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन उचित आदेश निर्गमित करावेत असे आयोगाने दि.८.६.०९ रोजी आदेश पारित केले होते. आयोगाच्या आदेशानुसार प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२८.१०.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार सुनावणीस हजर होते. त्यांनी कार्यालयात हजर राहून दि.३०.१०.२००९ रोजी माहिती प्राप्त करुन घेतली. काही तक्रार नाही असे लिहून दिले असल्याचा प्रथम अपीलीय अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर केला.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मालाड येथील सर्व्हे क्र.२३/१ च्या मिळकतीबाबत माहिती मागीतली होती. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेली आहे. सदर सर्व्हे क्र.२३/१ मध्ये १५.८ चौ.फू.चे अपीलकाराचे मालकी हक्काचे बांधकाम आहे. सर्व्हे क्र.२३/१ चे मालक म्हणून अपीलकाराचे नाव दाखवावे अशी अपीलकाराची मागणी आहे. सदर बाब माहितीच्या अधिकारांतर्गत राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५९४/०२**

**श्री.हरिष चंदू बडेकर,**
**३०४/७, तेजोमय को.ऑप.हौ.सो.,**
**सेक्टर क्र.३, चारकोप,**
**कांदीवली(प.), मुंबई-४०००६७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,**
**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा रचना व कार्यपध्दती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,**
**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हरिष चंदू बडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.९.०९ रोजी अर्ज करुन दि.१५.६.२००७,२४.१२.२००७, १४.१२.०८ या तीनही अर्जांवरील कार्यवाहीचा तपशील वृतांत देण्यात यावा. फरकाची रक्कम मंजूर होण्यास लागणा-या कागदपत्रांचा तपशील शासन निर्णय,

श्री.अर्जून गणपत तांबे यांचे फरकाचे बिल मंजूर झालेल्या प्रधान शिर्षक देण्यात यावे. त्या शिर्षकसाठी शासनाने मंजूर केलेल्या रकमेचा तपशील देण्यात यावा(पुरवणी मागणीसह)

एक प्रधान शीर्षाखाली प्रत्येक देयकासाठी वेगळे अनुदान,वेगळी रक्कम शासनाकडून पुरवणी मागणीसहीत वेगळी मंजूर होत असल्यास तशा कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती

माझे स्वत:चे देयक मंजूर(फरकाची रक्कम) होण्यासाठी शीर्षकाखाली शासनाने पुरवणी रक्कम मंजूर केली नाही याबाबतची कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती

आत्तापर्यंत किती कर्मचा-यांना फरकाच्या रकमा मंजूर झाल्या, त्या कर्मचा-यांची नांवे व दिनांक देण्यात यावे तसेच अद्याप किती कर्मचा-यांची फरकाची रक्कम देणे बाकी आहे त्या कर्मचा-यांची नावे देण्यात यावीत.

श्री.अर्जून गणपत तांबे हे करमणूक कर शाखेत कार्यरत आहेत तसेच मी अर्जदार करमणूक कर शाखेत कार्यरत आहेत  दोघांचे वेतनाचे शीर्षकाच्या झेरॉक्स प्रती. फक्त तांबेनाच शासनाने पुरवणी अनुदान मंजूर कलेबाबत कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२९.९.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२२.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वेतन फरकाची रक्कम व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी तहसिलदार श्री.डी.जी. लोंढे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा श्री.अनिल सावंत, निवासी  उप जिल्हाधिकारी यांनी अपीलकारास संपूर्ण माहिती पुरविली नाही. अपीलकाराची वेतन फरकाची रक्कम दिली नाही असे अपीलकाराने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**
**अपील क्रमांक २००९/४५९२/०२**

**श्री.हरिष चंदू बडेकर,**
**३०४/७, तेजोमय को.ऑप.हौ.सो.,**
**सेक्टर क्र.३, चारकोप,**
**कांदीवली(प.), मुंबई-४०००६७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,**
**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा रचना व कार्यपध्दती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर,**
**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हरिष चंदू बडेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.९.०९ रोजी अर्ज करुन १)थेट नियुक्त झालेल्या आयोग अपुरस्कृत गट ड च्या कर्मचा-यांना खंड देऊन परत सेवेत घेण्याबाबत शासनाचे स्वयंस्पष्ठ आदेश असल्यास अशा आदेशाच्या छायाप्रती २)महाराष्ठ्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील कलम ११ आणि कलम १५ प्रमाणे कोणत्याही माध्यमाशिवाय थेट नियुक्ती झालेले गट ३ व ग ट ४ च्या कर्मचा-यांच्या १९९२ पासून अद्याप वैद्यकीय तपासणी न झालेबाबत न्यायिक तसेच प्रशासकीय कारणे देण्यात यावीत ३)महाराष ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील कलम ३६ व ३७ प्रमाणे थेट नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांची सेवा पुस्तके अभिलेख तयार न करण्याची प्रशासकीय कारणे इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.७.१०.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास मुद्देनिहाय माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम

अपीलीय अधिका-यांकडे दि.२०.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन गठ क व गठ ड मधील कर्मचा-यांच्या नियुक्तयांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी पुरविलेल्या माहितीने अपीलकाराचे समाधान झालेले नाही. सार्वत्रिक निवडणूक कालावधीत गठ क व गठ ड पदावर काम केलेला कालावधी नियमित करुन घेण्याकरीता अपीलकाराने शासनाकडे संपर्क साधावा. सेवा नियमनाची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५०५/०२**

**श्री. प्रमोद कदम,**
**१६/डी३, वर्सोवा अंधेरी श्री साई सहकारी गृहनिर्माण संस्था म.,**
**एस.व्ही.पी.नगर, म्हाडा,**
**अंधेरी(प.), मुंबई-४०००५३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ. व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**दुसरा मजला, अंधेरी(प.), मुंबई-४०००५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका के/पश्चिम विभाग कार्यालय,**
**दुसरा मजला, अंधेरी(प.), मुंबई-४०००५८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.प्रमोद कदम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.९.०९ रोजी अर्ज करुन वर्सोवा अंधेरी श्री.साई सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,प्लॉट क्र.१६, एस.व्ही.पी.नगर, म्हाडा अंधेरी(प.),मुंबई-५३ नोंदणी क्र.पी.ओ.एम.(डब्ल्यू के वेस् ट) एच.एस.जी.(टी.ओ.)६५८६ सन १९९२-९३ जागतीक बँक प्रकल्प द्वारा म्हाडाने ९० वर्षाच्या भाडे करारावर कमी उत्पन्न गटातील बैठया चाळीमध्ये वितरित केलेल्या या गृहनिर्माण संस्थेशी निगडीत अनधिकृत४ बांधकामाबाबत अनुषंगिक एकूण ६ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.५.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते, जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी

अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अनधिकृत बांधकामाबाबत माहिती मागीतली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता उत्तरवादी अनुपस्थित होते. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची का टेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी अनधीकृत बांधकामाबाबत केलेल्या कारवाईची (Action Taken) माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास कळवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५०६/०२**

**श्री. सोमनाथ काळू पवार,**
**बी.डी.डी.चाळ नं.६१,**
**खोली क्र.६६, वरळी,**
**मुंबई-४०००१८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक/कार्यकारी अभियंता,**
**मुं.वि.वि.चाळी,**
**वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुं.वि.वि.चाळी,**
**वरळी, मुंबई-४०००१८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सोमनाथ पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.८.०९ रोजी अर्ज करुन मुंबई विकास विभाग चाळ क्र.६१ वरळी संबंधी एकूण १४ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.९.१०.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मुंबई विकास विभाग चाळ क्र.६१, वरळी संबंधी अनुषंगिक एकूण १४ मुद्यांवर माहिती

मागीतली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक श्री.क.श. शिवदास यांनी अपीलकारास आयोगासमोर माहिती पुरविली. सदर माहिती जन माहिती अधिका-यांनी प्रमाणित करुन द्यावी अशी अपीलकाराने मागणी केली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या मागणीनुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती प्रमाणित करुन द्यावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५०१/०२**

**श्री. अर्जूनलाल एम.छाब्रीया,**
**बेला व्हीस्टा,फ्लॅट नं.१५,**
**३रा मजला, लेक आणि एल.आय.सी.ऑफीस समोर,**
**एस.व्ही.रोड., बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**गृह विभाग,मंत्रालय,**
**मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**गृह विभाग,मंत्रालय,**
**मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.अर्जूनलाल छाब्रिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.९.०९ रोजी अर्ज करुन त्यांचे अशील श्री.मोहम्मद कैसर शेख रमझान अहमद यांनी त्यांच्या दि.२१.९.२००९ च्या अर्जान्वये श्रीम.नजमा बानू शेख,बिल्डिंग क्र.आर-१३ सदनिका क्र.५१५,अवधाम सोसायटी, राम मंदिर रोड, गोरेगाव(प.), मुंबई-१०४ या रुमचा जबरदस्तीने ताबा घेतला असून अर्जदाराचे अशीलास घरामध्ये राहण्यास देत नसून त्याच बिल्डिंगमध्ये राहणारा इसम श्री.मोहम्मद सईद उर्फ मुन्ना भाई याच्याशी प्रेमसंबंध असल्याबाबत तक्रार केली. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२३.१०.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१२.११.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज जन माहिती अधिका-यांनी पोलीस आयुक्त, मुंबई कार्यालयाकडे पुढील आवश्यक त्या कारवाईकरीता हस्तांतरीत केला आहे. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३) ची जन माहिती अधिका-यांनी पूर्तता केली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**

दिनांक:१९.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६००/०२**

**श्री. विजयकुमार शंकरराव होटकर,**
**१-बी,४०५ स्नेहदीप को.ऑप.हौ.सो.,**
**देवरत्न नगर, सायन-चुनाभट्टी,**
**मुंबई-४०००२२ .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,**
**मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**विवेचन**

अर्जदार श्री.विजयकुमार होटकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.११.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.५.२.२००७ रोजी अर्ज करुन अपीलकाराने पाठविलेले पत्र नोंदणीशाखेत केव्हा प्राप्त झाले,नोंदणी शाखेतील संबंधीत व्यक्तीचे नाव व पदनाम, माहिती अधिकारी श्री.जावळीकर यांना सदर पत्र हस्तांतरीत करेपर्यंतच्या नोंदी, जन माहिती अधिका-यास सदर पत्र ४० दिवसांनी उशीराने देण्यात आले त्यासाठी कोण व्यक्ती जबाबदार आहेत या जबाबदार व्यक्तींविरुध्द काय कारवाई घेतली वा कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी उशिराने माहिती पुरविली असल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम सदर प्रकरणी सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. त्यामुळे समाधान झाले नाही तर आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अपीलकाराचा हक्क अबाधीत राहील

असे आयोगाने दि.२४.९.०८ रोजी आदेश पारित केले.त्यानंतरही प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आयोगाच्या दि.२४.९.२००८ च्या आदेशाचे पालन कले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, या प्रमादाबद्दल प्रथम अपीलीय अधिका-यांना जबाबदार धरुन प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी प्रथम अपीलीय अधिका-यांची विभागीय चौकशी करावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५९९/०२**

**श्री. ए.के. जैन,**
**जैन सदन, ३रा मजला,**
**भंडार गल्ली, माहीम,**
**मुंबई-४०००१६.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा असोसीएट प्लॅनर,**
**एम.आय.डी.सी.,**
**महाकाली केव्हज रोड,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००९३.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.अे.के. जैन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.७.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१०.२००८ रोजी अर्ज करुन मरोळ औद्योगीक परिसरातील प्लॉट मालक एफएसआय-१ ऐवजी एफएसआय-२ चा वापर करु शकतात का,सध्याचे युनी ट माहिती तंत्रज्ञानाचे नाही. एम.आय.डी.सी.ला अंडरट`कींग देऊन सध्याचे युनी ट माहिती तंत्रज्ञान मध्ये रुपांतरीत करु शकतात काय इत्यादी एकूण ५ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून यते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मरोठ औद्योगीक परिसरात प्लॉट मालक एफएसआय-१ ऐवजी एफएसआय-२ वापरु शकतात का याबाबत अनुषंगिक ५ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले की, अपीलकारास मागणीप्रमाणे मुद्देनिहाय माहिती पुरविण्यात आली. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आी असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५२८/०२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज,**
**घनश्यामदास चाळ, रुम नं.२, संत रोहिदास मार्ग,**
**काळा किल्ला, धारावी,**
**मुंबई-४०००१७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परि-३, मध्य नियंत्रण कक्ष, भायखळा(पू.),**
**मुंबई-४०००२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**मध्य नियंत्रण कक्ष,भायखळा(पू.),**
**मुंबई-४०००२७.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.११.२००९ रोजी अर्ज करुन, अपीलकार हे उत्तरप्रदेशातील प्रतापगड जिल्हयाचे रहिवाशी आहेत, त्यांचे लग्न श्रीम.शील्पा सरोज यांच्याशी झाले, अपीलकार रिक्षा ड्रायव्हर असून ते मुंबई येथे राहतात, त्यांच्या गैरहजेरीत श्री.राजेश सरोज यांनी त्यांच्या पत्नी शिल्पा सरोज यांना मुंबई येथील निवासस्थानातून बळजबरीने उत्तरप्रदेशात घेऊन गेले व घरातील रु.३०,०००/- रोख रक्कम व रु.४०,०००/- चे दागदागीने चोरीला गेले अशी तक्रार दि.१८.६.२००७ रोजी दाखल केली. सदर तक्रारीवर केलेल्या

कारवाईची माहिती उपलब्ध करुन देण्याची अपीलकाराची मागणी आहे. जन माहिती अधिका-यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिका-यांना सूचना देऊन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२३.१२.०९ रोजी आदेश पारित केले. अपूर्ण माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगामकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराच्या दि.१८.६.२००८ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. तक्रार अर्जाबाबत यापूर्वी केलेल्या चौकशीत अपीलकार यांची पत्नी सौ.शिल्पा ही तिचा भाऊ राजेश यांचेसोबत गेलेली नसून ती स्वतः स्वखुशीने तिच्या वडीलांसोबत उत्तरप्रदेश येथे गेली आहे. तसेच अर्जदाराचे पैसे, दागिने याबाबत केलेल्या चौकशीत अर्जदाराची पत्नी शिल्पा हिने तिचे दागिने स्त्रीधन हे तिच्याबकरोबर आणलेले असून ज्यावेळी अर्जदाराचे पत्नीने दागिने नेले त्यावेळी घरामध्ये रोख रक्कम नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. अर्जदारास केलेल्या चौकशीमध्ये घेतलेल्या जबाबाची माहिती यापूर्वी देण्यात आलेली आहे. यातील कोणतीही माहिती दिशाभूल करणारी नाही असा लेखी अहवाल वरिष्ठ पोलीस निरिक्षक,धारावी पोलीस ठाणे, मुंबई यांनी आयोगास सादर करुन त्याची प्रत अपीलकारास पाठविलेली आहे. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६०२/०२**

**श्री. प्रविण एम.दाली,**
**ए/६०३,मौली को.ऑप.हौ.सो.,**
**म्युनिसिपल स्कुल जवळ,**
**मिठानगर,एम.जी.रोड, गोरेगाव(प.),**
**मुंबई-४०००६२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी/अधिकारी I/C,**
**म्हाडा, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. प्रविण एम.दाली यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.९.२००९ रोजी अर्ज करुन, रु.३९१.८७ को टी निधी वर्षाच्या शेवटी कोषागारातून काढून कोषागार नियम १९६८ मधील नियम ५७ चा भंग केला. लेखा अहवालात(नागरी)सदर बाब समावेश केली. सदर निधी कोणत्या बँकेत ठेवला त्या बँक खात्याचे विवरणपत्र, प्रस्ताव मंजूरीची कागदपत्र, रक्कम अदा करण्यात आली त्यासंबंधीची सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजीत केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन रु.३९१.८७ को टी निधीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास सदर प्रकरणी माहिती पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई करण्यात येईल.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५८७/०२**

**श्री. चंद्रकांत अमृतलाल मर्चंट,**
**जी.एम.राणे बिल्डिंग व खंबाटा पठाण चाळ,**
**डॉ.ई.मोझेस रोड, वरळी,**
**मुंबई-४०००१८. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(नॉर्थ),**
**परिमंडळ-२,रजनी महाल,**
**ताडदेव, मुंबई-४०००१४.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**फ-ग दक्षिण विभाग,**
**इमारत दुरुस्ती व पुर्नदुरुस्ती मंडळ, परेल,**
**मुंबई-४०००१२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. चंद्रकांत अमृतलाल मर्चंट यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३.१०.२००९ रोजी अर्ज करुन, खैबर मालमत्ता प्रणीत लोअर परेल डीव्हीजन, प्लॉट क्र.१५३ सी..टी.स.क्र.११२/११३ येथील प्रस्तावासंबंधाने पुढील माहिती मागीतली होती.

१)२७.४.२००१ च्या म्हाडा अभिलेख नोंदीनुसार ३८८.५९ चौ.मी टर इतके वाढीव क्षेत्रफळ प्राधिकरणास मिळाले आहे. तेव्हा तेथील लाभार्थींचा वास्तु संबंधीचा स्थलदर्शक वास्तु क्रमांक, लाभार्थी गाळयांची रहिवाशांची सखोल यादि तेथील क्षेत्रफळासह देणे

२)१५.६.२००४ च्या म्हाडा अभिलेख नोंदीनुसार सधारीत वाढीव क्षेत्रफळ Modified अधिनियमावलीनुसारची रहिवाशांची सखोल यादी. रहिवाशी वास्तव्यातील वास्तूचा स्थळदर्शक अनुक्रमांक व क्षेत्रफळ याबाबत सखोल माहिती देणे

अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता मिळकत व्यवस्थापक (सं.गा.)यांच्या कार्यालयात संपर्क साधावा व मुद्दा क्र.२ ची माहिती कार्यालयात उपलबध असून सदर माहिती किंवा कागदपत्रासाठी कार्यालयात दुपारी ३.०० ते ५.३० वाजेपर्यंत प्रत्यक्ष संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२३.१०.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानंतर तर्कविसंगत उत्तर दिल्याने अपीलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी व अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन खैबर मालमत्ता प्रणीत लोअर परेल डीव्हीजन प्लॉट क्र.१५३ सर्व्हे क्र.११२/११३ येथील प्रस्तावाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचा लेखी अहवाल जन माहिती अधिका-यांनी आयोगास द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी सादर केला. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**

दिनांक:२०.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५८६/०२**

**श्री. मालकोलम ओलीव्हर देसाई,**
**५वा मजला, त्रिभुवन बिल्डिंग,**
**विजय वल्लभ चौक,**
**पायधुणी, मुंबई-४००००३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रिन्सीपॉल,**
**भुवन्स हजारीमल सोमाणी कॉलेज,**
**चौपाटी, मुंबई-४००००७. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. मालकोलम ओलीव्हर देसाई यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.११.२००९ रोजी

अर्ज करुन प्रथम वर्ष कला,विज्ञान,वाणिज्य,बीएमएस,प्रथम वर्ष वाणिज्य(अे/एफ)बाबत प्रवेशाकरिताची गुणवत्ता यादी,कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या कला,वाणिज्य,विज्ञान वर्गात प्रवेशाकरीता तयार करण्यात आलेली गुणवत्ता यादी इत्यादी अनुषंगिक प्रवेशाबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन महाविद्यालयातील प्रवेशाकरीता तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७६/०२**

**श्री.प्रशांत सुभाष घाडगे,**
**२१/२, गोकूळ, डॉ. पेडणेकर बिल्डिंग,**
**स.म. मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी सहा.अभियंता(परिरक्षण),**
**एफ/उत्तर विभाग, म.न.पा. कार्यालय,**
**९६, भाऊ दाजी रोड,**
**माटुंगा, मुंबई-४०००१९.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(परिरक्षण),**
**एफ/उत्तर विभाग, म.न.पा. कार्यालय,**
**९६, भाऊ दाजी रोड,**
**माटुंगा, मुंबई-४०००१९. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. प्रशांत सुभाष घाडगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.१२.२००९ रोजी अर्ज करुन म.न.पा.एच/उत्तर विभाग माटुंगा मुंबई येथील सहाय्यक अभियंता श्री.हेरलेकर आणि श्री.मोरे(परिरक्षण खाते) हे दोघे महापालिकेच्या सेवेत असल्याकारणाने त्यांची वैयक्तिक माहिती द्यावी अशी मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली

नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२२.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एफ/उत्तर विभाग, म.न.पा. कार्यालयात कार्यरत असणा-या अधिका-यांची अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकाराने म.न.पा. एफ/उत्तर विभाग कार्यालयातील अधिका-यांची वैयक्तिक माहिती मागीतली होती. सर्व संबंधीत अधिका-यांची वैयक्तिक माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिका-यांनी नाकारले आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर नियमानुसार समर्पक कारवाई केली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५८०/०२**

**श्री. मदन मोहन मीश्रा,**
**१९/३, नरहरी सदन, जवाहर नगर,**
**एस.व्ही.रोड,**
**गोरेगाव(प.), मुंबइा-४०००६२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार,(सी.एस.पी.वार्ड),**
**म्हाडा को.ऑप.हौ.सो., गृह निर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सब रजिस्टार,**
**सब रजिस्ट्रार ऑफीस,बोरीवली नं.४,**
**आरे रोड, गोरेगाव(प.), मुंबई-४०००६२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. मदन मोहन मीश्रा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.९.२००९ रोजी अर्ज करुन नवीन एकता सुप्रभात सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थेच्या प्रस्तावित इमारतीतील सदनिका(३ शयनगृह),सदनिका (२ शयनगृह), सदनिका(१ शयनगृह), विक्री केलेल्या सदस्यांची यादी इत्यादी

अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.३.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.१२.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, एकता सुप्रभात सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास हवी असलेली माहिती पुरविणे सोईचे व्हावे म्हणून सर्व संबंधीत कागदपत्राचे प्रथम निरिक्षण करण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अवगत केले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७८/०२**

**श्री. दत्ताराम कृष्णा पेडामकर व इतर,**
**मरीअम्मा नगर, रुम नं.एम-२२३,**
**नेहरु सेंटर मागे,**
**डॉ.ए.बी. रोड, वरळी, मुंबई-४०००१८.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. दत्ताराम कृष्णा पेडामकर व इतर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन झोपडपट्टी धारकांबाबत निर्गमित केलेले १९९७ ते आजतागायत पर्यंत मार्गदर्शिका पुस्तक(Book) मिळण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२४.११.०९ च्या पत्रानवये खालीलप्रमाणे कळविले.

मार्गदर्शिका समाविष्ट परिपत्रके ज्या भाषेत (मराठी/इंग्रजी)निर्गमित झाली त्या भाषेतील असल्याने इंग्रजी भाषेतील परिपत्रके मराठीमध्ये उपलब्ध नसल्यान ती पुरविता यत नाही. या मार्गदर्शिकेत समाविष्ट असलेले विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) इंग्रजीमध्ये आहेत. हे नियम मराठीमध्ये उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ते उपलब्ध होताच मार्गदर्शिकेत समाविष्ट करुन विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. मार्गदर्शिका पुस्तक, त्यामध्ये करण्यात आलेले फेरबदल पुरवणीसह मराठी भाषेत देण्याची अपीलकाराची मागणी होती. मराठीमध्ये प्रत उपलब्ध झाल्यावर अपीलकाराने अर्ज केल्यावर प्रत उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.६.१.२०१० रोजी आदेश पारित केले. खोटी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, झोपडपट्टी धारकाबाबत मार्गदर्शक पुस्तिका मराठी भाषेत उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास बरोबर माहिती दिली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. उपलब्ध असलले मार्गदर्शिका पुस्तक अपीलकारास पुरविण्यात आले आहे. अपीलकाराने मागणी केल्यानुसार विशिष्ट अशी माहिती/परिपत्रक उपलब्ध नाही असे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास बरोबर माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७०/०२**

**श्री. प्रशांत सुभाष घाडगे,**
**२१/२, गोकूळ, डॉ.पेडणेकर बिल्डिंग,**
**स.म. मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियता,**
**एम/पूर्व विभाग, म.न.पा. कार्यालय,**
**शरद आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता(इ.व का.),**
**एम/पूर्व विभाग, म.न.पा. कार्यालय,**
**शरद आचार्य मार्ग,**
**चेंबूर, मुंबई-४०००७१.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. प्रशांत घाडगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.१.२०१० रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

एम पूर्व व पश्चिम या दोन्ही विभाग हद्दीमध्ये अनधिकृत बांधकामे किती झाली? किती बांधकामावर कारवाई झाली? कारवाई कशा प्रकारे झाली? ३५१ कलम नोटीस किती लोकांना

दिली? ३५४ कलम नोटीस किती लोकांना दिली आहे? ४८८ कलम नोटीस किती लोकांना दिली आहे? त्याची आपल्या अभिलेखात नोंद असलेल्या सर्वच्या सर्व दस्तऐवजांची छायांकित प्रती मिळाव्यात.

जन माहिती अधिका-यांनी असमाधानकारक उत्तर दिले असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.८.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावरील निर्णय असमाधानकारक झालाअसल्याकारणामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एम/पूर्व विभाग हद्दीतील अनधिकृत बांधकामाची झालेली माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविणे सोईचे व्हावे म्हणून जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सर्व संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण करण्याबाबत कळविले होते. परंतू कागदपत्रांचे निरिक्षण करण्याकरीता दिनांक व वेळ निश्चित करण्यात आला नाही. सदर प्रकरणी संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण दि.१७.४.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्याबाबत आयोगाने जन माहिती अधिका-यांना द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आदेशीत केले आहे. अपीलकाराने सर्व संबंधीत कागदपत्रांचे कार्यालयात उपस्थित राहून निरिक्षण करावे. या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१५.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५९७/०२**

**श्री. प्रविण एम.दाली,**
**ए/६०३,मौली को.ऑप.हौ.सो.,**
**म्युनिसिपल स्कुल जवळ,**
**मिठानगर,एम.जी.रोड, गोरेगाव(प.),**
**मुंबई-४०००६२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी/अधिकारी I/C,**
**म्हाडा, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. प्रवीण दाली यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.९.२००९ रोजी अर्ज करुन म्हाडाच्या संक्रमण शिबीराचे भाडे थकविणा-या विकासकाच्या नावाची यादी, पत्ते, प्रस्तावित इमारत बांधकामाची जागा, मंजूर चटई निर्देशांक, अवैधरित्या संक्रमण शिबिराचे गाळे ताब्यात ठेवलेल्या विकासकाच्या नावाची यादी इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.११.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन म्हाडाच्या संक्रमण शिबीराचे गाळे अवैधरित्या ताब्यात ठेवलेल्या तसेच भाडे थकविलेल्या विकासकाच्या नावांची यादी, पत्ते इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५९६/०२**

**श्रीमती पीलू बोमनजी,**
**मे.नादिरशा फिरोजशा अँड कंपनी,**
**५३, आर्केड, १ला मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर,**
**कफ परेड, मुंबई-४००००५.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उद्योग सहसंचालक,**
**औद्योगीक रसायन प्रयोगशाळा, टाटा नगर समोर,**
**डॉ.व्ही.एन.पुरव मार्ग,**
**चुनाभट्टी(पूर्व), मुंबई-४०००२२.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्रीमती पिलू बोमनजी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.१२.२००९ रोजी अर्ज करुन मेसर्स फॉरमेक इंजिनिअरिंग लि. या कंपनीस Expansion करीता ना-हरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत दि.५.१०.०९ रोजी तक्रार करुन अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१५.१.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२२.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१७.२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. अपुरी

माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मेसर्स फॉरमेक इंजिनिअरिंग कंपनीस विस्ताराकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले त्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. द्वितीय अपीलावरील दसुनावणीकरीता अपीलकार अनुपस्थित होते. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.१.२०१० च्या पत्रानुसार माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२०.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५९५/०२**

**श्री. राजन रामचंद्र पटेल,**
**एसआरए नोंदणी क्र.एमयुएम/एसआरए/एचएसजी/टी.सी./११५०८,**
**३०९, अबुबकर चाळ, हनुमान हितवर्धक सहकारी गृ.नि.संस्था,**
**सीटीएस क्र.३०(पै) जवाहर नगर, गोळीबार रोड,**
**खार(पूर्व), मुंबई-४०००५१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(उद्यान व मनोरंजन),**
**वीरमाता जीजाबाई भोसले उद्यान,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, भायखळा(पू.),**
**मुबई-२७.**

**जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी(प्र.),**
**वीरमाता जीजाबाई भोसले उद्यान,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, भायखळा(पू.),**
**मुबई-२७. ..... उत्तरवादी**

## विवेचन

अर्जदार श्री. राजन रामचंद्र पटेल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन मौजे बांद्रा(पूर्व) जवाहर

नगर, गोळीबार रोड, तहसील अंधेरी, बृहन्मुंबई महानगरपालिका एच(पूर्व) विभाग येथील नगर भूखंड या जवाहर नगर गोळीबार विभागातील भूखंडावर एकूण किती वृक्ष आहेत, तसेच किती वृक्ष नोंदणीकृत आहेत हे नोंदणीकृत वार माहिती साक्षांकित करुन मागीतली होती. सदर माहिती उद्यान अधीक्षक यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी व अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एच(पूर्व) विभागातील नोंदणीकृत वृक्षाची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेने एक नोटीफिकेशन निर्गमित करुन प्रस्तावित एकूण २१ वृक्ष तोडणीबाबत हरकती मागविल्या आहेत. सदर नोटीफिकेशन दि.६.४.२०१० चे आहे. या विभागातील बांधकाम अगोदरच सुरुअसून प्रगतीपथावर आहे. अपीलकारास आयोग असा सल्ला देते की, अपीलकाराने सक्षम प्राधिकरणाकडे तक्रार दाखल करावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६०५/०२**

**श्री. निशांत सुभाष घाडगे,**
**२१/२, डॉ.पेडणेकर बिल्डिंग,**
**स.मं.मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**एल विभाग यांचे कार्यालय,**
**सं.गो.बर्वे मार्ग, कुर्ला(प.),**
**मुंबई५ ४०००७०.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. निशांत घाडगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.८.२००९ रोजी अर्ज करुन एल विभाग हद्दीमध्ये वाडिया इस्टेट जूना कुर्ला रोड येथे होणारी पायवाट(Footpath) गटारे(दुरुस्ती/नुतनीकरण) शौचालये दुरुस्तीकरण व इंटरलॉक पेव्ह बॉक्सची विविध कामाबाबतची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एल विभागातील विविध कामाबाबत मागणी केली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमक्ष जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. सदर प्रकरणी माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४६२/०२**

**श्री. उल्हास महादेव त्रिंबके,**
**पो.बॉ.नं.१८२१२,**
**म्हाडा बंगला नं.९,**
**म्हाडा कॉलनी, मुलुंड(पूर्व), मुंबई५ ४०००८१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा करनिर्धारक व संकलक(शहर)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्य इमारत,**
**महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपकर निर्धारक व संकलक(पूर्व उपनगरे)**
**३रा मजला, महानगरपालिका यानगृह इमारत,**
**पंत नगर, घाटकोपर(पूर्व), मुंबई-४०००७५. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. उल्हास त्रिंबके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.७.२००९ रोजी अर्ज करुन श्री.म.ना.नेरुरकर,सहाय्यक करनिर्धाकर व संकलक हे कोणत्या पदावर व केव्हापासून काम करतात त्यांचा सेवा अभिलेख क्रमांक व तो कोठे असतो, वारस म्हणून कोणाला नामनिर्देशित

केले, त्यांचा वास्तव्याचा पत्ता त्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती, त्यांची निवृत्ती कधी आहे याबाबतची माहिती व्यक्तीशः हवी असल्याची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१०.८.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. अर्जातील मुद्दा क्र.३ व ५ ची माहिती व्यापक जनहिताच्यादृष्टीने मागीतलेली नसून ती नेरुरकर यांच्या खाजगी/वैयक्तिक तपशिलासंबंधी आहे. यास्तव उक्त अधिनियमातील कलम ८(त्र) मधील तरतुदीनुसार देता येणार नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.९.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. श्री.नेरुरकर यांचा सेवा अभिलेख अपीलकारास निरिक्षणासाठी द्यावा. अपीलकाराने त्यामधील आवश्यक पृष्ठाच्या छायाप्रती विहित फी आकारुन घ्याव्यात. संपत्तीबाबतची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असून व्यापक जनहिताच्यादृष्टीने प्रकट करणे आवश्यक वाटत नाही. असे दि.४.११.०९ आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्री. नेरुरकर यांचा सेवाभिलेख आणि स्थावर जंगम मालमत्तेबाबत माहिती मागीतली होती. सदर द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. सदर दि.१५.४.२०१० ची सुनावणी पुढे ढकलण्याबाबत अपीलकाराने दि.३.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास विनंती केली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. यामुळे अपीलकाराची द्वितीय अपीलावरील सुनावणी पुढे ढकलण्याची मागणी मान्य करता येत नाही. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविलेली आहे, या परिस्थितीतमी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२०.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४९१/०२**

**श्री. भूषण भगवानदास घोडी(पटेल),**
**भगवानदास हाऊस,**
**चिंचोली बंदर रोड, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक म.न.पा.आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगर पालीका, लिबर्टी गार्डन समोर,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगर पालीका,पी/उत्तर,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. भूषण भगवानदास घोडी(पटेल) यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१२.२००९ रोजी अर्ज करुन १)श्री कृष्णा अंगारा पुजारी याने अपीलकाराची परवानगी न घेता रुमचा कब्जा करुन लोखंडी जाळी लाऊन पूर्ण बंद केले त्यावर योग्य कारवाई करावी. २) अपीलकाराच्या २५ वर्षाच्या

जुन्या चाळीचा स्लॅब तोडला, त्यावर कार्यालयाने कुठली योग्य ती कारवाई केली. श्रीकृष्णा अंगारा पुजारी यांच्या नावावर पागडी रुम आहे. सदर तक्रारीवर योग्य ती कारवाई झाली नसल्याने अपीलकाराने दि.११.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधीका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन पागडीधारक श्री.कृष्णा अंगारा पूजारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलार्थी तसेच उत्तरवादी यापैकी कोणीही हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५७९/०२**

**श्री. सुरेश धोंडीबा जोगदंड,**
**जेतवन नगर प्रभाग क्र.७,**
**घर क्रमांक ११७९,भिमज्योती किराणा स्टोअर्सच्या मागे,**
**पो.मोहोने,ता.कल्याण, जि.ठाणे. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप**
**उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, फ परिमंडळ,**
**ठाणे(प.),पिन-४००६०२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नियंत्रक शिधावाटप,**
**उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, फ परिमंडळ,**
**ठाणे(प.),पिन-४००६०२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. सुरेश कोंडीबा जोगदंड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.६.२००९ रोजी अर्ज करुन उप नियंत्रक शिधावाटप कार्यालय फ परिमंडळ,ठाणे स्थापन झाल्यापासून आजतागायत एकत्रित एकूण ५ मुद्यावर माहिती मागीतली होती. अर्धवट माहिती मिळाली, ती दिशाभूल करणारी आहे. ३८- फ कल्याण यांनी मुद्दा क्र.२ ची माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१५.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.३०.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. शिधा वाटप अधिकारी ३८-फ कल्याण यांना १९ पृष्ठाची माहिती दि.११.११.०९च्या पत्रानुसार पोचदेय डाकेने पाठविली होती ती अपीलकारास मिळाली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे नमूद करुन प्रथम अपीलीय

अधिका-यांनी दि.३.१२.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, उपनियंत्रक शिधावाटप कार्यालय फ परिमंडळ ठाणे कार्यालयाबाबत अनुषंगिक ५ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. शिधावाटप कार्यालय क्र.३८ फ, कल्याण यांनी दि.११.११.०९च्या पत्रानुसार टपालातून माहिती पाठवली असून ती अपीलकारास मिळाली असल्याचे आयोगास सांगितले, परंतू सदर माहिती मिळाली नसल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादनकेले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई | **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२१.४.२०१० | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६६८/०२,**

**श्री. संजय गंगाराम पवार,**
**मेरवानजी अंबावाडी,**
**जहांगीर मेरवानजी पथ,**
**परळ, मुंबई-४०००१२. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पू.),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.संजय गंगाराम पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२२.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.२.०९ रोजी अर्ज करुन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये फक्त मॅनग्रोव्हण पासून ५० प्रकल्पाच्या विकसनास स्थगिती देण्यात आली. याबाबत खुलासा करुन सदर पर्यावरण निर्बंध बाधीत भूखंडाचा आराखडा व निवारा प्रकल्पाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहिती संकलीत करण्याचे काम सुरु असून ते पूर्ण झाल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले होते. त्यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/३२०४/०२ हे दाखल केले होते.

परंतू गैरतक्रारदाराने त्यानंतरही तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारदाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची होती. सदर माहिती संकलीत करण्यात येत होती. मागणी केलेली माहिती संकलीत केल्यानंतर तक्रारदारास पुरविण्यात येईल असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले होते. त्यानुसार गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.११.९.०९च्या पत्रान्वये मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचा लेखी अहवाल गैरतक्रारदाराने आयोगास सादर केला.यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः१३.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६७४/०२,**

**श्री. विजय के. मंथेना,**
**इमारत क्र.७, रुम नं.३४,**
**अब्दुल मेन्शन वेलफेअर सोसायटी,**
**हरियानावाला लेन,स्टेशन रोड,**
**कुर्ला(प.),मंबई-४०००७०. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**इमारत व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,सं.गो.बर्वे मार्ग,**
**कुर्ला(प.),मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.विजय मंथेना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.२२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१७.२.०७ रोजी अर्ज करुन श्री. दिगंबर मा.नाईक यांनी त्रिभुवनदास इमारत क्र.८ तळमजला +१ अशा स्वरुपाचे किंग्ज नावाचे दुकानाचे अनधिकृत बांधकाम केले याबाबत अनुषंगिक १० मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००८/७०३/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास सुसंगत माहिती दिली नाही. तक्रारदारास विसंगत माहिती दिली होती.

सदर विसंगती दूर करुन दुकानाचे बांधकाम अधिकृत की अनधिकृत याबाबत ३० दिवसाचे आत तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२७.८.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानतरही तक्रारदारास माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

दुकानाच्या अनधिकृत बांधकामाबाबत गैरतक्रारदाराने तक्रारदारास विसंगत माहिती पुरविली होती. सदर विसंगती दूर करुन तक्रारदारास सुसंगत माहिती कळवावी असे आयोगाचे दि.२७.८.०८ चे आदेश आहेत. गैरतक्रारदाराने सदर आदेशाचे पालन केले नाही. तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरण्यात यावे. गैरतक्रारदाराच्या सदर प्रमादाबद्दल त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करण्यात येऊ नये याबाबत ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/५७६/०२,**

**श्री. जयेश शांताराम झगडे,**
**द्वारा श्री. नामदेव रघुनाथ रहाटे,**
**२-६ दोशी इस्टेट, सुंदर बाग,**
**इंदिरा नगर, कमानी कर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा नायक तहसिलदार,**
**स्लम रिहॅबीलिटेशन ॲथॉरिटी,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.जयेश शांताराम झगडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.११.२.०९ रोजी अर्ज करुन साल्पादेवी सदन सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती संबंधीची फाईल/कागदपत्र शोधूनही सापडत नसल्याच्या कारणावरुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/३३३९/०२ हे दाखल केले होते. तक्रारदाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची फाईल सापडत नाही म्हणून माहिती पुरविता येत नाही असे उत्तर देता येणार नाही. तरी तक्रारदाराने मागणी

केलेल्या विषयासंबंधीची फाईल/कागदपत्राचा जाणीवपूर्वक शोध घेऊन तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयोगाने दि.५.१०.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. श्री.राजेश दत्ताराम झगडे यांना साल्पादेवी सदन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिकेसाठी कोणती कागदपत्रे ग्राहय धरली त्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीची तक्रारदाराने मागणी केली आहे. सदर प्रकरणी जयेश शांताराम झगडे आणि श्री.राजेश दत्ताराम झगडे यांना साल्पादेवी सदन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या गाळेवाटपाकरीता एकाच कागदपत्राच्या संचाच्या आधारे पात्र ठरविण्यात आले असल्याची बाब तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारदाराने आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. याबाबत केलेल्या कारवाईबाबतची माहिती गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६८०/०२,**

**श्री. किर्तीभाई रतनचंद वोरा,**
**४-४७ सेफ सोसायटी,**
**लम्बे हनुमान रोड, वराछा,**
**सुरत.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा असि.रजिस्ट्रार,**
**को.ऑप.सोसायटीज,महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई(परसेवा), दि.बृहन्मुंबई नागरी सह.बँक असो.,**
**वडाळा, मुंबई.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.किर्तीभाई वोरा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१४.७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार उशिराने हजर झाले. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन तक्रारदाराकडून करण्यात येणा-या वसूलीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.३३/०२ हे दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही असे आयोगाने दि.२८.४.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरीता अनुपस्थित होते. गैरतक्रारदार उशिराने आले. तक्रारदाराने माहिती प्राप्त केली असल्याची  बाब गैरतक्रारदारानी पोच पावती दाखवून आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. यावरुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. तक्रारदारास, गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२१.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६९९/०२,**

**श्री. संजय रामचंद्र शिर्के,**
**५४,रिज रोड,शिवा सदन,**
**सागर दिप, मलबार हिल,**
**मुंबई-४००००६.** **..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण डी),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**सहाय्यक आयुक्त डी विभाग यांचे कार्यालय,**
**२रा मजला, जोबनपुत्रा कंपाऊंड,**
**नाना चौक, ग्रँट रोड,**
**मुबई-४००००७.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.संजय रामचंद्र शिर्के यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१६.९.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२२.२.०८ दि.१९.३.०८, दि.२८.४.०८, दि.१९.५.०८ व दि.१४.८.०८ रोजी अर्ज करुन विविध विषयावर माहिती मागीतली होती. गैरतक्रारदार माहिती पूर्ण न देता कलम २ नुसार(च)व (ज)हे लिहून माहिती देता येत नाही असे कळवितात.(च)व (ज)याचा खुलासा मागीतला असता खुलासा दिला नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे थेट तक्रार दाखल केली.

सदर तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार अनुपस्थित होते. गैरतक्रारदारानी आयोगासमोर प्रतिपादन केले की, तक्रारदारास वेळोवेळी माहिती पुरविण्यात अली आहे.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२१.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७०४/०२,**

**श्री. हरीलाल पी. शहा,**
**ए-२०१, रुपल अपार्टमेंट,**
**शिवाजी चौक, दफ्तरी रोड,**
**मालाड(पूर्व), मुबई-४०००९७.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्ट्रार,**
**को.ऑप.सोसायटीज,**
**मल्होत्रा हाऊस, ६वा मजला,जी.पी.ओ.च्या समोर,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.हरीलाल शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.१२.०७ रोजी अर्ज करुन दप्तरी रोड रेल्वे स्टेशन जवळील मालाड(पूर्व), मुंबई येथील फीलका सहकारी गृहनिर्माण संस्था आणि नवीन दुकान मालक प्रीमायसेस सहकारी संस्था ली. बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या उत्तराने तक्रारदाराचे समाधान झाले नाही. यामुळे तक्रारदाराने अपील क्र.१३२३/०२ हे राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले होते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२७.११.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन आयोगाकडे तक्रार दाखल केली.

कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तक्रारदारास पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई — **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२१.४.२०१० — **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७०३/०२,**

**श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण,**
**३९/२१३, नवजीवन हौसिंग सोसायटी,**
**इंदिरा नगर पोलीस चौकीसमोर,**
**सर्व्हिस रोड,सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००५५.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी,**
**प्रशासन कक्ष,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. सूर्यकांत गंगाराम चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.८.४.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारीत गैरतक्रारदाराकडे दि.२०.२.२००८ रोजी अर्ज करुन दि.१जानेवारी,१९९५ रोजी झोपडीत वास्तव्य करणा-या झोपडी मालकाने आपली राहती मूळ झोपडी १ जानेवारी,१९९५ नंतर अन्य दुस-या व्यक्तीस खरेदी खत करुन विकली असल्यास झोपडी विकत घेणारा नवीन व्यक्ती झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मोफत सदनिका घेण्यास कोणत्या आधारावर वा निकषावर परिशिष्ट-२ मध्ये पात्र ठरतो व ही पात्रता सिध्द करण्यासाठी नवीन घर मालकास कोणकोणते पुरावे/कागदपत्र प्राधिकरणास सादर करावे लागतात याबाबत माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती उक्त अधिनियमातील कलम २(च)मध्ये समाविष्ट नाही असे कळवून गैरतक्रारदाराने माहिती नाकारली. यामुळे तक्रारदाराने

राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक १५१५/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली नव्हती. म्हणून प्रथम अपीलीय अधिका-यांनी ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत असे आयोगाने दि.१४.१.०९ रोजी आदेश पारित केले होते. परंतु सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी आयोगाच्या दि.१४.४.०९ च्या आदेशाचे पालन केले नाही. याकरीता प्रथम अपीलीय अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याबाबत अप्पर मुख्य सचिव, म.व व.वि. यांचेकडे शिफारस का करण्यात येऊ नये याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाच्या आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२१.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६९४/०२,**

**श्री. अफजल शेख,**
**बी-४, यश गौरव हौसिंग सोसायटी,**
**नं.११५ गेट नं.८, म्हाडा मालवणी,**
**मालाड(प.),मुंबई-४०००९५. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालीका,पी/नॉर्थ विभाग,**
**लिबर्टी गार्डन,मामलेदारवाडी,**
**मालाड(प.), मुंबई-४०००६४. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. अफजल शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३.२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२१.३.०७ व ७.४.०७ रोजी अर्ज करुन १)मालवणी क्र.१बी.एस.सी. कॉलनीसमोर असलेल्या साधना बिअर बारच्या तळमजला अधिक पहिला मजल्याच्या बांधकामाची माहिती २)इजीम बिल्डिंग, गोरेगाव स्पोर्ट क्लबच्या मागे, रहेजा ले आऊट, लिंक रोड, मालाड(प.) ही इमारत कमर्शिअल असतांना त्यातील काही गाळयांमध्ये लोखंडी चॅनेल टाकून पोटमाळे काढण्यात आले आहेत. या दोन्ही मुद्याबाबतची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत तक्रारदारास माहिती दिली नाही. यमुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील के.१०७७/०२ हे दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२४.१०.२००८ रोजी आदेश पारित केले होते.

त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर झाले नाहीत. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. राज्य माहिती आयोगाच्या दि.२४.१०.२००८च्या आदेशाचे पालन केले नाही. याकरीता गैरतक्रारदारास जबाबदार धरुन गैरतक्रारदाराविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार रु.२५०००/- इतकी शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२१.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६९१/०२,**

**श्री. समीर सबरवाल,**
**२,ग्रोटो प्लॉट ५५३,**
**३३वा रस्ता, जुने खार,**
**मुंबई-४०००५२.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालीका,एच/प. विभाग,**
**सेंट मार्टीन्स रोड, बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. समीर सबरवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२९.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडें दि.९.८.०८ रोजी अर्ज करुन एम.आर.टी.पी.नोटीस क्र.एचडब्ल्यू/बीएम/iv/५३(१)१३२७/०६ दि.२२.७.२००६ बाबत मुंबई महानगरपालिकेने केलेल्या कारवाईसंबंधीच्या फाईलच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. तक्रारदाराने प्रथम कार्यालयात हजर राहून सर्व संबंधीत फाईलचे निरिक्षण करावे. त्यानंतर मागणीनुसार आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती पुरविण्यात येतील असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१०.९.०८ च्या पत्रान्वये कळविले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी तक्रारदारास १५ दिवसाचे आत मागणीनुसार माहिती पुरविण्याबाबत दि.४.११.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानुसार गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.२०.१२.०८ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती पुरविली. दरम्यानच्या कालावधीत तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे तक्रारीवरील

सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. तक्रारदार सुनावणीकरीता अनुपस्थित होते. या प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई

दिनांक:२१.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**

**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६९३/०२,**

**श्री. मच्छिंद्र कारळकर,**
**हजाराबाई हाऊस, रुम नं.५,**
**ईर्ला सोसायटी रोड, विलेपार्ले(प.),**
**मुंबई-४०००५६.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालीका, के/प. विभाग,**
**अंधेरी(प.),मुंबई-४०००५८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. मच्छिंद्र कारळकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१५.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२१.८.०७ रोजी अर्ज करुन ईर्ला सोसायटी रोड,विलेपार्ले(पूर्व), मुंबई येथील सक्तीच्या मोकळया जागेवरील खाद्यपदार्थ विक्रीच्या दुकानाची नावे व इतर अनुषंगिक एकूण ८ मुद्यांवर माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.९७९/०२ हे दाखल केले होते. अपीलकारास सदर प्रकरणी १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी अन्यथा गैरतक्रारदाराविरुध्द दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत खुलासा सादर करावा असे आयोगाने दि.२७.१०.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतर माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन कले आहे.तक्रारदारास माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२१.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७०१/०२,**

**श्री. जयप्रकाश एस. तिवारी,**
**बी-१०६, सुंदरधाम को.ऑप.हौ.सो.लि.,**
**रामबाग लेन,एस.व्ही.रोड,**
**बोरीवली(प.), मुंबई.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था(३) पश्चिम उपनगरे,**
**मुंबई गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**बांद्रा(पू.), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. जयप्रकाश तिवारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.३१.१२.२००७ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२२.१२.०६ रोजी अर्ज करुन सहकारी संस्था, आर विभाग, मुंबई यांचेकडील दि.२३.४.०४,२२.१.०६, ८.३.०६ व दि.८.८.०६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने श्री.जयंत के. शहा यांचे संस्थेच्या दफ्तरातून नाव वगळण्याबाबत कोणते आदेश पारित केले आहेत याबाबतची माहिती मागीतली होती. तक्रारदारास माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी गैरतक्रारदारास आदेश दिले होते. त्यानंतरही माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले आहेत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराच्या दि.२३.४.०४च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती गैरतक्रारदाराने तक्रारदारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२१.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७००/०२,**

**श्री. मिलींद रामराव फडतरे,**
**२/४, रहिम खोत चाळ,असल्फा व्हिलेज,**
**घाटकोपर(प.), मुंबई-४०००८४.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षण निरिक्षक(उत्तर विभाग),**
**प्रशासकीय इमारत, फाईन आर्ट गॅलरीजवळ,**
**रेशनींग ऑफीसच्या वर, २रामजला,**
**चेंबूर(पूर्व),** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. मिलींद पडतरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१.१.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१४.७.०८ रोजी अर्ज करुन घाटकोपर पश्चिम १३/८, रुमानी मंझील असल्फा व्हिलेज या क्षेत्रात प्रेरणा टायपींग इन्स्टिटयूट या संस्थेस कार्यालयाकडून शासन मान्यता दिली आहे काय? दिली असल्यास सदरची संस्था कायदेशीर किंवा बेकायदेशीर ठरते याचा लेखी खुलासा इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदाराच्या माहिती अधिकाराबाबत शिक्षण निरिक्षक,बृहनमुंबई उत्तर विभाग यांना चौकशी करणेबाबत कळविले असून त्यांचेकडून चौकशी पूर्ण झाल्यानंतर तक्रारदारास माहितीची

प्रत देण्यात येईल असे गैरतक्रारदाराने दि.२५.७.०८च्या पत्रान्वये कळविले होते. तक्रारदारास श्री.अमेय कमर्शियल टाईपरायटींग इन्स्टिटयूट बाबतच्या चौकशी अहवालाची प्रत दिली आहे असे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. प्रेरणा टाईपरायटींग इन्स्टिटयूट १३/८ रुमानी मंझील असल्फा व्हीलेज या संस्थेच्या चौकशी अहवालाची प्रत पुरविण्यात आली नसल्याचे तक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादनद केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास प्रेरणा इन्स्टिटयुटच्या चौकशी अहवालाची प्रत टपालातून पाठवावी.

## आदेश

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२१.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५८१/०२**

**श्री. अशोक पांडूरंग जाधव,**
**२५६/२, डॉ.आंबेडकर चौक,**
**कुर्ला(प.), मुंबई-४०००३२.** .... **अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपनियंत्रक,**
**उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, इ परिमंडळ,**
**चंचल स्मृती इमारत, १ला मजला, ग.द.आंबेकर मार्ग,**
**वडाळा, मुंबई-४०००३१.**

**जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी,**
**उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, इ परिमंडळ,**
**चंचल स्मृती इमारत, १ला मजला, ग.द.आंबेकर मार्ग,**
**वडाळा, मुंबई-४०००३१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. अशोक पांडूरंग जाधव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१२.२००९ रोजी अर्ज करुन घासलेट/रॉकेलचा शासनाचा दर किती रुपये किती पैसे आहे, शिधावाटप धारकास देण्यात येणा-या पावत्यांचा नोंद बुकामधील उतारा इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२७.१२.२०१० रोजी अपील दाखल केले. शिधावाटप अधिका-यांनी देय असलेली माहिती लेखी स्वरुपात अपीलकारास दि.९.२.२०१० पर्यंत द्यावी असे दि.८.२.२०१० रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.८.२.२०१० रोजीच माहिती दिली. अर्धवट व चुकीची माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी व अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, घासलेट अधिक दराने विक्री केली जात असल्याबाबत तक्रार करुन त्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास सल्ला देण्यात येतो की, त्यांनी याबाबत एक तक्रार दाखल करावी. उत्तरवादीने यामध्ये लक्ष घालून घासलेट विक्रीत विक्रेत्याकडून अधिक दर आकारणी करुन विकण्यात येणा-या घासलेट विक्रेत्यावर आवश्यक ती कारवाई करावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२१.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६११/०२**

**श्री. पप्पू खान,**
**अमन अपार्टमेंट,(लेडी रतन कॉम्प्लेक्स),**
**भारत नगर, बि.नं.१,६वा मजला,**
**रुम नं.६०१, डी.एस.रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**जी/दक्षिण विभाग कार्यालय,**
**ना.म. जोशी मार्ग, परेल,**
**मुंबई-४०००१३.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीयअधिकारी(मालमत्ता),**
**जी/साऊथ वार्ड कार्यालय,**
**ना.म. जोशी मार्ग, परेल,**
**मुंबई-४०००१३. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. पप्पू खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१२.२००८ रोजी अर्ज करुन भारत नगर,वरळी येथे गाळा क्र.६/अ, ७१/अ, ७१/ब, ७१/क या ठिकाणी अनधीकृत पोटमाळे बांधले असल्याने त्यावर कारवाई करण्याची अपीलकाराने मागणी करुन अनुषंगिक माहिती मागीतली होती. भारत नगर, वरळी येथे गाळा क्र.६/अ,७१/अ, ७१/ब, ७१/क येथे पोटमाळे बांधकाम करण्यात ना-हरकत प्रमाणपत्र अथवा परवानगी दिलेली नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.१.१२.०८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी स्थळ निरिक्षण करुन अनधीकृत बांधकाम आढळल्यास नोटीस जारी करावी असे आदेश दि.२३.५.०९

रोजी पारित केले. त्यानंतर अनधीकृत बांधकाम निष्कासित केले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते/अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचल लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अनधीकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत मागणी केली होती. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकारास मागणीनुसार आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२२.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५८३/०२**

**श्री. विनय दशरथ दुबे,**
**रामराज तिवारी चाळ, रुम नं.१,**
**मालपा डोंगरी नं.१,आझाद रोड,**
**अंधेरी(पूर्व), मुंबई-४०००९३.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, एच पूर्व विभाग,**
**सहकार बाजार,४था माळा, वांद्रे(प.),**
**वांद्रे रेल्वे स्टेशन समोर,**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. विनय दशरथ दुबे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.२.२००९ रोजी अर्ज करुन सुंदर नगर कालीना सहकारी गृहनिर्माण संस्था लि. येथील सदनिका ए/११-४४ हस्तांतरीत केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याकारणाने संस्थेशी संपर्क साधून माहिती घेण्यात यावी असे उत्तरवादीने अपीलकारास दि.९.३.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२८.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सुंदरनगर कालीना सहकारी गृहनिर्माण संस्था येथील श्रीम.मनुराणी भोसे यांची सदनिका श्री.मनीश गुहा यांचे नावे हस्तांतरित केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती संस्था स्तरावरील असल्याच्या कारणावरुन अपीलकारास माहिती नाकारण्यात आली आहे. सुंदरनगर कालीना गृहनिर्माण संस्थेतील जागा कोणत्या कारणावरुन श्रीम.मनुराणी भोसे यांच्या नावावरुन श्री.मनीश गुहा यांच्या नावावर हस्तांतरित करण्यात आली याबाबतची बरोबर माहिती अपीलकारास कळवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई<br>दिनांक:२२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**<br>**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६१७/०२**

**श्री. कुंदन प्रसाद सिंह,**
**जुने अरविंद महिला कॉलेजच्या समोर,**
**कदम कुआ,**
**पटना, बिहार-८००००३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-३, भायखळा,**
**मुंबई-२७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावला कंपाऊंड, भायखळा,**
**मुंबई-४०००२७. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. कुंदन प्रसाद सिंह यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.७.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.३.२००९ रोजी अर्ज करुन कुर्ला बैलबाजार येथे बेस्ट बसमध्ये झालेल्या गोळीबाराचे अनुषंगाने विनोबा भावे नगर पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.२१६/०८ संबंधी अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहितीचा अधिकार कलम ८(१) (छ)(ज)अन्वये साक्षीदार व गुन्हयाचे तपासाचे सुरक्षीततेच्या दृष्टीने अर्जदार यांनी मागणी केलेली कागदपत्र देण्याचे नाकारले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.८.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. माहितीचा अधिकार कलम ८(१)(छ) (ज) अन्वय प्रथम अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन विनोबा भावे नगर पोलीस ठाण्यात दाखल गु.र.क्र.२१६/०८ बाबत प्रथम खबरी अहवाल, इन्क्वेस्ट पंचनामा,शवविच्छेदन अहवाल, रासायनिक विश्लेषणाचा अहवाल,बॅलेस्टीक रिपोर्ट इतर कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली होती. बेस्ट बसमध्ये झालेल्या गोळीबारात राहूल राज(वय वर्षे २४) यांचा मृत्यू झाला. यासंबंधीची माहिती अर्जदारास दिल्यास गुन्हयातील साक्षीदार तसेच गुन्हयाचे तपासावर त्याचा विपरित परिणाम होण्याची शक्यता असल्याच्या कारणावरुन राहूलराज यांचे वडील श्री.कुंदन प्रसाद सिंग,अपीलकार यांना उत्तरवादीने माहिती नाकारली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५८८/०२**

**श्रीमती उमा अशोम मंचेकर,**
**गणेश कृपा सोसायटी,शंकरपाडा नं.२, स्मशानभूमी रोड,**
**डहाणुकर वाडी, कांदीवली(प.),**
**मुंबई-४०००६७. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विशेष),**
**परिमंडळ ७,उपायुक्त(परि.७)यांचे कार्यालय,**
**३रा मजला,आर/दक्षिण विभाग कार्यालय,**
**स.व प. तरणतलावाजवळ, एम.जी.छेद रस्ता क्र.२,**
**कांदीवली(प.), मुंबई-४०००६७.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी(आर),**
**परिमंडळ ७,उपायुक्त(परि.७)यांचे कार्यालय,**
**३रा मजला,आर/दक्षिण विभाग कार्यालय,**
**स.व प. तरणतलावाजवळ, एम.जी.छेद रस्ता क्र.२,**
**कांदीवली(प.), मुंबई-४०००६७.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(परिरक्षण),**
**आर/दक्षिण विभाग कार्यालय,**
**स.व प. तरणतलावाजवळ, एम.जी.छेद रस्ता क्र.२,**
**कांदीवली(प.), मुंबई-४०००६७. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्रीमती उमा शंकर मंचेकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१२.२००९ रोजी अर्ज करुन सन २००१ ते २००४ या साली बृहन्मुंबई महानगरपालिकेने लिंकींग रोडकरीता शंकरवाडा क्र.

स्मशानभूमी रोड,डहाणूकरवाडी, कांदीवली(प.),मुंबई या विभागातील रहिवाशांची घरे तोडण्यापूर्वी नोटीस व घरे घेतांना ॲग्रीमेंट लेटर व घराचे कागदपत्र देणेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. नोटीस व ॲलॉटमेंट लेटर्स कार्यालयात सापडत नसल्याकारणाने शोधण्याचे काम सुरु आहे व ते प्राप्त होताच कळविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.१५.१.२०१०च्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे थेट द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते, सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सन २००१ ते २००४ या कालावधीत लींकींग रोड शंकरपाडा क्र.२ स्मशानभूमी रोड, डहाणूकर वाडी, कांदीवली(प.), मुंबई-४०००६७ या ठिकाणी रोड कटींग करतांना ४१४ रहिवाशांची बृहन्मुंबई महानगरपालिकेने घरे तोडली व त्यांना वसाहत विभागाने घरे दिली. कोणत्या रहिवाशांना विभागाने घरे दिली, घरे देतांना त्यांना कोणकोणते पेपर दिले, ॲलॉटमेंट लेटर व अन्य कोणती कागदपत्र दिली याबाबतची अपीलकाराने माहिती मागीतली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, ज्या ४१४ झोपडीधारकांना पर्यायी घरे देण्यात आली त्या सर्व संबंधीत व्यक्तींच्या नावाची यादी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५०९/०२**

**श्री.मोहन हसन शेख,**
**१२६,५/७ एम ब्लॉक,व्ही.पी.नगर,**
**डॉ.बेझंट रोड,वरळी, मुंबई-४०००१८ .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.मोहम्मद हसन शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.९.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)एल.ओ.आय.मिळविण्यासाठी जे प्रपोजल आपल्या कार्यालयात सादर करण्यात आले त्याची प्रत द्यावी.

२)आय.ओ.ए. मिळविण्यासाठी जे प्रपोजल आपल्या कार्यालयात सादर करण्यात आले त्याची प्रत द्यावी,

३)सी.सी. मिळविण्यासाठी जे प्रपोजल आपल्या कार्यालयात सादर करण्यात आले त्याची प्रत द्यावी.

४)इरादापत्र व ते मिळविण्यासाठी प्रपोजल सादर केले त्याची प्रत द्यावी

५)लेआऊट प्लान/टेबल प्लॅनची प्रत द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले की, अपीलकाराने मागीतलेली माहिती ही अस्पष्ट असल्यामुळे अपीलकाराने कार्यालयातील उपलब्ध दस्तऐवज, अभिलेख व सामुग्रीचे निरिक्षण करावे. त्यानंतर अपीलकाराने सुचित केलेली उपलब्ध माहिती अपीलकारास पुरविण्यात येईल असे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन टॉप वर्थ कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,व्ही.पी.नगर यांनी एल.ओ.आय.,आय.ओ.डी., सी.सी. मिळविण्याकरीता सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रती इरादापत्र मिळविण्यासाठी प्रपोजल सादर केले त्याची प्रत लेआऊट प्लॅन/टेबल प्लॅनच्या प्रतीची मागणी केली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे कागपत्राच्या प्रती देणे सोईचे व्हावे म्हणून उत्तरवादीने कार्यालयात उपस्थित राहून सर्व संबंधीत फाईल/कागदपत्राचे प्रथम निरिक्षण करावे. त्यानंतर मागणीनुसार उपलब्ध कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास पुरविण्यात येतील असे दि.४.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. अपीलकार कार्यालयाकडे फिरकलेच नाहीत. त्यामुळे अपीलकारास माहिती पुरविता आली नसल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५०८/०२**

**श्री.दिपक लक्ष्मीचंद फुरीआ,**
**लक्ष्मी स्टोअर्स, शॉप नं.३,**
**देधिआ हाऊस, बाभाई नाका,एल.टी.रोड,**
**बोरीवली(प.), मुंबई-४०००९१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका, इ विभाग कार्यालय,**
**३रा मजला, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**शहर २, बृहन्मुंबई महानगरपालिका, इ विभाग कार्यालय,**
**३रा मजला, १० शेख हफिजुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. दिपक लक्ष्मीचंद फुरीआ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.८.२००९ रोजी अर्ज करुन होसमजी एडनवाला रोड,दादर माटुंगा इस्टेट, माटुंगा विभाग, एफ विभाग, मुंबई महानगरपालिका येथील प्लॉट क्र.४७६ व ४७७ सी.टी.स.क्र.७६१/१० व ७६२/१० येथील इमारतीचे पुर्नविकासाकरीता सादर कलेल्या प्रस्तावाची फाईल क्र.इइबीपीसी/९१३३/एफएन/अे या इमारती प्रस्तावाच्या फाईल मधील कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. अपीलकाराने मागणी कलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र कार्यालयात उपलब्ध आहेत. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून सर्व संबंधीत कागदपत्राचे प्रथम निरिक्षण करावे. त्यानंतर आवश्यक शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी दि.२३.९.०९ रोजी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१४.१०.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल

कले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन इमारतीच्या पुनर्विकासाकरीता सादर केलेल्या प्रस्तावाच्या फाईलमधील कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली आहे. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून उत्तरवादीने अपीलकारास कार्यालयात उपस्थित राहून सर्व संबंधीत कागदपत्र/फाईलचे निरिक्षण करुन निवडक कागदपत्रांच्या छायाप्रती प्राप्त करुन घेण्याबाबत दि.२३.९.२००९ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्याची उत्तरवादीने तयारी दर्शविली आहे परंतू अपीलकार कार्यालयाकडे फिरकले नाहीत असे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५०७/०२**

**श्री. अनिल दौलत राणे,**
**६०१, साईपुजा अपार्टमेंट,एफ विंग,**
**६वा मजला हरियाली व्हीलेज,**
**विक्रोळी(पूर्व), मुंबई-४०००८३. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग,**
**एल.बी.एस.मार्ग, भांडूप(प),मुंबई-४०००७८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ व का),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग,**
**एल.बी.एस.मार्ग, भांडूप(प.),**
**मुंबई-४०००७८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अनिल दौलत राणे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.८.१०.२००९ रोजी अर्ज करुन साईपूजा अपार्टमेंट, एफ विंग, हरियाली व्हिलेज, विक्रोळी(पू.), मुंबई येथील अपीलकाराच्या शेजारील सदनिका धारक कु.रुपाली पेडणेकर, रुम क्र.६०२ यांनी मुख्य दरवाजा अनधिकृतपणे कायम स्वरुपी सरकविल्यामुळेअपीलकारास होणा-या त्रासाबाबत दि.१३.१२.०७, ४,६,०८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. मागीतलेल्या माहितीसाठी स्वतः अपीलकाराने कार्यालयात कामाचे दिवशी दुपारी ३ ते ५ या वळेत प्रत्यक्ष येऊन हवी असलेली माहिती आवश्यक ते शुल्क भरुन घेऊन जावी असे जन माहिती अधिका-यांनी दि.१६.११.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.११.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,पथम अपीलीय अधिकारी व अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराच्या दि.१३.१२.०७ व ४.६.०८च्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. साईपूजा अपार्टमेंट एफ विंग,६वा मजला हरियाली व्हीलेज, विक्रोळी(पूर्व) या संस्थेतील अपीलकाराच्या शेजारील क्र.६०२ सदनिका धारकाने सदर सदनिकेच्या प्रवेशद्वारामध्ये फेरबदल केल्यामुळे कार्यालयाकडून कोणत्या प्रकारची कारवाई(कायदेशीर) करण्यात आली याबाबत माहिती मागीतली आहे. सदनिका क्र.६०२ धारकाकडून मान्यता प्राप्त कागदपत्र व नकाशे विभागास सादर करण्यास कळविण्यात आले असून कागदपत्र व नकाशे प्राप्त होताच योग्य त्या छाननी अंती कारवाई करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास कळवावी. अपीलकाराच्या शेजारील सदनिका क्र.६०२ धारकाने सदनिकेचे मुख्य प्रवेशद्वार हलवून अपीलकाराच्या दरवाजाच्या बाजूने सरकविले आहे ते मूळ ठिकाणी बसविण्यासंबंधी केलेल्या कारवाईची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास कळवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४५४५/०२**

**श्री.सदानंद शंकर मिटबावकर,**
**२३,अंबरप्रसाद को.ऑप.हौ.सो.लि.,**
**२/ब, जन. अरुण वैद्य नगर,रेक्लमेशन,**
**बांद्रा,(प.), मुंबई-४०००५०** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ-९, बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**परिमंडळ-९, बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. सदानंद शंकर मिटबावकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.९.२००९ रोजी अर्ज करुन श्रीमती विभूती विपूल मिटबावकर यांनी त्यांच्या सासू,सासरे, चुलत सासरे, दोन नणंदा व पती यांच्याविरुध्द मानसिक,शारिरिक छळ केल्यासंबंधी बांद्रा पोलीस ठाण्यात तक्रार केली. कार्यालयाच्या अभिलेखावर नोंदणी झालेल्या नोंदी, पत्रव्यवहार व पोलीस चौकशी अहवाल इत्यादी माहिती विषयीच्या छायाप्रती, ठाणा डायरी व गुन्हे डायरीच्या प्रती वरिष्ठ अधिकारी,कार्यालये व कोर्ट यांना सादर केलेल्या पोलीस अहवालाच्या प्रती इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. प्रकरण न्यायप्रविष्ठ असून न्यायालयाच्या अखत्यारीत येत आहे. तरी माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१)(ख)प्रमाणे मागणी केलेली माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२२.१०.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.४.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समाधानकारक माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी

दि.३०.११.०९ रोजी प्रथम अपीलावर आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन श्रीम.विभूती मिटबावकर यांनी बांद्रा पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (१)(ख) अनुसार माहिती पुरविता येत नाही असे उत्तरवादीने अपीलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी अपीलकाराने काही पत्रव्यवहार केला असल्यास त्याच्या प्रती व पोलीस स्टेशनच्या डायरीच्या प्रती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवाव्यात.

## <u>आदेश</u>

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई  
दिनांक:२२.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**  
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६१८/०२**

**श्री. किशोर दिगंबर गायकवाड,**
**मु.पो.रिधोरे,मा.माढा,**
**जि.सोलापूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव(रोहयो),**
**रो.ह.यो.-३, नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी,**
**रो.ह.यो.-३, नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. किशोर दिगंबर गायकवाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.९.२००९ रोजी अर्ज करुन रोजगार हमी योजना सुरु झाली तो कालावधी,सध्या रोजगार हमी योजना कुठल्या नावाने सुरु केली, रोहयो अंतर्गत काम करणारे महाराष्ट्रातील सर्व हजेरी सहाय्यकांची यादी मिळावी, हजेरी सहाय्यकाबाबत २६ मे,१९९३ ते ३१मे १९९३ हा कालावधी अस्तित्वात आला त्याची माहिती मिळावी, सदरच्या पाच दिवसामध्ये रोजगार हमी योजनेवरील काम करणारे हजेरी सहाय्यक यांच्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला, त्या निर्णयाच्या छायाप्रती इत्यादी एकूण १३ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१०.११.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. उत्तरवादीने अपीलकारास चुकीची माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१८.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.११.०९ च्या पत्रान्वये माहिती दिली. उत्तरवादीने दिलेल्या माहितीचे समर्थन केले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी व अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, रोजगार हमी योजनेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास दि.१०.११.२००९च्या पत्रानुसार माहिती पुरविली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६२२/०२**

**श्री. वालजीभाई त्रिकमभाई गोहिल,**
**४०४, अनमोल अपार्टमेंट, ४था मजला,**
**दत्तमंदिर रोड जवळ, दत्तमंदिर अपार्टमेंट समोर,**
**मालाड(पूर्व), मुंबई-९७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव(झो.पु.प्रा.),**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी(एस.आर.ए.),**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारण,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. वालजीभाई त्रिकमभाई गोहिल, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.११.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.४.२००९ रोजी अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासंदर्भातील झोपडपट्टी धारकांची पात्र, अपात्र मोडणा-या कामाबाबत एकूण ९ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी संपूर्ण माहिती कळविली नसल्याने अपीलकाराने दि.२२.६.७९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास दि.२६.३.१९९८, १४.५.१९९८, २५.१०.२००१ व २१.९.०४ च्या शासन परिपत्रकाच्या प्रती द्याव्यात व अर्जातील इतर मुद्दे अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असल्याने पत्रान्वये त्यांना कळविण्यात आले आहे असे दि.१२.८.०९ रोजी आदेश पारित केले. अपूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपलकाराने राज्य माहिती अधिका-याकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन झोपडपट्टी पुनर्वसवन प्राधिकरणासंदर्भातील झोपडपट्टी धारकांची पात्र,अपात्र मोडणा-या कामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत दि.११.७.२००१ च्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन द्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६२१/०२**

**श्री. पप्पू खान,**
**अमन अपार्टमेंट,(लेडी रतन कॉम्प्लेक्स),**
**भारत नगर, बि.नं.१,६वा मजला,**
**रुम नं.६०१, डी.एस.रोड,**
**वरळी, मुंबई-४०००१८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त(परि-२),**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**सर जे.जे. मार्ग, नागपाडा,**
**मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**सर जे.जे. मार्ग, नागपाडा,**
**मुंबई-४००००८.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. पप्पू खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.७.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१०.२००८ रोजी अर्ज करुन सीम्प्लेक्स बिल्डिंग,पाववाला रस्ता,बीट नं.२,डी.बी.मार्ग, येथे वेश्याव्यवसाय चालतो,त्यास पोलीसांनी परवानगी दिली. श्री.अरविंद दुबे व इतर वेश्याव्यवसाय चालवतात. यासाठी पोलीसांनी दिलेल्या परवानगी पत्राची प्रत मागीतली होती. वेश्या व्यवसायाकरीता पोलीस खात्याकडून कोणत्याही प्रकारचा परवाना दिला जात नाही अशी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.११.०८च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन सिम्प्लेक्स इमारतीत वेश्याव्यवसाय करण्यास दिलेल्या परवानगी पत्राची प्रत मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास दि.१५.११.०८ रोजी प्रत्यक्ष भेटीच्या वेळी कार्यालयात माहिती पुरविली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई | **(रामानंद तिवारी)**
दिनांक:२३.४.२०१० | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६२४/०२**

**श्री.बलदेव बसप्पा रामदुर्ग,**
**कडापट्टी, पोस्ट आणि तालुका जामखंडी,**
**जि.बागलकोट(कर्नाटका) .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. बलदेव बसप्पा रामदुर्ग यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.८.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.२००८ रोजी अर्ज करुन जामखंडी राज्याचे विलीनीकरणाची करारपत्राची प्रत,जामखंडी राज्याची स्थावर जंगम मालमत्तेसंबंधीच्या कागदपत्राची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जामखंडी राज्य आणि भारत सरकार यांच्यात जामखंडी राज्याच्या विलीनीकरणासंबंधी करारपत्र झाले. सदर जागा आता कर्नाटक राज्यामध्ये आहे. यासंबंधीची कागदपत्र भारत सरकारकडे असावीत. कार्यालयात सदर प्रकरणाची कागदपत्र उपलब्ध नसल्याने अपीलकारास पुरविता येत नाहीत असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१२.३.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन जामखंडी राज्याचे भारत सरकारमध्ये विलीनीकरण झाले त्यासंबंधीच्या करारपत्राच्या प्रती, स्थावर जंगम मालमत्तेच्या प्रतीची मागणी केली होती. अपीलकाराने मागणी केलेली कागदपत्र कार्यालयात उपलब्ध नाहीत. त्यामुळे अपीलकारास मागणीप्रमाणे कागदपत्र पुरविता येत नाहीत असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले आहेत. अपीलकारास अवगत करण्यात आले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६८७/०२,**

**श्री. प्रदीपकुमार मिश्रा,**
**इंटेजिलेन्स प्रेस सेंटर(रजि.),**
**पूजा क्लिनीक, पॉवडर वर्कस बंदर,**
**दरगाह लेन, दारुखाना,**
**माझगांव, मुंबई-४०००१०** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एफ/ उत्तर विभाग,**
**९६, भाऊ दाजी रोड, माटुंगा,**
**मुंबई-४०००१९.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. प्रदिपकुमार मिश्रा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१९.१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते/गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१३.१.०९ रोजी अर्ज करुन दि.२०.१०.०८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. श्रीम.नंदा धोंडीराम उबाळे यांनी कलेल्या अनधीकृत बांधकामाबाबत तक्रारदाराने तक्रार केली होती व अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने दि.७.१०.२००८ च्या पत्रान्वये तक्रारदारास त्यांच्या तक्रारीवर करण्यात येत असलेल्या कारवाईबाबत अवगत केले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मागणी केलेल्या प्रकरणाची माहिती, प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्यामुळे देता येत नाही असे गैरतक्रारदाराने दि.१३.३.०९च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले असल्याचे सदर

पत्राची प्रत आयोगास सादर करुन गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन गैरतक्रारदाराने सदर प्रकरणाची माहिती तक्रारदारास कळविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२३.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७४५/०२,**

**श्री. निपुण मठकर,**
**बी/५, जीवदानी,**
**रामचंद्र जाधव वाडी, विजय नगर,**
**नालासोपारा(पूर्व), ठाणे-४०१२०८.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका बिल्डिंग,**
**६वा मजला, सामान्य प्रशासन विभाग,**
**महानगरपालिका मार्ग, मुंबई-४००००१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. निपुण मठकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१५.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेतीलअधिकारी/कर्मचा-यांची एकूण मंजूर पदे, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरलेली पदे, विहित वर्गवारीनुसार भरलेली पदे इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तकारदाराने आयोगाकडे अपील क्र.२००९/१९३४/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. गैरतक्रारदार तथा प्रमुख कर्मचारी अधिकारी(प्रशासन) यांनी त्यांचे खात्यासंबंधीची पदाबाबतची अनुषंगिक माहिती द्यावी असे दि.२५.३.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदारास आवश्यक ती माहिती दि.३०.३.२०१० च्या पत्रान्वये पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने पत्राची प्रत आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तक्रारदारास पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७२१/०२,**

**श्री. के.जी. शेट्टे,**
**१२-कौस्तुभ, अनंत पाटील रोड,**
**शिवाजी पार्क, मुंबई-४०००२८** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ व का),**
**जी/नॉर्थ वार्ड,हरिश्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर(प.), मुंबई-४०००२८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. के.जी.शेट्टे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१६.२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.११.०८ रोजी अर्ज करुन एफ.ओ.क्र.२९३,टी.पी.VI माहिम विभाग येथील अतीक्रमणाबाबत अनुषंगिक एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती सहाय्यक आयुक्त जी/नॉर्थ विभाग कार्यालयाशी संबंधीत असल्याने तक्रारदाराचा अर्ज त्या कार्यालयाकडे हस्तांतरीत केला असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.२६.११.०८ च्या पत्रान्वये कळविले. तक्रारदाराने (iii) (१) (२) (३)आणि (४)या मुद्यांची प्रश्नोत्तर स्वरुपात माहिती मागीतली आहे. सदर बाब उक्त अधिनियमांतर्गत बसत नाही. मुद्दा क्र.५ बाबत कार्यालयात कागदपत्र उपलब्ध आहेत. सदर कागदपत्रांचे कार्यालयात हजर राहून निरिक्षण करावे. त्यानंतर मागणीनुसारविहित शुल्क आकारुन माहिती पुरविण्यात येईल असे गैरतक्रारदार तथा सहाय्यक अभियंता(इमारती आणि कारखाने) जी/नॉर्थ विभाग यांनी तक्रारदारास दि.१९.१२.०८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले की, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली. इतर विभागाकडून माहिती गोळा करुन देण्याची उक्त अधिनियमात तरतूद नाही. गैरतक्रारदाराने तक्रारदारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७१६/०२,**

**श्री. जाफर हुसेन सय्यद,**
**नंदादीप, बी-१, एन.जी.आचार्य मार्ग,**
**खारदेव नगर, चेंबूर, मुबई-७१** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**एम विभाग, कक्ष क्र.२०२,२ रा मजला,**
**कोकण भवन, नवी मंबई,**
**बेलापूर-४०००१४.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. जाफर हुसेन सय्यद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१५.४.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन १)संस्थेच्या व्यवस्थापक समितीऐवजी नियुक्त केलेल्या प्रशासकाचे कर्तव्य काय २)प्रशासकाने संस्थेमध्ये उपस्थित राहण्याचे दिवस व त्याचे आठवडयातील कामकाजाचे तास याची माहिती इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.६.४.०९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर न करता उक्त अधिनियमातील कलम १८(१) अनुसार तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारदाराने प्रतिपादन केले की, गैरतक्रारदाराने अपूर्ण माहिती पुरविली. संपूर्ण माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने उर्वरित माहिती तक्रारदारास पुरविण्याबाबत संस्थेला लेखी स्वरुपात कळवावे. याबाबत तक्रारदारासही अवगत करावे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२३.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७४८/०२,**
**/२७५०/**

**श्री. काळूराम बायजा अडांगळे,**
**मु.पो.निमज,ता.संगमनेर,**
**जि.अहमदनगर ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(श्रेणी-१),**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम उपविभाग संगमनेर,**
**नवीन नगर रोड,पाठक हॉस्पीटल समोर,**
**संगमनेर,जि.अहमदनगर-४२२६०५ ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. काळूराम बायजा अडांगळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.८.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.११.३.२०१० रोजी अर्ज करुन बनावट कागदपत्र तयार करुन तक्रारदाराच्या मालकीच्या गट क्र.१/९ मधील जमीनीवर महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, उप विभाग संगमनेर यांच्याकडून तक्रारदाराची परवानगी नसतांना तसेच ग्राम सभेत ठराव झालेला नसतांना खोटया सहया करुन जल संधारण योजना राबविलेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने अपूर्ण व असमाधानकारक माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

अपीलकाराच्या जमीनीवर जल संधारण योजना राबविली. याकरीता अपीलकाराची संमती घेतली नसल्याचा अपीलकाराचा मुद्दा आहे. परंतु सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने संमतीपत्राची प्रत तक्रारदारास पुरविली आहे. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली

आहे. गट क्र.१/९ मधील जमीनीवर जल संधारण योजना राबविण्याकरीता संमती देण्याचे अधिकार कोणास आहेत याबाबतचा मुद्दा तक्रारदाराने उपस्थित केला. सदर प्रकरणी तक्रारदार आणि त्यांच्या आईने योजना राबविण्यास संमती दिली आहे. संमतीपत्राच्या प्रती तक्रारदारास पुरविण्यात आल्या आहेत.सदर बाब राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत काही करता येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक:२३.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७४९/०२,**

**श्री. काळूराम बायजा अडांगळे,**
**मु.पो.निमज,ता.संगमनेर,**
**जि.अहमदनगर ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार(भूसुधार),**
**जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर,**
**कुळकायदा शाखा,**
**अहमदनगर. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. काळूराम बायजा अडांगळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.८.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.४.१२.०९ रोजी अर्ज करुन मौजे निमज ता.संगमनेर,जि,अहमदनगर येथील तक्रारदाराच्या जमिनीवर तक्रारदाराच्या संमतीशिवाय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जलसंधारण योजना राबविण्यात येत आहे, याबाबत ग्राम सभेत ठराव झालेला नाही, बोगस हस्तांतरण केलेले आहे.अपीलकाराची जमिन महार वतनाची आहे. अपीलकाराने बाहेर जावे अशी कारवाई श्री.रामनाथ शिवनाथ डोंगरे(सरपंच), श्री.विलास तुळशीराम कासार(उप सचिव)हे करत आहेत. त्यांचे विषयी व ग्रामसेवक श्री.संजय लक्ष्मण वामन यांचे विषयी चौकशी करावी. तसेच कामगार तलाठी श्री.विठ्ठल भाऊराव गुंजाळ यांचीही चौकशी करावी. कारण हे सर्व तक्रारदारास घरातून बाहेर पडावे यासाठी दमदाटी करत आहेत असा मुद्दा तक्रारदाराने माहितीच्या अधिकारातील अर्जात उपस्थित केला आहे.

तक्रारदाराच्या अर्जाची प्रत तहसिलदार, संगमनेर यांचेकडे पाठवून सदर प्रकरणी सविस्तर चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल मागविला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दि.१५.३.२०१० च्या पत्रावरुन दिसून येते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचनेनुसार सदर प्रकरणी चौकशी करुन तहसीलदार संगमनेर यांनी अहवाल सादर केल्यानंतर सदर चौकशी अहवालाची प्रत गैरतक्रारदारानी तक्रारदारास उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७३८/०२,**

**श्रीमती प्रमिला नाझरेथ सत्यानंद,**
**सी-१७ए, डीडीए फ्लॅटस,**
**मुनिरका,नवी दिल्ली-११००६७.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**महिला व बाल विकास विभाग,**
**नवीन प्रशासन भवन,३रा मजला,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्रीमती प्रमिला नाझरेथ सत्यानंद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१९.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२१.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते, तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२७.१०.०८ रोजी अर्ज करुन १२ ऑक्टोबर,२००५ ते ३१ मार्च,२००८ या कालावधीत वर्षनिहाय कार्यालयात प्राप्त झालेले माहितीच्या अधिकारातील अर्ज, किती अर्ज रद्द केले, किती प्रकरणी संपूर्णपणे माहिती पुरविली, किती प्रकरणी काही प्रमाणात माहिती पुरविली, किती अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आले, माहितीच्या अधिकारातील प्राप्त झालेल्या अर्जाच्या नोंदणी संबंधीच्या नोंदवहीच्या छायाप्रती किंवा अन्य अभिलेखाच्या प्रती, अर्ज स्विकारल्या संबंधीची तारीख, अर्जदारांची नावे,पत्ते इत्यादी माहिती मागीतली होती. तसेच कार्यालयात प्राप्त झालेल्या माहितीच्या अधिकारातील अर्जाच्या प्रतींची मागणी केली होती. गैरतक्रारदार तथा कक्ष अधिकारी श्रीम.नीला रानडे यांनी दि.२५.११.०८ च्या पत्रान्वये तक्रारदारास माहिती पुरविली. गैरतक्रारदाराने विलंबाने माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन रु.२००/- शुल्काची प्रतिपूर्ती करावी. गैरतक्रारदारास

शास्ती करावी या अशा कारणास्तव तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार अनुपस्थित होते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती विहित वेळेत पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७१९/०२,**

**श्री.मनोहर शंकर जोशी,**
**पोलीस निरिक्षक, दक्षता पथक,**
**जान प्रमाणपत्र पडताळणी विभाग,७वा उमजला,**
**कोकण भवन, नवी मुंबई,बेलापूर. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उप सहाय्यक**
**पोलीस निरिक्षक(आ.)(अति कार्या.),**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई-४०० ००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. मनोहर शंकर जोशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार/तक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१.९.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती -

१)२००८,२००९ या वर्षात ज्या पोलीस निरिक्षक दर्जाचे अधिका-याच्या सर्वसाधारण बदल्या करण्यात आल्या आहेत त्यांची प्रमाणित प्रत तसेच सर्वसाधारण बदल्यांशिवाय वरील कालावधीत प्रत्येक वर्षी आणखी किती पो.नि.यांच्या बदलीचे स्वतंत्र आदेश काढण्यात आले आहेत त्याची प्रमाणित प्रत तसेच ते आदेश काढतांना संबंधित अधिका-याचा कार्यकाल पूर्ण झालेला होता काय? कार्यकाल पूर्ण न होताही अश्या किती अधिका-यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत? त्यांची नावे व सध्याची नेमणूकीची ठिकाणे

२)वरील कालावधीत किती पोलिस निरिक्ष्कांच्या बदल्या प्रशासकीय कारणास्तव व किती बदल्या विनंतीनुसार करण्यात आल्या आहेत?

३)वरील कालावधीत ज्या पोलीस निरिक्षकांच्या बदल्या प्रशासकीय कारणास्तव व विनंती कारणास्तव केल्या आहेत त्याचा कार्यकाल पूर्ण झालेला होता काय? कार्यकाल पूर्ण न केलेल्या

किती अधिका-यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत? त्यांची नावे व सध्याची नेमणूकीची ठिकाणे व कार्यकाल पूर्ण न झालेल्या पोलीस निरिक्षकांच्या बदल्या कोणत्या प्रशासकीय कारणासाठी करण्यात आल्या? तसेच ज्यांचा कार्यकाल पूर्ण झाला आहे त्यांच्या बदल्या प्रशासकीय कारणास्तव करता आल्या नसल्या का? जर करता आल्या असत्या तर का करण्यात आल्या नाहीत?

४)वरील कालावधीत ज्या पोलीस निरिक्षकांचा कार्यकाल पूर्ण झलेला नाही पण विनंती केली म्हणून त्यांची बदली केली अश्या पोलीस निरिक्ष्कांची नावे व सध्याची नेमणूकीची ठिकाणे तसेच त्यांची बदली त्यांचे विनंतीप्रमाणे केली की अन्यत्र केली? याची माहिती व अन्यत्र केली असल्यास त्यांचे कारण काय?

५) सध्या महाराष्ट्रात असे किती पोलीस निरिक्षक आहेत की त्यांचा ते नेमणूकीस असले ठिकाणी कार्यकाल पूर्ण झालेला आहे परंतू त्यांची बदली अन्यत्र करण्यात आलेली नाही त्यांची नावे व नेमणुकीचे ठिकाण व त्यांची बदली अन्यत्र न करण्याचे कारण काय?

६) बदल्याचा अधिनियम २००५ च्या तरतुदी नुसार वरील कालावधीत बदल्या करण्यात आलेल्या आहेत काय? नसल्यास त्याची कारणे काय? व त्याला जबाबदार कोण? जबाबदार अधिका-याचे नाव व हुद्दा.

तक्रारदाराने मागणी केलेली मुद्दा क्र.१ मधील सर्वसाधारण बदल्यांची माहिती कार्यालयाच्या www.Mahapolice.com या संकेत स्थळावर उपलबध करुन घेता येईल. तरी ती परस्पर उपलब्ध करुन घ्यावी. तक्रारदाराने मागणी केलेल्या इतर मुद्यांबाबतची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील क्र.२(च) अन्वये उपलब्ध करुन देता येत नाही असे गैरतक्रारदाराने दि.१५.९.२००९ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२४.९.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती संकलीत करण्यास बराच कालावधी लागणार आहे. सदरची माहिती संकलीत होताच सदर माहितीच्या खर्चाच्या अनुषंगाने शासनास प्रदान करावयाची रक्कम कळविण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी तक्रारदारास दि.४.१.२०१० च्या पत्रान्वये कळविले. त्यासंबंधी मागीतलेली माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे उक्त अधिनियमातील कलम १८ अन्वये तक्रार केली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७१४/०२,**

**श्री. प्रदिप बी. पवार,**
**ए/१०२, पवनदिप अपार्टमेंट,**
**कमलनगर, श्हापूर,**
**जि.ठाणे-४२१६०२.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**कोऑपरेशन आणि टेक्स्टाईल डिपार्टमेंट,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. प्रदिप बी.पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१६.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२९.१२.०८ रोजी अर्ज करुन सहकारी संस्थांच्या लेख्याबाबत असलेल्या शासनाच्या सूचनांबाबत लेखाधिका-यांचे पॅनेलमध्ये समावेश करणे व फी बाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक २००८/३५९८/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत मागणीनुसार उपलब्ध माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३०.११.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल की.

तक्रारदाराने १ ते १२ मुद्यांची माहिती मागीतली होती. अर्जातील मुद्दा क्र.८ व ९ बाबतची माहिती विभागीय सहनिबंधक, सहकार(लेखापरिक्षण) यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे अपीलकाराच्या अर्जाची प्रत दि.११.११.०९ च्या पत्रान्वये त्या कार्यालयाकडे हस्तांतरित केली. उर्वरीत मुद्यांची माहिती (एकूण पाने १ ते २७) तक्रारदारास दि.२१.११.०९ च्या पत्रान्वये नि:शुल्करित्या उपलब्ध करुन दिली असा गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी लेखी

अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास गैरतक्रारदाराने माहिती पुरविली असल्याचे दिसून येत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७३४/०२,**

**श्री. जिवाभाई जे दिवेचा,**
**माताफुलवंती सेवा मंडळ,**
**घर नं.१०३,दांडा रोड,**
**मधला पाडा, मुंबई-४०००५२.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पश्चिम विभाग कार्यालय,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा(प.),**
**मुंबई-४०००५०.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. जिवाभाई जे दिवेचा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१८.३.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२०.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते, गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१२.३.०९ रोजी अर्ज करुन पहाणी अहवालाची प्रत, पोलीस ठाण्यास एम.आर.टी.पी. कायद्यानुसार देण्यात आलेल्या मान्यता पत्राची प्रत,अनधिकृत बांधकामाच्या केलेल्या पंचनाम्याची प्रत, न्यायालयात दाखल केलेल्या कोर्ट केस क्रमांक व सुनावणी तारीख इत्यादी माहिती मागीती होती. अर्जातील मुद्दा क्र.२ ची माहिती उपलब्ध नाही. अर्जातील इतर मुद्याची माहिती पोलीस खात्याशी संबंधीत असेल तर तक्रारदाराचा अर्ज नियमानुसार त्या खात्याकडे हस्तांतरित करावा असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पातर केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने अपील क्र.२०१०/३५७९/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी गैरतक्रारदारांनी तक्रारदारास अद्यावत माहिती पुरवावी असे दि.२०.२.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता गैरतक्रारदार अनुपस्थित होते. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. राज्य माहिती आयोगाच्या दि.२०.२.२०१० च्या आदेशाचे पालन केले नाही. याकरीता गैरतक्रारदारास जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार रु.२५००/- इतकी शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करण्यात येऊ नये याबाबत राज्य माहिती आयोगाकडे हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत लेखी खुलासा प्रत्यक्ष भेटून सादर करावा.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७२३/०२,**

**श्री. अर्जून विष्णू चिंधे,**
**पोलीस निरिक्षक,**
**पोलीस अधिकारी इमारत,७ वा मजला,**
**रम नं.२९, रेल्वे पोलीस वसाहत,**
**एस.बी. मार्ग, दादर(पूर्व), मंबई-१४. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(पोल ५),**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री. अर्जून विष्णू चिंधे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१.४.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१६.१.२००९ रोजी अर्ज करुन तक्रारदार यांनी दि.२७.१.२००६ रोजी विनंती अर्ज केला होता, सदर अर्जाची सद्यःस्थिती,अर्जासंबंधी अंतिम निर्गतिसाठी कालमर्यादा काय आहे, शौर्यपदक,पोलीस पदक तसेच पोलीस महासंचालकाचे सन्मानचिन्ह मिळविणा-या व झालेल्या अन्यायाबाबत व मानीव तारखेबाबत अर्ज करणा-या अधिका-यास अर्ज केल्यापासून तीन वर्षे होऊनही न्याय मिळत नाही. अगर माहिती मिळत नाही याबाबत शासनाचे धोरण काय आहे, तक्रारदाराच्या प्रकरणास जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-याचे नांव, जुद्दा, नेमणूक इत्यादी माहिती मागीतली होती.

दि.२७.१.२००६ चा अर्ज शासनाकडे प्राप्त झालेला नाही. पोलीस निरिक्षक पदाचा मानीव दिनांक मंजूर करण्यासंदर्भातील प्रस्ताव दि.४.११.०८ रोजी प्राप्त झाला. त्या अनुषंगाने तक्रारदार यांना पोलीस निरिक्षक पदावरील पदोन्नतीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर त्यांना पोलीस निरिक्षक पदावरील पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे पोलीस महासंचालकांनी कळविले असल्याचे गैरतक्रारदाराने दि.१०.२.०९च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने

तक्रारदारास माहिती पुरविली आहे. या प्रकरणी प्रस्ताव डायरेक्ट जनरल पोलीस यांच्याकडे येणे बाकी असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. तक्रारदाराचे प्रकरण एक सेवाविषयक आहे. गैरतक्रारदाराने प्रकरणाची सद्यःस्थिती तक्रारदारास कळविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२६.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७१३/०२,**

**श्री. मोहन कृष्णन कुरुप,**
**बी-३/१,महिंद्र नगर,**
**दायभाई पटेल रोड, मालाड(पूर्व),**
**मुंबई-४०००९७.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप पोलीस अधीक्षक,**
**मीरा-भाईंदर, जिल्हा ठाणे.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. मोहन कृष्णन कुरुप यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१४.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकाडे दि.६.४.०९ रोजी अर्ज करुन काशिमीरा पोलीस स्टेशन व तक्रारदारास अटक करुन पोलीस लॉकअप मध्ये ठेवल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने काही मुद्यांची माहिती नाकारली. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/३२८६/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले असल्याने माहिती नाकारता येत नाही म्हणून तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२९.०.०९ रोजी आदेश पारीत केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास क्र.टे-३/मा.अधि/११९/६७८८/२००९ दि.१६.११.२००९ च्या पत्रान्वये पोस्टामार्फत माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असा गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास

माहिती पुरविली असल्याचे दिसते. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या दि.२९.९.२००९ च्या आदेशाचे पालन केले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२६.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३७६२/०२**

**श्री. गोपीनाथ रामा साळवी,**
**१९२/१५३४, मोतीलाल नगर-१,**
**गोरेगाव(प.), मुंबई-४००१०४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. गोपीनाथ रामा साळवी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १.१०.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.१.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१)खाजगी इस्पीतळात सरकारी नियमाप्रमाणे गरीब जनतेला दहा टक्के खाटा कोणकोणत्या इस्पीतळात मिळतात

२)मुंबई,ठाणे,शहर,जिल्हयात खाजगी इस्पीतळे आहेत.त्या इस्पीतळात सरकारी धोरणाप्रमाणे गरीब जनतेला दहा टक्के खाटा आजारपणात उपचाराला ठेवल्या जातात. त्या इस्पीतळांची नावे व त्यांची फी सामान्य माणसांसाठीची यांची यादीची माहिती द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन खाजगी इस्पीतळात सरकारी नियमाप्रमाणे गरीब जनतेला १०% खाटा कोणकोणत्या इस्पीतळात मिळतात याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३४०८/०२**

**श्री. नितील टी.गवाणकर,**
**०५/गवाणकर निवास,**
**साईकृपा बिल्डिंग समोर,**
**शिव वल्लभ रोड, दहिसर(पूर्व),**
**मुंबई-४०००६८** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका आर/उत्तर यांचे कार्यालय,**
**संगीतकार सुधीर फडके उड्डाणपूलाखाली,**
**जयंत सावत मार्ग, दहिसर(प.), मुंबई-४०००६८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका आर/उत्तर यांचे कार्यालय,**
**संगीतकार सुधीर फडके उड्डाणपूलाखाली,**
**जयंत सावत मार्ग, दहिसर(प.), मुंबई-४०००६८.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. नितीन टी.गवाणकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.८.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.४.२००९ रोजी अर्ज करुन निष्कासन नोंदवहीची सन २००५ ते २००८ या कालावधीची छायाप्रतीची मागणी केली होती. कार्यालयीन कामाच्या दिवशी दुपारी ३ ते ५ या वेळेत विहित शुल्क भरुन निष्कासन नोंदवहीच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२५.५.२००९ व दि.२७.५.२००९ च्या पत्रान्वये कळविले होत. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२८.५.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. निष्कासन नोंदवहीचा शोध घेऊन त्याच्या छायाप्रती

अपीलकारास पुरवाव्यात अशा प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या होत्या. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सन २००५ ते २००८ या कालावधीतील निष्कासन नोंदवहीच्या छायाप्रती देण्याची जन माहिती अधिका-याकडे मागणी केली होती. एप्रिल,२००६ पासूनच्या कालावधीमधील उपलब्ध असलेल्या निष्कासन नोंदवहीच्या प्रती विहित आकार भरुन घेण्यास जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२७.५.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. एप्रिल,२००६ पूवीची निष्कासन नोंदवही मिळाली नसल्याची तक्रार अपीलार्थी यांनी केली होती. सदर निष्कासन वही असल्यास शोध घेण्याचा विशेष प्रयत्न करण्यास प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या होत्या. जन माहिती अधिकारी सहा.अभियंता(परिरक्षण) यांनी सदर एप्रिल,२००६ पूर्वीची निष्कासन नोंदवही विशेष प्रयत्न करुनही न सापडल्याचा अहवाल विभाग कार्यकारी अभियंता,आर/उत्तर यांनी जन माहिती अधिका-यास श्री.गवाणकर यांना कळविण्यास सांगितले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३१.७.२००९ रोजी कार्यालयात आले असता प्रत्यक्ष त्यांना सांगीतले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधी उलटून गेल्यानंतर उशीराने माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. याकरीता जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरण्यात यावे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास पूर्वीच विहित वेळेत माहिती का पुरविली नाही? विलंबाने माहिती पुरविली यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७चा भंग झाला आहे. याकरीता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-यांविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत ४ आठवडयाचे आत आयोगास प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/२१८१/०२**

**श्री. तोहारपाशा सुलेमान साब सय्यद,**
**झो.नं.८५, ई हुसोनिया मस्जीद के पास,**
**साई-बाबा नगर, ९० फीट रोड, धारावी,**
**मुंबइ-४०००१७** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका जी/नॉर्थ यांचे कार्यालय,**
**हरिष्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर, मुंबई-४०००२८.**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका जी/नॉर्थ यांचे कार्यालय,**
**हरिष्चंद्र येलवे मार्ग,**
**दादर, मुंबई-४०००२८.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. ताहेरपाशा सुलेमान साबसय्यद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.३.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.१.२००८ रोजी अर्ज करुन महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५१, ३५१अे, ३५४ अे आणि बी, ४९०,४९१ अनुसार दि.१ जानेवारी,२००७ ते १६ जानेवारी,२००८ या कालावधीत धारावी येथील अनधिकृत बांधकामांना नोटीसा पाठविण्यात आल्या त्याच्या सत्यप्रती व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. या विभागाशी संबंधीत माहिती उपलब्ध असून ती शुल्क भरुन प्रत्यक्ष घेऊन जावी असे जन माहिती अधिका-यांनी दि.७.४.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.२.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन धारावी येथील अनधीकृत बांधकामांना दिलेल्या नोटीसबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३२४६/०२**

**श्री. शिवकुमार कालीराम अग्रवाल,**
**२१५, अग्रवाल नगर, वाशीनाका,**
**आर.सी.मार्ग, चेंबूर,**
**मुंबई-४०००७४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(अतिनिष्का),**
**चेंबूर, पी.वाय.थोरात मार्ग,**
**वेलफेअर सेंटर बिल्डिंग, चेंबूर स्टेशन बाजूला,**
**चेंबूर, मुंबई-४०००८९.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार(अति.निष्का.)चेंबूर,**
**पी.वाय.थोरात मार्ग,**
**वेलफेअर सेंटर बिल्डिंग, चेंबूर स्टेशन बाजूला,**
**चेंबूर, मुंबई-४०००८९.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. शिवकुमार अग्रवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.७.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.४.२००९ रोजी अर्ज करुन वाशीनाका आर.सी.मार्ग चेंबूर, मुंबई येथील सरदार वल्लभभाई पटेल नगरच्या उत्तर भागाचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण(एस.आर.ए.)अंतर्गत सर्वेक्षण करण्यात आले आहे किंवा नाही याबाबत लेखी माहिती द्यावी अशी मागणी कली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१३.६.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते.सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन एस.आर.ए. अंतर्गतच्या सर्वेक्षणाबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात तयार असून माहिती पोटी एकूण रु.१७२०/- भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी अस जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते. अपीलकार स्वतः दि.१७.८.०९ रोजी कार्यालयात येऊन संबंधीत संचिकेतील शासकीय शुल्क रु.१७२०/- असणा-या माहिती ऐवजी फक्त कार्यालयाने पाठविलेला अहवाल व नकाशाच्या प्रतीची मागणी केली. अपीलकाराने शुल्क रु.३७/- चा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याचा लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. तसेच माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकाराने दिलेल्या पोचपावतीची प्रतही उत्तरवादीने आयोगास द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी सादर केली. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६५३/०२**

**श्री. अनंत एम.नंदू,**
**रुम नं.२४,२रा मजला, २०/२२,**
**खेमराज बिल्डिंग नं.५,**
**खंबाटला लेन, खेतवाडी, मुंबई-४००००४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा डेप्युटी चिफ इंजिनिअर,**
**एम.सी.जी.एम. बिल्डिंग, ई वार्ड ऑफीस,**
**३रा मजला, १०,एस.के. हफीझुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**एम.सी.जी.एम. बिल्डिंग, ई वार्ड ऑफीस,**
**३रा मजला, १०,एस.के. हफीझुद्दीन मार्ग,**
**भायखळा, मुंबई-४००००८. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. अनंत एम.नंदू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.१०.२००९ रोजी अर्ज करुन दि.१२ ऑगस्ट,२००९ ते ३१ ऑगस्ट,२००९ पर्यंत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत परिशिष्ट-अ प्रमाणे कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जाच्या नकला व सर्व संबंधीत अर्जदारास पाठविलेल्या उत्तराच्या नकला व आर.टी.आय. नोंदवहीची नक्कल मागीतली होती. अपीलकारास हवी असलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दपारी ३ ते ५ या वेळेत कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत नोंदवहीचे अवलोकन करावे. त्यानंतर अपीलकारास हव्या असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती विहित शुल्क भरल्यानंतर देण्यात येतील असे उत्तरवादीने दि.२८.१०.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२३.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२.१२.०९

रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन कार्यालयात दि.१२.८.०९ ते ३१.८.०९ या कालावधीत माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या अर्जाच्या प्रती, अर्जदारास पुरविलेल्या उत्तराच्या प्रती यांची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने भरपाईची मागणी केली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अघिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठव डयाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/५२५/०२,**

**श्री. एम.व्ही.रुपारेलीया,**
**ए-५०३,रश्मी उत्सव, जांगीड इस्टेटच्या जवळ,**
**मीरा रोड(पूर्व), जि.ठाणे-४०११०७.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त(वाहतूे),**
**वाहतुक पोलीस मुख्यालय,सर पोचखानवाला मार्ग,**
**वरळी.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. एम.व्ही.रुपारेलीया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२७.४.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२५.३.०९ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात क्र.एमव्हीआर ०८०७/सी.आर.१३६/टीआरए-२, दि.२५.२.२००८ ही अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याकरीता मुंबई महानगर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची स्थापना केली. मुंबई महानगर क्षेत्रात टॅक्सी, ऑटोरिक्षामधून मुक्तपणे प्रवासी वाहतुकी संदर्भात एम.एम.आर.टी.ए.च्या दि.४.३.०८च्या ठरावाप्रमाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई(मध्य), पूर्व,पश्चिम व ठाणे तसेच वाहतूक पोलीस विभागाने रिक्षा,टॅक्सी संघटनांशी चर्चा करुन संबंधीत ठरावाच्या अंमलबजावणीसाठी ठोस कार्यवाही करणे अपेक्षित होते. पोलीस विभागाने रिक्षा टॅक्सी संघटनांशी चर्चा केली नाही. याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदार श्री.एम.व्ही.रुपारेलिया यांच्या सदर प्रकरणी मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सुनावणी झाली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. यावरुन सदर प्रकरणी मा.मुख्य माहिती आयुक्तांनी निर्णय दिला असल्याने तक्रारदाराची तक्रार दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

## आदेश

**तक्रार दप्तरी दाखल करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६७८/०२,**

**श्री.शशिकांत सावंत,**
**प्रतिक्षा नगर, बहुमजली इमारत क्र.१०/२०३,**
**सायन कोळीवाडा,**
**मुंबई-४०००२२.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा इस्टेट मॅनेजर,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नबांधणी बोर्ड,**
**गृहनिर्माण भवन, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.शशिकांत सावंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२६.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते, गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१९.१.२००९ रोजी अर्ज करुन प्रतिक्षानगर,सायन कोळीवाडा येथील ट्रांझीट कँप येथे झालेल्या अतिक्रमणाविरुध्द केलेल्या कारवाईची दंडाच्या वसूलीबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क.२००९/३३४३/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत मागणीनुसार उपलब्ध माहिती पुरविण्याबाबत दि.३०.९.२००९ रोजी आदेश पारित केले होते. म्हाडातील गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत राज्य माहिती आयोगाने आदेश देऊनही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराच्या सदर कृतीमुळे माहितीचाअधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार रु.२५,०००/- इतकी शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/५१९/०२,**

**श्री. जयंतीलाल शहा व इतर,**
**जयंत प्रोव्हीजन स्टोअर्स, दुकान क्र.९,**
**आराम शॉपींग सेंटर, बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-४०००५१.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,**
**१३६, टी.पी.एस. सांताक्रुझ(पू.),**
**मुंबई-४०००५५.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. जयंतीलाल शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.६.१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते, गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१७.९.०८ रोजी अर्ज करुन महापालिकेच्या सी.टी.एस.६२९(भाग) सर्व्हे क्र.३४१ येथे शास्त्रीनगर म्युन्सीपल मंडई व परीश्रम गृहनिर्माण संस्था या दोन संस्था आहेत. महानगरपालिकेच्या सदर भूखंडासंबंधी व तेथील दोन संस्था व त्यांचा पुनर्विकास तसेच त्या भूखंडावर बाजार विभागासाठी बांधलेल्या मंडईसंबंधी, त्या जागेचा ताबा महानगरपालिकेने केव्हा घेतला इत्यादी माहिती मागीतली होती. तकारदाराने अपेक्षीलेली माहिती स्पष्ट होत नसल्याने कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती तक्रारदाराने प्रत्यक्ष येऊन तपासणी करावी. त्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक ती उपलब्ध माहिती पुरविण्यात येईल असे गैरतक्रारदाराने दि.२५.९.०८ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. कार्यालयात गेले तरी

गैरतक्रारदार तथा वसाहत अधिकारी एच/पूर्व, श्री.आ.प्र.जोशी भेटत नाहीत. त्यांचे कर्मचारी संबंधीत फाईल तपासणीसाठी देत नाहीत. मागीतलेली माहिती पुरवित नाहीत अशी तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर प्रकरणी तक्रारदारास गैरतक्रारदाराने संबंधीत कागदपत्राच्या निरिक्षणाकरीता कार्यालयात बोलावून संबंधीत कागदपत्र तपासणीकरीता उपलब्ध करुन दिली नाहीत. गैरतक्रारदाराची सदर कृती निश्चितच योग्य नाही. गैरतक्रारदार तक्रारदारास माहिती पुरवित नाहीत याकरीता गैरतक्रारदारास जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६६७/०२,**

**श्री. एस.आनंद नटराज,**
**बी-७०६, राजश्री अपार्टमेंट,**
**महावीर नगर, कांदीवली(प.),**
**मुंबई-४०००६७.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट रजिस्ट्रार,**
**को.ऑप.सोसायटीज, एफ/एन वार्ड, ६वउ मजला,**
**मल्होत्रा हाऊस,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. आनंद नटराज यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते, गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१.१२.०८ रोजी अर्ज करुन संस्थेचा लेखापरिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले की, अर्जात मागणी केलेली माहिती संस्थेच्या लेखापरिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवाल संस्था स्तरावर असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२ अन्वये संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

लेखापरिक्षण नोंदवहीबाबत कार्यालयीन कर्मचारी यांना काम वाटपानुसार सदर लेखापरिक्षाण तथा दोष दुरुस्ती अहवाल नोंदविण्याचे काम सोपविलेले आहे. सदर कर्मचारी या प्रभागातील नोंदणीकृत सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण अहवाल नोंदवितात. याबाबत स्वतंत्र

कर्मचारी नियुक्त केलेला नाही. कार्यालयातील लेखापरिक्षण नोंदवहीची पडताळणी केली असता मंगल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेने अद्याप लेखापरिक्षण अहवाल पाठविलेला नाही. संस्थेस याबाबत पत्र देऊन लेखा परिक्षण अहवाल मागविणेत येत आहे असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले आहे. यावरुन गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुर करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून खुलासा सादर करावा.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/४७०/०२,**

**श्री. चंद्रकांत दामोदर सोपारकर,**
**झिनीया एंटरप्रायझेस,सी.टी.एस.नं.२१५,**
**किर्ती रबर कंपाऊंड,२४ कॅरेट थिएटरजवळ,**
**एस.व्ही.रोड, जोगेश्वरी(प.), मुंबई-४००१०२.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**सहाय्यक पालीका आयुक्त,पी/दक्षीण विभाग कार्यालय,**
**बीएमसी म्युनिसिपल स्कूल बिल्डिंग, मिठा नगर,**
**गोरेगाव(प.), मुबई-४००१०२.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. चंद्रकांत दामोदर सोपारकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२०.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते . सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.६.११.०८ रोजी अर्ज करुन श्री.मोहम्मद फारुकी जतू यांच्या सी.टी.सर्व्हे क्र.१२०८(पार्ट)शंकर नगर, मालाड(प.),मुंबई येथील अंदाजे ४०० चौ.यार्ड जमिनीवर श्री.अशोक जैन,अलबर्ट जॉन सेबेस्टेन मीसक्युटीया आणि श्रीम.आंचीदेवी जैन हे अनधीकृत बांधकाम करीत असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे आवश्यक माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/३१३९/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास सदर प्रकरणी ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३१.८.०९ रोजी आदेश पारित केले

होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदारांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयोगाच्या आदेशाचे पालन केले आहे. तक्रारदारास माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२८.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/४६५/०२,**

**श्री. महादेव शिवप्पा पाटील,**
**डी ब्लॉक खो.क्र.६३,**
**वरळी पोलीस कँप, सर पोचखानवाला रोड,**
**वरळी, मुंबई-४०००३०. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी,**
**पोल-६ब, गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री. महादेव शिवप्पा पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१६.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते . सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१७.६.०९ रोजी अर्ज करुन निलंबन काळातील वेतनवाढ फरकाची रक्कम रु.३९,९०५/- मिळणेबाबतची मागणी केली होती. तक्रारदारास आवश्यक असलेल्या माहितीबाबतची कागदपत्र विभागात आढळून येत नसल्याने माहिती देणे शक्य होत नाही असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१५.१०.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदार श्री.महादेव शिवप्पा पाटील हे पो.ह.क्र.१८२३१ यांच्या निलंबन कालावधीतील वेतन व इतर फरकाबाबतची रक्कम टोकन क्र.एच-११४२ व प्रमाणक क्रमांक १३७३ दि.१७.२.२०१० नुसार रु.३६,१९३/- अधीदान व लेखा कार्यालयाकडून मंजूर करण्यात येऊन तक्रारदारास दि.२२.२.२०१० रोजी त्यांच्या ॲक्सीस बँक खात्यावर जमा करण्यात आली

असल्याचा गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर केला. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदाराची वेतन व इतर फरकाची रक्कम तक्रारदारास प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२७.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिति आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६६७/०२**

**श्री. सी.एम.चाको,**
**७०१,३-सी,समृद्धी को.ऑप.हौ.सो.,**
**वैशाली नगर, के.के. मार्ग,**
**सात रस्ता, महालक्ष्मी,**
**मुंबई-४०००११.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा डेप्युटी चॅरीटी कमिशनर,**
**चॅरीटी कमिशनर यांचे कार्यालय,**
**वरळी, मुंबई-४०००१८.**

**जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट चॅरिटी कमिशनर,**
**चॅरीटी कमिशनर यांचे कार्यालय,**
**वरळी, मुंबई-४०००१८.** **..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सी.एम.चाको यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.११.२००९ रोजी अर्ज करुन मीश्रीलालजी परिहार मेमोरियल वेलफेअर सेंटर या विश्वस्थ मंडळाचा नोंदणी दिनांक कोणता आहे, सदर विश्वस्थ मंडळाने विश्वस्थ बदलले आहेत काय? असल्यास विश्वस्थ बदलाच्या अहवालाची प्रत मागीतली होती. सदर विश्वस्थ मंडळाचे गेल्या १० वर्षातील वार्षीक बजेट ताळमेळ प्रपत्राची प्रत, टिळक नगर चेंबूर येथे सदर विश्वस्थ मंडळ रुग्णालय बांधकाम करत आहे त्यास धर्मादाय आयुक्तांची मान्यता घेतली असल्यास अर्जाची सहपत्रासह प्रत व परवानगी पत्राची प्रत मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास अर्जातील अे ते सी येथील मद्यांबाबत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसाचे आत पुरवावी असे दि.४.२.२०१० रोजी आदेश पारित

केले. त्यानंतरही माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन मीश्रीलालजी परिहार मेमोरियल वेलफेअर सेंटरबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२८.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३४९/०२**

**श्री. माणिकराव किसनराव शेळके,**
**फ्लॅट नं.१०, भोसले पॅलेस,**
**महापौर बंगल्यासमोर, हडपसर,**
**पुणे-४११ ०२८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव(आ.),**
**सेवा-४, सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा-४),**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. माणिकराव किसनराव शेळके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.१.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.९.९.२००९ रोजी अर्ज करुन नस्ती क्रमांक विभाचौ/१२०९/प्र.क्र.४७/सेवा-४ या नस्तीतील टिप्पणीच्या सर्व प्रती व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र, सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायाच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. सदर प्रकरणी अपीलकाराविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. सदर विभागीय चौकशीमध्ये सकृत दर्शनी उमेदवाराची नियुक्ती अनियमितपणे व बेकायदेशीररित्या झाली असल्याचे आढळून आल्यामुळे व सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिका-यांनी दि.८.१०.२००९ च्या पत्रान्वये माहिती नाकारली. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१२.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे प्रथम अपीलीय अधिका-यांनी समर्थन करुन अपीलकारास माहिती नाकारली व तसे दि.१५.१.२०१० च्या पत्रान्वये अपीलकारास

कळविले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयाोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने सदर पकरणी प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशीतील दोषारोपात नमूद केलेले महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र, सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय व विभागीय चौकशी १२०९/प्र.क्र.४७/सेवा-४ या नस्तीतील टिप्पणीच्या सर्व प्रती मागीतल्या होत्या. वैद्यकीय अधिकारी डॉ.गिरी गोसावी व इतर ५ वैद्यकीय अधिका-यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे मूळ अर्ज क्र.१७६/२००६ दाखल केला होता. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि.१६ जून,२००८ रोजी आदेश पारित केले.वैद्यकीय अधिकारी गट क पदावर करण्यात आलेली नियुक्ती ही वैध ठरविली आहे. सदर नियुक्ती मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्या अंतर्गत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार विहित मार्गाचा अवलंब करुन केलेली असल्याने त्यामध्ये अनियमितता झाली नसल्याचे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे आदेश आहेत. सदर आदेशाविरुध्द शासनाने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती नाकारली आहे. सदर प्रकरणी माहिती प्रकट करण्यास मा.उच्च न्यायालयाने बंदी घातलेली नाही. असे असतांना अपीलकारास माहिती नाकारता येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२८.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६६५/०२**

**श्रीमती ईला बलदेव,**
**बी/००१,वागड्नगर,रामदेवपार्क रोड,**
**मीरा रोड(पूर्व), जिल्हा-ठाणे. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,कार्यकारी अभियंता सी विभाग**
**यांचे कार्यालय, ७६, श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी, मरीन लाईन्स, मुंबई-४००००२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(इ.व का.),**
**सी विभाग यांचे कार्यालय,**
**७६, श्रीकांत पालेकर मार्ग,**
**चंदनवाडी, मरीन लाईन्स,**
**मुंबई-४००००२. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्रीमती ईला बलदेव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.११.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

अ)जी+१, शेख मेमन स्ट्रीट, मुबादेवी मंदीराच्या मागे, मुंबई-२

ब)मोकळया जागेवर दुकार, ईमारत क्र.४३, धोबी गल्ली लहेरी हाऊसच्या समोर, मुंबई-३,

क) १+४, दुसरा भोईवाडा भुलेश्वरमंडी, मुंबई-२

ड) १+२,१२४- ठाकूरद्वार रोड, मुंबई-२

ई) जी+१,१२७-कालबादेवी रोड, कॉटन एक्सचेंज ईमारत जवळ, सुरती हॉटेलच्या समोर, मुंबइ-२

१)सदर बांधकामावर आपण केलेल्या कारवाईचा संपूर्ण तपशील द्यावा

२) सदर(जे पण)बांधकाम आपण निष्कासित केले असेल तर त्याची रंगीत फोटोची छायांकित प्रत द्यावी.

३) सदर बांधकामावर दिलेल्या सर्व नोटीसची प्रत द्यावी

४) सदर बांधकामावर अद्यापही कारवाई केली नाही तर त्याचे कारणाची सविस्तर माहिती द्यावी

५) सदरचे बांधकाम आपल्या निदर्शनास आणून दिल्यानंतर आपण करणा-या कारवाईचे संपूर्ण तपशील द्यावे व कारवाई किती दिवसात होते त्याची माहिती द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.१५.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास २ आठवडयाचे आत निःशुल्करित्या माहिती पुरवावी असे दि.१.२.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचल लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अनधीकृत बांधकामावर केलेल्या कारवाईबाबतची माहिती मागीतली होती. या प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराच्या मागणीप्रमाणे माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी. तत्कालीन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२८.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६६९/०२**

**श्री. सुरेश पी. गोखले,**
**१/सी/६०२, लाभ दर्शन-१,**
**सबवेच्या जवळ, दहिसर(पूर्व),**
**मुंबई-४०००६८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,(३)पश्चिम उपनगरे,**
**गृहनिर्माण भवन,रुम नंबर ६९,तळ मजला,बांद्रा(पूर्व),**
**मुंबई-५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,आर विभाग,३१६ ए बिल्डिंग,**
**वडाळा ट्रक टर्मिनल,आर.टी.ओ.च्या जवळ,**
**वडाळा(पूर्व), मुंबई-४०००३७.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. सुरेश गोखले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.९.२००९ रोजी अर्ज करुन संस्थेने कार्यालयाकडे जानेवारी,२००९ पासून आजपर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रतीची व अनुषंगिक माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.९.१०.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास काही माहिती दिली. इतर माहितीकरीता कार्यालयात येऊन संबंधीत धारिकेचे निरिक्षण करुन हवी असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.५.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. उपनिबंधक सहकारी संस्था, आर विभाग, मुंबई यांनी अर्जदाराला कागदपत्र साक्षांकित करुन द्यावीत असे दि.२५.११.०९ रोजी आदेश पारित केले.

त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन संस्थेच्या सचिव पदाच्या राजीनाम्याबाबत श्री.जी.शेट्टी, श्रीम.रानडे,श्री.देशमुख व श्री.छेडा यांचेबाबत कलम १०१ च्या वसुली दाखल्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सदर माहिती दिली असल्याचे प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी सांगीतले होते. कागदपत्र साक्षांकित करुन मिळाली नसल्याचे अपीलकाराचे म्हणणे होते. अपीलकारास कागदपत्र साक्षांकित करुन द्यावीत असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याचा अपीलकाराने मुद्दा उपस्थित केला. अपीलकाराने कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपस्थित राहून संबंधीत फाईल/कागदपत्राचे निरिक्षण करावे. त्यानंतर हव्या असलेल्या कागदपत्राची मागणी केल्यानंतर अपीलकारास माहिती पुरविण्यात येईल असे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्रांचे निरिक्षण करुन हव्या असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती प्राप्त करुन घ्याव्यात. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२८.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६७७/०२,**

**श्री. शोएब खान,**
**बी-३०२, शिवअंगण, मालवणी,**
**मालाड(प.),**
**मुंबई-४०००९५.** ..... **तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, २रा मजला,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार ॲड.शोएब खान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. ९.९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२६.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते, गैरतक्रारदार हजर नव्हते . सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२८.११.०७ रोजी अर्ज करुन मालवणी सोनाली सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थेच्या व्यवस्थापकीय पदाधिका-यांनी दिलेली बंधपत्र, वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, लेखा परीक्षण अहवाल, प्रॉपर्टीचे, टॅक्सचे बील इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास संपूर्ण माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/१७९२/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास संस्थेच्या सभासदांची यादी, व्यवस्थापकीय समितीच्या पदाधिका-यांच्या बंधपत्राच्या प्रती पुरविण्याबाबत आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आदेश पारित

केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता गैरतक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदाराने, तक्रारदारास माहिती पुरविली नाही. राज्य माहिती आयोगाच्या दि.१८.३.२००९ च्या आदेशाचे पालन केले नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयांचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२८.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४६४/०२**

**श्री. विनोद जी.देसाई,**
**१/२, कामना सोसायटी,**
**एस.के. बोले मार्ग, दादर,**
**मुंबई-४०००२८.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(बि.पी.)शहर,**
**ई वार्ड, म्युनिसिपल ऑफीस बिल्डिंग,**
**३रा मजला, १० शेख हफीझुद्दीन मार्ग,**
**भायखळा(प.), मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(बी.पी.)शहर-III,**
**ई वार्ड, म्युनिसिपल ऑफीस बिल्डिंग,**
**३रा मजला, १० शेख हफीझुद्दीन मार्ग,**
**भायखळा(प.), मुंबई-४००००८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विनोद जी. देसाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.६.२००९ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.१२१०,एफपी क्र.८९९,टीपीएस IV माहिम येथील प्लॉटवर कामना सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मंजूर प्लॅनमध्ये काही बदल झालाआहे काय याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीच्या कांही फाईल कार्यालयात उपलब्ध आहेत. अपीलकाराने कार्यालयात हजर राहून संबंधीत फाईलचे प्रथम निरिक्षण करावे. त्यानंतर अपीलकारास हव्या असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती विहित शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२२.७.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.११.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१४.१०.२००९ रोजी आदेश पारित करुन

प्रथम अपील फेटाळले. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कामना सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६६८/०२**

**श्री. कृष्णदेव हरिमंगल दुबे,**
**साई दिप अपार्टमेंट(दुबे कंपाऊंड),**
**प्लॉट नं.५,ग्राउंड फ्लोअर,काजू पाडा,**
**बोरीवली(पू.), मुंबई-४०००६६. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता इमारत(प्रस्ताव),**
**प.ऊ-दोन, महापालिका इमारत,सी विंग,संस्कृती कॉम्प्लेक्स,**
**९०फूट डी.पी.रोड,सेंट लॉरेन्स शाळेजवळ,**
**कांदीवली(पूर्व),मुंबई-४००१०१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इमारत प्रस्ताव),**
**प.उ.,आर विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्केट बिल्डिंग,**
**कांदिवली(प.), मुंबई-४०००८१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. कृष्णदेव हरिमंगल दुबे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.८.२००९,१८.८.२००९ रोजी अर्ज करुन क्र.सीएचई १८७२६/बीपी/(डब्ल्यू एस)अेआर ऑफ ८ जाने.,२००७ रोजी पत्र दिले. बिल्डिंग मंजूर नकाशाची प्रत, बिल्डिंगच्या तळ मजल्याकरीता ओ.सी. आहे का? याची चौकशी करावी, संपूर्ण माहिती पुरवावी अशी ९ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मुद्देनिहाय माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने साईदिप अपार्टमेंटच्या बांधकामाविषयी माहिती मागीतली होती. माहिती अधिका-यांनी दि.९.९.०९ रोजी आवश्यक ती माहिती घेऊन जाण्यास कळविले होते. अपीलकारास दि.३.११.०९ रोजी संबंधीत इमारतीचे मंजूर आराखडे,परवानगी इत्यादीच्या प्रती देण्यात आल्या. त्यात अपीलकारास अपेक्षीत असलेली सर्व माहिती अंतर्भूत आहे. सदर इमारतीच्या तळ

मजल्याला निवासी प्रमाणपत्र दि.८.१.२००७ ला देण्यात आलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२७.११.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, साईदिप अपार्टमेंटच्या बांधकामाविषयी पाण्याचे कनेक्शन, बांधकाम इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. विषयांकित इमारतीची प्रस्ताव धारिणी तपासण्यासाठी अपीलकारास उपलब्ध करुन देण्यात आली होती. अपीलकाराने धारिणीचे निरिक्षण करुन आवश्यक असणारी कागदपत्रे स्वाक्षरीने दि.२३.१०.०९ रोजी प्राप्त केलेली आहेत असा जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर केला. द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकारही उपस्थित होते. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती संबंधीची सर्व कागदपत्र पाठविली आहेत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२८.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४३८०/०२**

**श्री. नितीन गोयल,**
**अंजली, तळ मजला, फ्रेंच ब्रिज,**
**ऑपेरा हाऊस जंक्शन,**
**मुंबई-४०० ००७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,मुंबई(१)शहर,**
**मल्होत्रा हाऊस,सहावा मजला,जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय,**
**मल्होत्रा हाऊस,जी.पी.ओ समोर,**
**फोर्ट, मुंबई-४००००१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. नितीन गोयल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.८.२००९, रोजी अर्ज करुन बॅकबे प्रिमायसेस सहकारी गृहनिर्माण संस्था लि.या संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीने स्विकारलेल्या बंधपत्राचे निरिक्षण करण्यास परवानगी मागीतली होती. तसेच बंधपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. या संस्थेच्या व्यवस्थापक समितीने स्विकारलेल्या बंधपत्राच्या प्रती या संस्था स्तरावर ठेवल्या जात असल्याने त्या बंधपत्राच्या मूळ प्रतींची पहाणी करण्यासाठी संस्थेशी संपर्क साधणे उचित होईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.९.१०.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२९.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी यांनी संस्थेच्या बंधपत्रावर तपासणी करुन स्वाक्षरी केल्याची प्रत किंवा संस्थेकडून तपासणी करुन

स्वाक्षरीची प्रत अर्जदार यांना देण्यात यावी असे दि.२६.११.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन बॅकबे प्रिमायसेस सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापक समितीने केलेल्या एम-२० बंधपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. संस्थेने एम-२० बंधपत्राच्या प्रती अपीलकारास पुरविल्या असल्याचे दि.२.३.२०१० च्या पत्रन्वये उपनिबंधक अे विभाग यांना अपीलकाराने कळविले. उत्तरवादीने सदर पत्राची प्रत द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास सादर केली. यावरुन उत्तरवादीने मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२८.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६६१/०२**

**श्री. अश्वनी उदयसिंग शओरन,**
**द्वारा दर्शन दैया सिध्दीविनायक बंगलो,**
**प्लॉट नं.८, न्यु म्हाडा कॉलनी,पवार नगर,**
**वसत विहार, ठाणे(प.)-४००६०७. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**गृह विभाग(सेकपी-१), मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**गृह विभाग(सेकपी-१), मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. आश्वनी उदयसिंग शेओरन यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.९.२००९, रोजी अर्ज करुन दूरध्वनी संभाषणाच्या संदर्भातील (Telephonic interception) माहिती व कागदपत्र मिळावे म्हणून मागणी केली होती. सदर माहिती उक्त अधिनियमातील कलम ८(ज) अनुसार देता येणार नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.१२.१०.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिका-याने घेतलेला निर्णय योग्य असल्याचे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१८.११.२००९ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन दूरध्वनी संभाषणाच्या संदर्भातील (Telephonic interception) अनुषंगिक माहिती व कागदपत्राची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५मधील बलम ८(ज) अनुसार माहिती देता येत नाही म्हणून माहिती नाकारली. कलम ८(ज) अनुसार ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रकियांमध्ये अडथळा येईल अशी माहिती पुरविता येत नाही अशी तरतूद आहे. अधिनियमातील सदर तरतुदीनुसार अपीलकारास माहिती नाकारण्यात आली आहे. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१८.११.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६६३/०२**

**श्री. संजय श्रीधर पांचाळ(ईश्वलकर),**
**बाबुराव चव्हाण चाळ, रुम नं.२,**
**गुंदवली हिल, आझाद रोड, उत्कर्ष मंडळाच्या मागे,**
**अंधेरी(पूर्व), मंबई-४०००६९. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा**
**निवासी उप जिल्हाधिकारी(अति.निष्कासन),**
**पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत,**
**७वा मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई५४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(अति/निष्कासन),**
**पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत,**
**७वा मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई५४०००५१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. संजय श्रीधर पांचाळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.९.२००९, रोजी अर्ज करुन त्रिवेणी संगम(एस.आर.ए.)सहकारी गृहनिर्माण संस्था, गुंदवली, अंधेरी(पूर्व) या संस्थेसंबंधी विकासकाने कार्यालयीन झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सादर केलेल्या नस्तीची तपासणी करण्याची मागणी केली होती. तसेच तपासणी करुन हवी असलेली कागदपत्र उपलब्ध करुन द्यावीत अशी अपीलकाराची मागणी होती. त्रिवेणी संगम सहकारी गृहनिर्माण संस्थेची परिशिष्ट-२ बाबतची संचिका कार्यालयात उपलब्ध असून सदर संचिकेची पडताळणी कार्यालयीन वेळेत करुन आवश्यक असलेल्या प्रतीची नोंद करावी असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.१६.१०.०९ च्या पत्रान्वये कळविले होते. आवश्यक माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दि.७.१२.२००९ रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास संचिका पडताळणीस उपलब्ध करुन

द्यावी व आवश्यक ती कागदपत्र अपीलकारास द्यावीत असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.१८.१.२०१० रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन त्रिवेणी संगम(एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. परिशिष्ट-२ मधील काही नावे वगळण्यात आली आहेत याबाबत अपीलकारास माहिती हवी असल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकाराने त्यांना हव्या असलेल्या सदर माहितीकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी संपर्क साधावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६७७/०२**

**श्री. कृष्णदेव हरिमंगल दुबे,**
**साईदिप अपार्टमेंट(दुबे कंपाऊंड),**
**प्लॉट नं.५, ग्राऊंड फ्लोअर,काजू पाडा,**
**बोरीवली(पूव), मुंबई-६६. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा**
**विभाग कार्यकारी अभियंता,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,आर/मध्य यांचे कार्यालय,**
**२रा मजला, महापालिका मंडई इमारत,**
**स्वामी विवेकानंद मार्ग,बोरीवली(प.),मुंबई-९२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियता(इ. व का.),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,आर/मध्य यांचे कार्यालय,**
**२रा मजला, महापालिका मंडई इमारत,**
**स्वामी विवेकानंद मार्ग,बोरीवली(प.),मुंबई-९२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. कृष्ण देव हरिमंगल दुबे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.९.२००९, रोजी अर्ज करुन साईदिप अपार्टमेंटच्या तळमजल्यावर पीठाची गिरणी चालू आहे. त्याची चौकशी करावी व माहिती द्यावी अशी मागणी केली होती. सदर प्रकरणी एकूण ८ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३०.९.२००९ व ३०.१२.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुद्दा क्र.४ संबंधी अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. मुद्दा क्र.५ संबंधी पूर्वी माहिती देऊ केली नसल्यास उपलब्धतेसापेक्ष माहिती द्यावी. मुद्दा क्र.८ करीता निरिक्षण करुन अहवालाची प्रत

अपीलकारास देण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२७.११.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर माहिती मिळाली नसल्याचे कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन साईदिप अपार्टमेंटच्या तळमजल्यावर पीठाची गिरणी चालू असल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या माहितीच्या अधिकारातील अर्जातील मुद्दा क्र.४,५ व ८ बाबत अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२७.११.०९ रोजी आदेश पारित केले आहेत. जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविलेली नाही या परिसिथतीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६८०/०२**

**श्रीमती कल्पना दिपक फुरीया,**
**लक्ष्मी स्टोअर्स,शॉप नं.३,**
**देढीया हाऊस,बभई नाका,एल.टी.रोड,**
**बोरीवली(प.),मुंबई-४०००९१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कोषागार अधिकारी,**
**प्रधान मुद्रांक कार्यालय,नगर भवन,**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी,**
**ओल्ड कस्टम हाऊस, मंबई-४०००२३. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. कल्पना दिपक फुरीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.८.२००९, रोजी अर्ज करुन मुद्रांक अधिक्षकांकडे दि.१४.१.२००९ आणि दि.१.४.२००९ रोजी दिलेल्या पत्रावरील कारवाईची माहिती, सद्यस्थितीबाबतची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.८.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपीलावरील सुनावणीकरीता हजर नव्हते. यामुळे अपीलकाराने मागणी केलेली माहिती दि.२९.१०.०९ च्या पत्रासोबत अपीलकारास पाठविली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते,अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन अपीलकाराच्या दि.१४.१.२००९ व दि.१.४.२००९ च्या अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती.अपीलकाराचा मुद्रांक विक्री परवाना रद्द करण्यात आल्यामुळे मुद्रांक मागणीपत्राची परताव्याची रक्कम अपीलकारास परत करण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक:२९.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/५४३/०२,**

**श्री. प्रमोद लक्ष्मण कदम,**
**१६/डी-३, श्री.साई को.ऑप.हौ.सो.,**
**एस.व्ही.पी.नगर,**
**म्हाडा.अंधेरी(प.),**
**मुंबई-४०००१३.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.प्रमोद कदम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. ५.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदाराच्यावतीने डॉ.एस.एस.प्रभू, व गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/ तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.६.४.०९ रोजी अर्ज करुन तक्रारदाराच्या दि.२६.२.०९च्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही.यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/३३०९/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. तक्रारदाराच्या दि.२६.२.०९च्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती ३० दिवसाचे आत तक्रारदारास पुरवावी असे दि.२९.९.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती

पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे गैरतक्रारदाराविरुध्द तक्रार दाखल केली.

तक्रारदारास गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी माहिती पुरविली नाही. राज्य माहिती आयोगाच्यादि.२९.९.०९ च्या आदेशाचे पालन केले नाही. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरुन सदर प्रमादाबद्दल गैरतक्रारदाराविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६९५/०२,**

**श्री. बी.ए.अलीम,**
**ई/२, मिनी नगर,एस.एन.दुबे रोड,**
**रावळपाडा, दहिसर(पूर्व),**
**मुंबई-४०००६८.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,पी/उत्तर विभाग,**
**मामलेदार वाडी, लिबर्टी गार्डन, मालाड(प.),**
**मुंबई-४०००६४.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.बी.ए.अलीम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. २०.२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते,गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१९.१.०७ रोजी अर्ज करुन मार्वे रोड,मालाड(प.) येथील आकाशवाणी भवन जवळील वृंदावन सोसायटी व्यापारी गाळे,आर.सी.सी. बांधकाम,गोडाऊन,बंगलो बांधकाम या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत आवश्यक ती माहिती पुरविली नसल्याने आयोगाकडे क्र.२००८/७७५/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. गैरतक्रारदाराने तक्रारदारासमवेत अनधीकृत बांधकामाची एकत्रीतरित्या पहाणी आयोजित करावी, त्यानंतर तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयोगाने दि.१५.९.२००८ रोजी आदेश पारित केले होते.

त्यानंतरही तक्रारदाराने गैरतक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती पुरविली नाही. अनधीकृत बांधकामाची एकत्रितरित्य पहाणी आयोजित केली नाही. राज्य माहिती आयोगाच्या दि.१५.९.०८च्या आदेशाचे पालन केले नाही याकरीता गैरतक्रारदारास जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत तक्रारदाराने प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६७५/०२,**

**श्री. बी.एस.रथ,**
**४बी,गणेश भवन,**
**४३४,सेनापती बापट मार्ग,**
**माहीम,मुंबई-४०००१६. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जी/एन विभाग,**
**मुंबई शहर,मल्होत्रा हाऊस,**
**६वा मजला,जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट,मुंबई-४००००१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.बी.एस.रथ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. १९.५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.६.०७ रोजी अर्ज करुन जयगणेश सहकारी गृहनिर्माण संस्थेने दि.१८.५.२००७ रोजी दिलेले पत्र व त्या संदर्भातील तक्रारदाराने दि.३१.५.०७ रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबत एकूण ७ मुद्यांवर माहिती मागीतली होती. अर्जातील मुद्दा क्र.इ,एफ,पी बाबत तक्रारदारास माहिती मिळाली नाही. तक्रारदाराची संस्थेच्या गैरव्यवहाराबाबत तक्रार होती. संस्थेची कलम ८९(अे)अन्वये तपासणी घेणे आवश्यक असल्याने उपनिबंधक,सहकारी संस्था,जी-एन विभाग मुंबई यांनी संस्थेची तपासणी घेऊन तक्रारदारास त्याबाबतचा अहवाल द्यावा असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित

केले होते. तथापि गैरतक्रारदाराने संस्थेची तपासणी करुन तक्रारदारास अहवाल उपलब्ध करुन दिला नाही म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीयअपील दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचेआत संस्थेचा तपासणी अहवाल पुरवावा असे आयोगाने दि.२३.१०.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही तपासणी अहवाल मिळाला नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी सदर तक्रार लक्षात घेऊन संस्थेमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत चौकशी करुन कथीत रु.३.६२ कोटी इतक्या रकमेच्या गैरव्यवहाराबाबतचा सविस्तर चौकशी अहवाल तक्रारदारास उपलब्ध करुन द्यावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२९.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७२२/०२,**

**श्री. मेहमूद शेख,**
**रुम नं.७, दोस्त महमद चाळ,**
**गोसिया मस्जील जवळ, नित्यानंद नगर,**
**घाटकोपर(प.), मुंबई-४०००८६. ..... तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नियंत्रक,**
**वैध मापन शास्त्र जि.क्र.४, मुंबई यांचे कार्यालय,**
**पुरवठा भवन, ३रा मजला, महात्मा गांधी रुग्णालयाजवळ,**
**जन.नागेश मार्ग, परेल, मुंबई-४०००१२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.मेहमूद शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. ११.२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.६.१.०९ रोजी अर्ज करुन निरिक्षक वैधमापनशास्त्र मुलुंड विभाग यांचे विभागाने केलेल्या कारवाईबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागीतली होती. तक्रारदाराने अर्जात माहितीचा कालावधी दोन वेगळा दिला असल्याने कार्यालय माहितीच्या कालावधीबाबत संभ्रमात आहे. सहाय्यक नियंत्रक,मुलुंड विभाग या नावाचे पद आस्थापनेवर अस्तित्वात नाही. त्यामुळे कोणाची माहिती व कोणत्या कालावधीची माहिती याचा बोध होत नाही. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल सुस्पष्ट व निश्चित अशा तारखेसह दिल्यास व निश्चित कालावधीसाठी दिल्यास तक्रारदारास हवी असलेली माहिती पुरविणे

कार्यालयास शक्य होईल असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.७.२.०९च्या पत्रान्वये कळविले. यामळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरीता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार तथा सहाय्यक नियंत्रक वैधमापनशास्त्र, मुंबई जि.क्र.मुंबई यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली आहे. गैरतक्रारदाराबाबत तक्रार नाही असे तक्रारदाराने लेखी पत्र आयोगाकडे दि.१९.४.२०१० रोजी पाठविले आहे. यावरुन तक्रारदारास माहिती प्राप्त झाली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७१०/०२,**

**श्री. मोहम्मद उस्मान शेख,**
**६/५३,एन.सी.सी.गेट नं.७,**
**मालवणी, मालाड(प.),**
**मुंबई.** ..... **तक्रारदार,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा म्युनिसिपल कॉर्पोरेशन(इलेक्ट्रीक डिपार्टमेंट),**
**निवडणूक कार्यालय, जुनी इमारत,**
**म्युनिसिपल हेड ऑफीस,**
**महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.मोहम्मद उस्मान शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. १५.३.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार/गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१५.४.२००९ रोजी अर्ज करुन तक्रारदाराच्या दि.३०.३.२००९ च्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत दिली नाही. यामळे तक्रारदाराने क्र.२०१०/३४१३/०२ हे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३०.१.२०१०रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकाडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. राज्य माहिती आयोगाच्या दि.३०.१.२०१० च्या आदेशाचे पालन केले नाही. याकरीता गैरतक्रारदारास

जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत गैरतक्रारदाराने (श्री.बी.बी.खामकर,सहाय्यक अभियंता) आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**

दिनांकः२९.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/७०८/०२,**

**डॉ.तनुजा गुप्ता,**
**सक्षम महिला आणि जनरल हॉस्पीटल,**
**पिलानी-३३३०३१,झुनझुनु, राजस्थान. ..... तक्रारदार,**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय प्रमुख/सेक्रेटरी,**
**मैत्री सेवा सदन चॅरीटी ट्रस्ट कार्यालय, १५९, इंडस्ट्री हाऊस,**
**चर्चगेट रिक्लमेशन, मुंबई-४०००२०. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार डॉ.तनुजा गुप्ता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि. ३१.७.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रार दाराकडे दि.११.६.०८ रोजी अर्ज करुन मातृसेवा सदन विश्वस्त मंडळाबाबत एकूण ६ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मातृ सेवा सदन विश्वस्त मंडळासंबंधीची माहिती मागीतली आहे. विश्वस्त मंडळ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कार्यकक्षेत येत नाही. असा याचिका क्र.५२९४/२००८ संबंधी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांनी निर्णय दिला आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६७३/०२**

**श्री. विनायक सूर्यकांत मोरे,**
**द्वारा-श्री.बी.बी.मोरे फार्म हाऊस,**
**ममता फार्म हाऊस,सोनाली फार्म हाऊस पुढे,**
**येऊन गाव, ठाणे.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक(क),**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत, तळमजला,**
**प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९.**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(क-अतां आस्था),**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**४था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** **..... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. विनायक सूर्यकांत मोरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.११.०९ रोजी अर्ज करुन अधीक्षक अभियंता सरळसेवा भरतीमध्ये उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-याची माहिती मिळण्याबाबत एकण ५ अनुषंगिक मुद्याची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१०.१२.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. निवड प्रक्रियेकरीता बसलेल्या उमेदवारांनी भरलेले अर्ज,ज्यामध्ये त्यांची वैयक्तिक माहिती आहे आणि ती व्यक्तीगत/वैयक्तिक माहिती जीचा आमजनतेशी संबंध नाही अशी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१)(ई) व (ग) प्रमाणे देता येणे शक्य नाही असेही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२५.१२.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अधीक्षक अभियंता सरळसेवा भरतीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अधीक्षक अभियंता परिक्षेकरीता बसलेल्या उमेदवारांच्या अर्जाच्या प्रतींची मागणी उत्तरवादीने नियमानुसार नाकारली आहे. या कामासाठी साधनसामग्री प्रमाणाबाहेर कळवावी लागेल. अशी माहिती नाकारता येईल. याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९)कडे लक्ष वेधण्यात येत आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४८९/०२**

**श्री. दिनेश महादेव तारकर,**
**द्वारा- श्रीमती सुशिला शिवराम तांबे,**
**भेकरे चाळ, अशोकनगर, वाकोला पाईप लाईन,**
**सांताक्रुझ(पूर्व), मुंबई-४०००० ५५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी भूमापन विभाग,**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, पहिला मजला,**
**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई -४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार(अति.निष्का.),**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,**
**जुने जकात घर, पहिला मजला,**
**शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई -४०० ००१. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. दिनेश महादेव तारकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.२.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.०९ रोजी अर्ज करुन खाजगी जागा गलिच्छ वस्ती घोषित असतांना, एस.आर.ए.स्कीम चालू असतांना जागा विकण्याची परवानगी दिली त्याचे लेखी कारण लिहून द्यावे, पुराव्याची प्रत द्यावी, गलिच्छ वस्ती दि.२४.५.२००१ रोजी घोषित झाली. त्यानंतर रुबी मील लिमिटेड यांनी दि.१०.५.२००७ रोजी जागा विकत घेतली असे प्रॉपर्टी कार्डावर दर्शविले आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत नाही असे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार(अति.निष्का.) धारावी विभाग, मुंबई यांनी अपीलकारास दि.२८.१.२०१० च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले

नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.७.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन खाजगी जागा गलिच्छ वस्ती घोषित असतांना एस.आर.ए.स्किम चालू असतांना जागा विकण्याची कशी परवानगी दिली याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी Lease deed संबंधीची कागदपत्र तयार करण्यात आली तेव्हापासून सदर जमीन विक्री व्यवहार अस्तित्वात आला आहे. सध्या जागेचे मालक Ruby Mills दर्शविण्यात आले आहे. सदर प्रकरणी याबाबत जिल्हा भूमापन अधिका-यांनी सविस्तर माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| मुंबई | **(रामानंद तिवारी)** |
| दिनांकः२९.४.२०१० | **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई** |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४५४/०२**

**श्री. प्रविण त्रिपाठी,**
**१६६-जी, मुबादेवी टेंपल कंपाऊंड,**
**मुंबई-४००००२.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**सर जे.जे. मार्ग,**
**नागपाडा, मुंबई-४००००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**दक्षिण प्रादेशिक विभाग कार्यालय इमारत,**
**सर जे.जे. मार्ग,**
**नागपाडा, मुंबई-४००००८.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रविण त्रिपाठी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.९.०९ रोजी अर्ज करुन पोलीस कॉन्स्टेबल श्री.लहू मारुती पवार यांचे वेतन किती आहे, त्यांच्याकडे किती कार आहेत,त्यांच्याकडे किती किंमतीचे सोने आहे, इनकमटॅक्स रिटर्नच्या गेल्या पांच वर्षांच्या प्रती, त्यांची किती बँकात खाती आहेत,बँकांचे गेल्या ५ वर्षांचे प्रपत्र, त्यांचेकडे किती टॅक्सी आहेत, पोलीस सेवेतील अभिलेख्यच्या प्रती द्याव्यात इत्यादी श्री.पवार यांचेबाबतची अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२३.१०.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास असे कळविले की, संबंधीत माहिती अभिलेखावर उपलब्ध नाही. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.६.११.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलार्थीनी मागीतलेली माहिती अपीलार्थीना अपूर्ण स्वरुपात देण्यात आली आहे.लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाणे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अपीलार्थीला

पुरविण्यात यावी असे दि.१५.१२.०९ रोजी प्रथम अपीलावर आदेश पारित केले.माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते, अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचे वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पोलीस कॉन्स्टेबल श्री.लहू मारुती पवार यांचेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.१,७,८ या मुद्यांबाबत अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी स्पष्ट केले. अपीलकाराच्या अर्जातील उर्वरित मुद्यांबाबत माहिती उपलब्ध नसल्याने सदर माहिती अपीलकारास पुरविता आली नसल्याचे उत्तरवादीने लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४६७६/०२**

**श्री. प्रेमचंद डुंगाराम राजोरा,**
**प्लॉट क्र.४९, खेरवाडी,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी(अति./निष्का.),**
**पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,७वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा नायक तहसिलदार(अति.निष्का.),**
**पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत,७वा मजला,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रेमचंद डुंगाराम राजोरा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ६.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.७.०९ रोजी अर्ज करुन झोपडी क्र.एचईएक्स २७३८ अे बिसेसवर पीतांबर दासी फार्मची (झोपडी गणना २०००ची माहिती) प्रमाणित सत्य प्रतीची मागणी केली होती. झोपडी गणना २००० ची माहिती उपजिल्हाधिकारी (अति.निष्का.) बांद्रा यांचेकडून घेण्यात यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३१.७.०९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२८.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन झोपडी गणना २००० ची अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास दि.१४ जुलै,२०००च्या आदेशाची प्रत पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/४४४६/०२**

**श्रीमती सीमप्रित सिंग,**
**२९-३०, पहिला मजला, ए विंग,**
**हाजी हबिब इमारत, नायगाव क्रॉस रोड,**
**दादर(पूर्व), मुंबई-४०००१४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य,टी.अँड सी. विभाग,**
**एम.आर.टी.एस.यांचे कार्यालय,**
**एम.एम.आर.डी.ए.,**
**बांद्रा, मुंबई-४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**एम.आर.टी.एस.यांचे कार्यालय,**
**एम.एम.आर.डी.ए.,**
**बांद्रा, मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती सिमप्रीत सिंग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.७.०९ रोजी अर्ज करुन चारकोप,बांद्रा-मानखूर्द मेट्रो रेल प्रोजेक्ट संबंधी विविध तज्ञांनी सही केलेल्या करारपत्राच्या प्रतीची मागणी केली होती तसेच एकूण ८ मुद्यांवर अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१०.८.२००९ च्या व दि.१६.९.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी विलंबाने माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन चारकोप-बांद्रा -मानखूर्द मेट्रो रेल प्रोजेक्टबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती विलंबाने पुरविली आहे. द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविण्यात आली असल्याबाबत अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास विलंबाने मााहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने माहिती पुरवून उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग केला आहे. याकरीता जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचाअधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत जन माहिती अधिका-यांनी आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३३३०/०२**

**श्रीमती साईप्रिया नामदेव मळीक,**
**११/५५३,सरदारनगर नं.१,**
**सरदारनगर प्रांजल को.ऑप.हौ.सो.लि.,**
**सायन कोळीवाडा, मुंबई-४०००२२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अधिकारी,**
**मुंबई मंडळ, तथा मिळकत व्यवस्थापक-२,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(प.),**
**मुंबई४०००५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-५,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(प.),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती साईप्रिया नामदेव मळीक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.१.०८ रोजी अर्ज करुन म्हाडाने प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्था लि.सायन कोळीवाडा, मुंबई या संस्थेस म्हाडाने संस्थेच्या इमारतीच्या दोन्ही बाजूला मोकळया असलेल्या जागेवर अनधिकृत बांधकाम करुन ती जागा भाडे तत्वावर देण्याची परवानगी दिली आहे का याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळै राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/१५२९/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिका-यांनी प्रथम अपीलावर ४५ दिवसाचे आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत असे आयोगाने दि.१७.१.२००९ रोजी आदेश निर्गमित केले. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास

दि.१८.४.२००९,दि.६.४.२००९च्या पत्रान्वये उत्तर दिल. त्यामध्ये मुद्दा क्र.४ ची माहिती खोटी असल्याचा अपीलकाराने द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२५.९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, गृहनिर्माण संस्थेचे अनधिकृत बांधकाम तोडल्यानंतर त्या ठिकाणचे बांधकाम साहित्य भाडे वसूली कार्यालयात जप्त करुन ठेवण्यात आले आहे व ते अद्यापही त्याच ठिकाणी आहे ही माहिती संपूर्णपणे खोटी असल्याचा अपीलकाराने द्वितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत माहिती अधिका-यांकडून दि.९.३.२०१० च्या पत्रान्वये खुलासा मागविण्यात आला आहे. जन माहिती अधिका-यांनी दि.६.४.२०१०च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे खुलासा आयोगाकडे लेखी स्वरुपात सादर केला आहे.

"याबाबत सादर करण्यात येत आहे की, माहिती आयोगाकडे अपील सादर केल्यानंतर तेथील मुख्य भाडे वसुलीकार श्री.शिरीसकर यांना सदर जागेची पाहणी करुन अहवाल सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने त्यांनी दि.१५.६.२००९ रोजी अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी असे स्पष्ट नमूद कले आहे की, दिनांक १३..२००९ रोजी भाडे वसुलीसाठी गेलो असता त्यावेळी भाडे वसुली कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचे लोखंडी सामान आढळून आलेले नाही.

याचवेळी श्री.व्ही.के.देसाई, भाडे वसुलीकार यांचेकडूनही खुलासा मागविण्यात आला होता. त्यांनी असा खुलासा केला आहे की, भाडेवसुलीकार कार्यालयाचे दुरुस्तीचे काम सुरु असतांना सदरचे सामान श्री.बागवे, सरदार नगर महासंघाचे अध्यक्ष यांना विनंती करुन त्यांचे कार्यालयात ठेवले होते. या खुलाशाच्या अनुषंगाने सरदार नगर संघाकडे विचारणा केली असता ते सामान संघटनेच्या कार्यालयात ठेवण्यात आलेले होते. परंतू मागील बाजूच्या भिंतीवरुन आत शिरुन चोरटयांनी सर्व लोखंडी सामान चोरुन नेले असा खुलासा दिनांक १०.११.२००९ च्या पत्राद्वारे केलेला आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता मी आपल्या नम्रपणे निदर्शनास आणू इच्छितो की, तत्कालीन मिळकत व्यवस्थापक यांनी दि.६.४.२००९ रोजी मुद्दा क्र.४ बाबत दिलेली माहिती नजर चुकीने दिली असावी असे वाटते. दिनांक २५.९.२००९ रोजीच्या सुनावणीच्यावेळी मी स्वतः हजर होतो. जागेवरील वस्तुस्थिती मला माहिती नसल्या कारणामुळे पूर्वीच्या पत्रामध्ये जे नमूद केले होते तेच मी सांगितले होते.

सबब आपणास विनंती की, वरील वस्तुस्थितीबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन झालेली चूक क्षमापित करावी, ही विनंती. यापुढे अशाप्रकारे नजरचूक होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.''

जन माहिती अधिका-यांनी वरीलप्रमाणे केलेला खुलासा लक्षात घेता सदर प्रकरणी आयोगाकडे सुनावणीकरीता येण्यापूर्वी जन माहिती अधिका-यांनी सदर बाब गांभीर्याने घेतली नाही. खातरजमा केली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. भाडे वसुली कार्यालयात कोणतेही लोखंडी सामान नसतांना ते अद्यापही त्याच ठिकाणी असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी खोटी माहिती देऊन आयोगाची दिशाभूल केली आहे. याकरीता जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-५ श्री.बी.डी.जाधव यांना जबाबदार धरुन त्यांच्या या प्रमादाबद्दल उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिका-यांविरुध्द रु.२,५००/- (रुपये दोन हजार पाचशे फक्त)इतकी शास्ती लादण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिका-यांच्या वेतनातून दरमहा रु.५००/- प्रमाणे ५ समान हप्त्यात वसूल करण्यात यावी. शास्तीची वसुली जून,२०१० या महिन्यापासून सुरु करावी. शास्तीची रक्कम ००७,इतर प्रशासनिक सेवा, ६०,इतर सेवा,८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार(००७००१६-१) या लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात चलनाने जमा करावी. चलनाच्या प्रती राज्य माहिती आयोगाकडे सादर कराव्यात.

मुंबई
दिनांकः२९.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००९/३५४१/०२**

**श्री.लुईस डिमेलो,**
**आदर्श घोटार सातपाला,पो.आगाशी,**
**ता.वसई, जि.ठाणे. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा बॉंबे हॉस्पीटल कॉलेजचे नर्सिंग ऑफ बॉंबे हॉस्पीटल ट्रस्ट,**
**१२, न्यु मरीन लाईन्स, मुंबई-४०००२०.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रिन्सिपॉल,**
**बॉंबे हॉस्पीटल कॉलेजचे नर्सिंग ऑफ बॉंबे हॉस्पीटल ट्रस्ट,**
**१२, न्यु मरीन लाईन्स, मुंबई-४०००२०. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.लुईस डिमेलो यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.८.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकड अर्ज करुन बी.एससी. नर्सिंग कोर्सकरीता सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात किती जागा होत्या, सदर वर्षी या कोर्सकरीता किती प्रवेश देण्यात आले, सदर वर्षात किती प्रवेश रद्द झाले, त्या उमेदवारांची नावे व दिनांक, प्रवेश रद्द झालेल्या किती उमेदवारांना कोर्स फी परत करण्यात आली त्या उमेदवारांची नांवे इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२८.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२७.१.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते, अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन बी.एससी.नर्सिंग कोर्सकरीता सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात किती जागा होत्या, किती उमेदवारांना प्रवेश देण्यात आला,किती प्रवेश रद्द झाले, किती उमेदवारांना कोर्स फी परत करण्यात आली इत्यादी अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मुंबई हॉस्पीटल विश्वस्त मंडळाच्या नर्सिंग महाविद्यालयाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली आहे. विश्वस्त मंडळ(Public Trust) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कार्यकक्षेत येत नाही. विश्वस्त मंडळास सदर अधिनियम लागू होत नाही असा मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र.५२९४/२००८ संबंधी निर्णय दिला आहे. अपीलकाराच्या मुलीने मुंबई हॉस्पीटल विश्वस्त मंडळाच्या नर्सिंग महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. त्यांनी सदर प्रवेश रद्द करुन घेतला. विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास व संस्थेने सदर जागा दुस-या विद्यार्थ्यास प्रवेश देऊन भरल्यास अशा प्रकरणामध्ये प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्याकडून घेतलेली सर्व फी रु.१०००/- इतकी रक्कम संस्करण शुल्क म्हणून ठेवून बाकीची फी त्यांना परत करावी असे शिक्षण शुल्क समितीचे दि.२४.८.०७ चे आदेश आहेत. त्यानुसार अपीलकाराने त्यांच्या मुलीच्या नर्सिंग कोर्सकरीता भरलेली फी नियमानुसार परत मिळण्याची त्यांची मागणी आहे. याकरीता अपीलकाराने सक्षम प्राधिका-याकडे दाद मागावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:३०.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६६८/०२,**

**श्री. संजय गंगाराम पवार,**
**मेरवानजी अंबावाडी,**
**जहांगीर मेरवानजी पथ,**
**परळ, मुंबई-४०००१२. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे(पू.),**
**मुंबई-४०००५१. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.संजय गंगाराम पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२२.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.२.०९ रोजी अर्ज करुन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये फक्त मॅनग्रोव्हण पासून ५० प्रकल्पाच्या विकसनास स्थगिती देण्यात आली. याबाबत खुलासा करुन सदर पर्यावरण निर्बंध बाधीत भूखंडाचा आराखडा व निवारा प्रकल्पाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहिती संकलीत करण्याचे काम सुरु असून ते पूर्ण झाल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले होते. त्यामुळे व्यथीत होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील क्र.२००९/३२०४/०२ हे दाखल केले होते. परंतू गैरतक्रारदाराने त्यानंतरही तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारदाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची होती. सदर माहिती संकलीत करण्यात येत होती. मागणी केलेली माहिती संकलीत केल्यानंतर तक्रारदारास पुरविण्यात येईल असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले होते. त्यानुसार गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.११.९.०९च्या पत्रान्वये मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचा लेखी अहवाल गैरतक्रारदाराने आयोगास सादर केला.यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६७४/०२,**

**श्री. विजय के. मंथेना,**
**इमारत क्र.७, रुम नं.३४,**
**अब्दुल मेन्शन वेलफेअर सोसायटी,**
**हरियानावाला लेन,स्टेशन रोड,**
**कुर्ला(प.),मंबई-४०००७०. ..... तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
**इमारत व कारखाने, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,सं.गो.बर्वे मार्ग,**
**कुर्ला(प.),मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.विजय मंथेना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.२५.२२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१७.२.०७ रोजी अर्ज करुन श्री. दिगंबर मा.नाईक यांनी त्रिभुवनदास इमारत क्र.८ तळमजला +१ अशा स्वरुपाचे किंग्ज नावाचे दुकानाचे अनधिकृत बांधकाम केले याबाबत अनुषंगिक १० मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००८/७०३/०२ हे द्वितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास सुसंगत माहिती दिली नाही. तक्रारदारास विसंगत माहिती दिली होती. सदर विसंगती दूर करुन दुकानाचे बांधकाम अधिकृत की अनधिकृत याबाबत ३० दिवसाचे आत तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२७.८.०८ रोजी आदेश पारित केले होते.

त्यानतरही तक्रारदारास माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

दुकानाच्या अनधिकृत बांधकामाबाबत गैरतक्रारदाराने तक्रारदारास विसंगत माहिती पुरविली होती. सदर विसंगती दूर करुन तक्रारदारास सुसंगत माहिती कळवावी असे आयोगाचे दि.२७.८.०८ चे आदेश आहेत. गैरतक्रारदाराने सदर आदेशाचे पालन केले नाही. तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरीता गैरतक्रारदार यांना जबाबदार धरण्यात यावे. गैरतक्रारदाराच्या सदर प्रमादाबद्दल त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करण्यात येऊ नये याबाबत ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांकः१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/५७६/०२,**

**श्री. जयेश शांताराम झगडे,**
**द्वारा श्री. नामदेव रघुनाथ रहाटे,**
**२-६ दोशी इस्टेट, सुंदर बाग,**
**इंदिरा नगर, कमानी कर्ला(प.),**
**मुंबई-४०००७०.** ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायक तहसिलदार,**
**स्लम रिहॅबीलिटेशन ॲथॉरिटी,**
**५वा मजला, गृहनिर्माण भवन,**
**बांद्रा(पूर्व), मुंबई-४०००५१.** ..... **उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.जयेश शांताराम झगडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.९.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार/तक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.११.२.०९ रोजी अर्ज करुन साल्पादेवी सदन सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती संबंधीची फाईल/कागदपत्र शोधूनही सापडत नसल्याच्या कारणावरुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/३३३९/०२ हे दाखल केले होते. तक्रारदाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची फाईल सापडत नाही म्हणून माहिती पुरविता येत नाही असे उत्तर देता येणार नाही. तरी तक्रारदाराने मागणी केलेल्या विषयासंबंधीची फाईल/कागदपत्राचा जाणीवपूर्वक शोध घेऊन तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयोगाने दि.५.१०.०९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने

तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. श्री.राजेश दत्ताराम झगडे यांना साल्पादेवी सदन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदनिकेसाठी कोणती कागदपत्रे ग्राहय धरली त्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीची तक्रारदाराने मागणी केली आहे. सदर प्रकरणी जयेश शांताराम झगडे आणि श्री.राजेश दत्ताराम झगडे यांना साल्पादेवी सदन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या गाळेवाटपाकरीता एकाच कागदपत्राच्या संचाच्या आधारे पात्र ठरविण्यात आले असल्याची बाब तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारदाराने आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. याबाबत केलेल्या कारवाईबाबतची माहिती गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**तक्रार मान्य करण्यात येत आहे.**

मुंबई
दिनांक:१३.४.२०१०

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क.२०१०/६८०/०२,**

**श्री. किर्तीभाई रतनचंद वोरा,**
**४-४७ सेफ सोसायटी,**
**लम्बे हनुमान रोड, वराछा,**
**सुरत. ..... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा असि.रजिस्ट्रार,**
**को.ऑप.सोसायटीज,महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई(परसेवा), दि.बृहन्मुंबई नागरी सह.बँक असो.,**
**वडाळा, मुंबई. ..... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.किर्तीभाई वोरा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयागाकडे दि.१४.७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१५.४.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते, गैरतक्रारदार उशिराने हजर झाले. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यातआली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन तक्रारदाराकडून करण्यात येणा-या वसूलीबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.३३/०२ हे दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही असे आयोगाने दि.२८.४.०८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदार तक्रारीवरील सुनावणीकरीता अनुपस्थित होते. गैरतक्रारदार उशिराने आले. तक्रारदाराने माहिती प्राप्त केली असल्याची बाब गैरतक्रारदारानी पोच पावती दाखवून आयोगाच्या निदर्शनास आणून दिली. यावरुन तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. तक्रारदारास, गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांकः२१.४.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई**